# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६९

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दादा गुलाब देशमुख व<br>श्री. प्रकाश खंडेराव तारळकर,<br>लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>शिरुर, जिल्हा पुणे. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे-१. | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती नाकारल्यामुळे व त्याचबरोबर अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "त्यांच्या उपविभागात दि. ०१.०४.२००६ ते ०३.०७.२००९ या कालावधीमध्ये झालेल्या कामांची जी बीले विभागाने मंजूर केली, त्या मंजूर बीलाच्या

मोजमापपुस्तिकेतील नोंदी घेतल्याची व उपअभियंता यांनी टक्केवारी चेक केलेल्या पृष्ठांची छायाप्रत" अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. परंतु अपिलार्थीने या प्रकरणी दि. २६.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०८.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन आढळून आले नाही. अशाप्रकारे संबंधितांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ज्याअर्थी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली, त्याअर्थी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चितपणे उपलब्ध असणार. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि. १०.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे नमूद केले होते. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देताना अधिनियमातील

कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क योग्य त्या तपशीलासह त्यांना कळविणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशी कोणतीही कृती न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आता विनामूल्य माहिती देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख, रा.लोणी खु., ता. राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरुर,जि.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७०

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. जंगम शांतलींग रेवणसिध्द स्वामी, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
अतिक्रमण विभाग, महानगरपालिका,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.),
महानगरपालिका, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार,
महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.११.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही विवक्षित माहितीची मागणी केल्याचे दिसून येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "दि. ०६.०७.२००९ रोजी झालेल्या लोकशाही दिनात केलेली तक्रार सोबत जोडली आहे, त्यावर आपण आजपर्यंत काय कार्यवाही केली, याची सत्यप्रत मिळावी", अशाप्रकारची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांची पडताळणी केली असता, दि. ०६.०७.२००९ रोजीच्या लोकशाही दिनामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेला तक्रार अर्ज केल्याचे आढळून आले नसल्याचे व त्यामुळे माहिती देता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०८.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले अतिक्रमित बांधकाम पंधरा दिवसांच्या आत पोलीस संरक्षण मागवून काढून टाकण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु या नंतरच्या कालावधीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये दि.०६.०७.२००९ रोजी झालेल्या लोकशाही दिनाचा उल्लेख केला आहे. तथापि या लोकशाही दिनी अपिलार्थीने अशाप्रकारचा अर्ज त्यांच्याकडे केलेला नव्हता.अपिलार्थीने संदर्भित केलेल्या अर्जासारखाच दुसरा एक अर्ज दि. ०४.०२.२००८ रोजी झालेल्या लोकशाही दिनामध्ये अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात केल्याचे त्यांना नंतर आढळून आले आहे. सदरचा अर्ज हा आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना उद्देशून केला असून या अर्जामध्ये अपिलार्थीने, 'शिवदर्शन' अपार्टमेंट, बुरुड गल्ली, येथील मंजूर नकाशापेक्षा

जास्त असलेले बेकायदा बांधकाम तात्काळ काढण्यासंदर्भात त्यांनी आयुक्तांना विनंती केली होती. अपिलार्थीचा माहिती अधिकारांतर्गत केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होण्यापूर्वी सदरच्या बांधकामातील अतिक्रमण काढण्याकरिता आवश्यक असलेला पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असणाऱ्या इतर जन माहिती अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार केला होता, परंतु त्यांना आवश्यक तो पोलीस बंदोबस्त पुरविण्यात न आल्यामुळे त्यांना अद्यापपावेतो सदरचे अतिक्रमित बांधकाम काढता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. सदर प्रतिसाद योग्य आहे. तथापि अपिलार्थीस अपेक्षित असलेली, अतिक्रमित बांधकाम काढून टाकण्यासंदर्भातील माहिती त्यांना पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात अहमदनगर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाशी व संबंधित पोलीस प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भात त्यांच्याकडील कार्यालयीन टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, जेणेकरुन अपिलार्थीस ज्या विषयाशी संबंधित माहिती आवश्यक आहे, त्या प्रकरणाची सद्यस्थिती कळू शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जाच्या संदर्भात विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्या विषयासंदर्भातील कार्यालयीन टिपणीच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जंगम शांतलींग रेवणसिध्द स्वामी, "शिवदर्शन"अपार्टमेंट, ३३४७, बुरुडगल्ली, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.),महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७१

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. संजय राधाकिसन वल्लाकटी, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लिपिक,
कार्यालय, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

त्रयस्थ पक्ष : १) सदाशिव हातमाग सहकारी संस्था, २) भाग्यलक्ष्मी महिला औद्यागिक सह. संस्था, ३) रेणूका अन्नधान्य प्रक्रिया सह.संस्था म. ४) इंदिरा महिला नेटिंग गारमेंट सह.संस्था, म. ५) यशवंत वस्त्रोद्योग उत्पादन सह. संस्था म.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०६.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे सदाशिव हातमाग सहकारी संस्था, भाग्यलक्ष्मी महिला औद्यागिक सह.संस्था, रेणूका अन्नधान्य प्रक्रिया सह.संस्था, इंदिरा महिला

नेटिंग गारमेंट सह.संस्था व यशवंत वस्त्रोद्योग उत्पादन सह.संस्था या पाच सहकारी संस्थांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०७.२००९ रोजींच्या पत्रांद्वारे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संस्थांच्या सर्व संबंधित चेअरमन / सचिव यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे सूचित केले व सदर पत्रांच्या प्रती अपिलार्थीस अग्रेषित केल्या. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१५.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था,नगर तालुका,अहमदनगर यांनी दि. ०१.०९.२००९ रोजी आदेश पारित करुन, अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित संस्थांच्या चेअरमन / सचिव यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था यांना, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ,

नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थांविषयी सहकार उपनिबंधकांकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थांना उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपनिबंधक, सहकारी संस्था यांना अपिलार्थीस संबंधित संस्थांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे

आदेश देता येणार नाहीत. परंतु सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाने जिल्हा उपनिबंधकांकडे जी माहिती नियमितपणे सादर करणे त्रयस्थ पक्षास अनिवार्य आहे ती माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस पुरवता येईल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये अशा प्रकारची माहिती उपनिबंधकांकडे मागितली असेल तर या प्रकरणी त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय राधाकिसन वल्लाकटी,४०८३, चित्रा टॉकीजमागे, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, कार्यालय, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७२

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हवालदार शमशुद्दीन कासमभाई,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>ए.टी.यु.चाँद सुलतानाअँग्लो ऊर्दू हायस्कूल व<br>ज्युनिअर कॉलेज, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, अहमदनगर. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) H.M. उसनवार दिलेल्या रकमेच्या पावत्या (२) त्याकाळातील खतावणीवरील नोंदी सय्यद मेहरुन्नीसा (प्राचार्य) यांचे शाळेकडे उसनवार रकमेबाबत. प्राचार्य काळातील उसनवार दिलेले पावत्या व खतावणीच्या नोंदी. कालावधी १ ऑगस्ट १९९७ ते ५ डिसें. २००० अखेर.

पावत्यांच्या नकला, सन १९९७-९८ (२) ९८-९९,(३) ९९-२००० (४) ५ डिसेंबर २००० पर्यंतचा उसनवार दिलेल्याच्या नोंदी सर्व ॲटेस्टेड कॉपीस मिळाव्यात.(खतावणीवरील नोंदीच्या कॉपीज.)"

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.अहमदनगर यांच्याकडे दि. १७.०८.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.१०.२००९ रोजी निर्णय घेऊन सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०८.२००९ व ०६.१०.२००९ रोजी संपूर्ण माहिती व्यक्तिशः जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष हस्तांतरित केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.०८.२००९ रोजी काही माहिती विनामूल्य प्राप्त झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेल्या सुनावणीच्यावेळी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ११ पृष्ठांची माहिती दि.

०६.१०.२००९ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. ही माहिती प्राप्त करुन घेत असताना अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार नाही, असे आपले अभिप्राय लिहून दिले आहेत. परंतु यानंतर ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणती माहिती द्यावयाची राहिलेली आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित नाहीत. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे, याचाही उल्लेख त्यांनी केलेला नाही. हे पाहता, आवश्यक त्या तपशीलाच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हवालदार शमशुद्दीन कासमभाई,सिटीझन कन्स्ट्रक्शन, मेहरुन्नीसा मेन्शन, मुकुंदनगर,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,ए.टी.यु.चाँद सुलताना अँग्लो ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७३
निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. एन.सी.शेख, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१०.२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेले संपूर्ण दस्तऐवज त्यांना प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बीड येथे १२५ पोलीस शिपायांसाठी निवासस्थान बांधण्याच्या कामाच्या फायनल बील सोडून सर्व बीलांची व यु.एस.आर.च्या सर्टीफाईड कॉपीज, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. ११.०८.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास त्यांनी दि. ०९.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३२८/- अधिक टपालखर्च रु. १६५/- असे एकूण रु. ४९३/- इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या प्रतिनिधीमार्फत माहिती हवी असल्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन माहितीपोटीचे शुल्क रु.३२८/-(टपालखर्च वगळून)इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले व दि. ०१.१०.२००८ रोजी त्यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. ०३.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिलेले नाहीत. केवळ उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड, भांडारपाल व लेखापाल यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सुनावणीच्या वेळी त्यांच्या निदर्शनास आणल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी कथित निर्णय पारित केला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, यु.एस.आर.च्या प्रती या मुद्यावरील माहिती वगळता

उर्वरित संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या यु.एस.आर.च्या प्रती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना सापडत नसल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो संपूर्ण माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीस अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून यु.एस.आर.च्या प्रती मिळणे बाकी आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त होणे बाकी असलेल्या यु.एस.आर.च्या प्रतींची संख्या जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर सांगू शकले नाहीत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी, आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी केलेल्या विनंतीनुसार, अपिलार्थीस यु.एस.आर.च्या प्रतींचा पुनश्च् शोध घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसांची मुदत देण्यात येऊन असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो न दिलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीत अपिलार्थीस अद्यापपावेतो न देण्यात आलेल्या यु.एस.आर.च्या प्रती शोध घेऊनही त्यांना जर सापडल्या नाहीत तर ज्या कर्मचाऱ्यावर/अधिकाऱ्यावर या प्रती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी होती, त्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर त्यांना आवश्यक वाटल्यास फौजदारी/प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एन.सी.शेख,रा.बुरुडगाव रोड,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७४

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. राम नागूशेठ धोत्रे, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेमध्ये माहिती न देता अपूर्ण माहिती पुरविली असल्यामुळे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची वेळेत सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगर तालुक्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीची दि. ०१.०१.२००८ ते २३.१०.२००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - निवडणूक झालेल्या ग्रामपंचायतीचे नाव, उमेदवारांची संख्या, निवडणूकीची तारीख, निवडणूक अधिकाऱ्याचे नाव व पदनाम, निवडणूकीची कागदपत्रे जमा केल्याचा दिनांक, कागदपत्रे जमा न करणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्यांची नावे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या २६ पृष्ठांच्या माहितीपोटीचे शुल्क - प्रतिपृष्ठ रु. २/- प्रमाणे रु.५२/- व नकलेच्या स्वरुपात माहिती हवी असल्यास प्रतिपृष्ठ रु. १०/- याप्रमाणे रु. २६०/- इतके भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.१२.२००८ व १४.०१.२००९ रोजी अशी दोन वेळा सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी होऊ शकली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.१२.२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविली. ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे व अपूर्ण असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी २६ पानांची माहिती देण्यात येत असल्याचे त्यांच्या पत्रामध्ये नमूद करुन प्रत्यक्षात फक्त १६ पृष्ठांची माहिती त्यांना प्राप्त झाली. तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने प्राप्त झालेली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी संपूर्ण माहिती एकत्रितरित्या १६ पृष्ठांद्वारे पुरविली आहे. आवश्यक त्या मनुष्यबळाअभावी ग्रामपंचायतीच्या निवडणूकांच्या वेळी एका अधिकाऱ्याकडे एकाहून जास्त निर्णय अधिकाऱ्याचे काम सोपविण्यात आले होते. त्यामुळे अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या पृष्ठांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने त्यांनी १६ पृष्ठांची माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सर्व माहितीशी संबंधित माहितीचा समावेश आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदींप्रमाणे दि. २३.११.२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे भाग होते. परंतु या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.११.२००८ रोजी माहितीपोटीचे शुल्क भरण्याबाबतचे दिलेले पत्र प्रत्यक्षात अपिलार्थीस दि. ०२.१२.२००८ रोजी म्हणजेच, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिलेले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. जन माहिती अधिकारी यांचे दि. १२.११.२००८ रोजीचे पत्र प्रत्यक्ष पोस्टात टाकण्यासाठी त्यांच्या सहायकांना एकूण २० दिवसांचा कालावधी लागला आहे. त्यांना लागलेला हा कालावधी, सर्वसाधारण परिस्थितीत अशाप्रकारचे काम करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीपेक्षा, निश्चितपणे जास्त आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे दि. १२.११.२००८ रोजीचे पत्र प्रत्यक्षात दि. ०२.१२.२००८ रोजी निर्गमित करणारे जन माहिती अधिकारी यांचे संबंधित सहायक/कर्मचारी हे या प्रकरणी जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी

स्वतःला अधिनियमातील २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब तहसीलदार, अहमदनगर यांना जन माहिती अधिकारी यांच्या संबंधित सहायकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने, अपिलार्थीस २६ पृष्ठांची माहिती देणे अपेक्षित असताना जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात १६ पृष्ठांची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर दोन वेगवेगळया ग्रामपंचायतीच्या व एकाच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या संदर्भातील माहिती एकाच पृष्ठाद्वारे त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. प्रत्यक्षात त्यांच्याकडील अभिलेख्याप्रमाणे ग्रामपंचायतनिहाय अशाप्रकारचे अभिलेखे ठेवले असल्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस उर्वरित दहा पृष्ठांची माहिती (जरी माहितीची पुनरावृत्ती होत असली तरीही) विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी उर्वरित दहा पृष्ठांची माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. तहसीलदार, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे संबंधित सहायक/ कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राम नागूशेठ धोत्रे,४२३३,पापय्या गल्ली, चितळेरोड,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०१

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. दादा गुलाब देशमुख व : अपिलार्थी
श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे,
लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक
२) कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण १७ मुद्यांवरील माहिती मागितली होती. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नंतर प्रथम अपील केले. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ मधील शाखा अभियंत्यांच्या वास्तव्यांच्या पुराव्यासंदर्भात एकूण ३३ पैकी १७ जणांच्या संदर्भात माहिती देण्यात आली होती.उर्वरित शाखा अभियंत्यांच्या वास्तव्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी

यांनी माहिती देण्याचे आश्वासित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या मुद्यावरील माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू ऐकून न घेता माहिती अधिकाऱ्यास पाठीशी टाकले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त असलेली माहिती प्राप्त होईपर्यंत प्रतिदिनी रु. २५०/- इतकी शास्ती माहिती अधिकाऱ्यास लावावी व लागू असलेल्या सेवानियमांच्या तरतुदीनुसार त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करावी. अपिलार्थीने या अर्जाद्वारे आपल्या कथित अपूर्ण माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या १७ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. १ ते ८ च्या संदर्भातील माहिती,अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाशी व उर्वरित माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. त्याप्रमाणे संबंधितांनी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे दि. ०६.१२.२००८ रोजी व दि. २१.१२.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदरच्या शुल्काच्या भरणा मनीऑर्डरद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. सदरचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर अधीक्षक अभियंता कार्यालयाने अपिलार्थीस त्यांच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थी ही माहिती अधीक्षक अभियंता कार्यालयाकडून घेऊन गेले नाहीत. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दि. २१.०१.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

२०.०३.२००९ रोजी निर्णय देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. २१.०१.२००९ रोजी दिली आहे.

अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक ती माहिती दि. २७.०१.२००९ रोजी घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी ही माहिती त्यांच्याकडून घेऊन जाण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोनही जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः मिळाली नसल्याने आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "शाखा अभियंते हे बदलीच्या ठिकाणी शासकीय निवासस्थानामध्ये राहतात कि खाजगी भाडोत्री निवासस्थानात, त्यांच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून भाडे पावती,गॅस कार्ड,लाईट बीलाच्या प्रती",

अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीच्या या मुद्यातील शाखा अभियंते हे खाजगी की भाडयाच्या निवासस्थानात राहतात, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती"या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अथवा त्यांच्या कृती अथवा निर्णयाबद्दल स्पष्टीकरण व कारणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जादारास त्यांच्या कृतीबद्दलची आणि निर्णयाबद्दलची कारणे/स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या माहितीच्या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या या मुद्यातील उर्वरित भागासंदर्भात त्यांनी संबंधित शाखा अभियंता यांच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून त्यांच्या भाडेपावत्या, लाईट बीले, गॅस कार्ड अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती पूर्णतः त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबींशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाखा अभियंत्यांच्या खाजगी निवासस्थानाच्या भाडेपावत्यावरुन त्यांना घरभाडे भत्ता अदा करणे, अशाप्रकारची कार्यपध्दती प्रचलित नाही. लाईट बील, गॅस कार्ड ही माहिती संबंधित त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती आहे. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची नाही, अशाप्रकारची त्रयस्थ पक्षाशी संबंधित खाजगी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षपणे ताब्यात असणे, हे प्रचलित शासकीय कार्यप्रणालीनुसार मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ मधील या भागावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ज्या मुद्यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे त्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही आणि त्याचबरोबर अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणातील हा मुद्दा

निकाली निघत आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२३

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. राजेंद्र रामचंद्र नगरकर, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शहर अभियंता,
बांधकाम विभाग, महानगरपालिका,अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.११.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना बांधकाम विभागाने विहित वेळेमध्ये माहिती दिली नाही व मुदत संपल्यानंतर १५ दिवसांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आनंदनगर प्लॉट नं. ३९ पासून टाकलेल्या ड्रेनेज लाईन इस्टीमेटची कॉपी, त्या कामाबद्दल जनरल बॉडीने केलेला ठराव व उपनगरात ड्रेनेज लाईन मंजूरी दिलेली शासनाची

कॉपी आणि काम कोणत्या ठेकेदारास दिले, त्या वर्कऑर्डरची कॉपी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०७.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परिपूर्ण माहिती सात दिवसांच्या आत देण्याचे सूचित कले व अपिलार्थीचे अपील मान्य केले. यानंतर अपिलार्थीस दि. १९.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती पुरविली. तथापि ही माहिती दिशाभूल करणारी प्राप्त झाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ५४ दिवस उशिराने माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून महानगरपालिकेच्या ठरावाची प्रत प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कार्यारंभ आदेशाची प्रत वगळता उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस दि. २९.०५.२००८ रोजी पुरविली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी दि. १९.०७.२००८ रोजी अपिलार्थीस कार्यारंभ आदेशाची प्रत पुरविली. महानगरपालिका कायद्यांतर्गत काही विशिष्ट मर्यादेच्या आतील किमतीच्या कामास मंजूरी देण्याचे आयुक्तांना स्वेच्छाधिकार

प्रदान करण्यात आलेले आहेत. त्या अधिकारानुसार अपिलार्थीने त्यांच्या अर्जात संदर्भित केलेल्या कामास आयुक्तांनी मान्यता दिली आहे. म्हणून या कामाकरिता नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची अथवा शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जातील ड्रेनेज लाईनच्या अंदाजपत्रकाची प्रत, जनरल बॉडीचा ठराव, शासनाची मान्यतेची प्रत व ठेकेदाराला काम दिल्याच्या कार्यारंभ आदेशाची प्रत एवढीच माहिती देय होत आहे. यापैकी शासनाच्या मान्यतेची प्रत व जनरल बॉडीचा ठराव ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. परंतु त्याऐवजी या कामाचा त्यांनी आयुक्तांकडे सादर केलेला प्रस्ताव व आयुक्तांनी या प्रस्तावास दिलेली मान्यता यासंदर्भातील अभिलेख्यांची टिपणीची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती संपूर्ण माहिती दि. २९.०५.०८ व १९.०७.०८ रोजी प्राप्त झालेली आहे. ही माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती दिलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जनरल बॉडीचा ठराव व शासन मान्यतेची प्रत या दोन मुद्यांवर अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीस वाटत आहे. तेव्हा यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली कामे, महानगरपालिका आयुक्तांच्या ज्या अधिकाराखाली पूर्ण करण्यात आली व असे अधिकार शासनाने महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार आयुक्तांना प्रदान केले आहेत, त्या कलमाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, जेणेकरुन अपिलार्थीच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होईल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर

या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे अपिलार्थीचे कर्तव्य होते. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याबाबतचा एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय असे विचारले असता, त्यांनी अशाप्रकारचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. यावरुन अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे त्यांचे उत्तरदायित्त्व त्यांनी योग्यप्रकारे पार पाडले नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणतेही आदेश आयोग पारित करीत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी येथून पुढे सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक 02-03-2010**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र रामचंद्र नगरकर,१३२, गंजबाजार,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,बांधकाम विभाग, महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२४

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (परिमंडळ),<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०७.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.०४.२००७ रोजी दाखल झालेल्या गुन्हयाच्यासंदर्भात खालीलप्रमाणे एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

"(१) दि. ११-१०-०७, १२-१०-०७,१७-१०-०७ व दि.२०-१०-०७ च्या पोलीस कस्टडी रिमांडच्या सत्यप्रती.

(२) सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर पाठविलेल्या स्पेशल रिपोर्टची प्रत व त्यानुसार वरिष्ठांनी गुन्हयांस भेट देवून, दिलेल्या सुचनांची सत्यप्रत. व त्यानुसार तपास करण्यांत आला अगर कसे? याबाबत माहिती.

(३) सदर गुन्हयातील फिर्यादी हिने तिला मुंबईत विकण्यासाठी नेत होते असा आरोप केलेला आहे त्या अनुषंगाने तपासी अंमलदारांनी मुंबई किंवा इतरत्र जावून ज्या साक्षीदारांना विचारपुस केली त्यांचे जबाबाच्या सत्यप्रती.

(४) सदर गुन्हयातील फिर्यादी हि सावित्रीबाई फुले सुधार गृह,औरंगाबाद येथे आहे. तिचे वर्तणूकीबाबत किंवा इतर बाबत तेथील अधिक्षकांनी क्रांतीचौक पोलीस स्टेशनला किंवा राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,औरंगाबाद यांना वेळोवेळी जे रिपोर्ट किंवा अहवाल पाठविले त्याच्या सत्यप्रती. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.०२.२००८ रोजी सशुल्क माहिती प्राप्त झाली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या

संदर्भातील माहिती त्यांना आता आवश्यक नाही. उर्वरित मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे सर्वसाधारण परिस्थितीत ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी कोणतीही हरकत असू नये. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील तपासी अंमलदाराने ज्या साक्षीदारांकडे यासंदर्भात विचारपूस केली आहे त्या साक्षीदारांची नावे व पत्ते वगळून, उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास हरकत नसावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित संपूर्ण व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहितीतील साक्षीदारांची नावे व पत्ते वगळता उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. ३ मधील साक्षीदारांची नावे व पत्ते वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, प्लॉट नंबर ५८, गुरुकूल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,शहर विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (परिमंडळ),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२६

निर्णय दिनांक : ०२.०३.२०१०

१. श्री. शेख महेबुब हुसेन, : अपिलार्थी
रा.बाळमटाकळी, ता.शेवगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
भूकरमापक, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,
शेवगाव, जि.अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक,
भूमी अभिलेख, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
शेवगाव, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०२.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०९.०२.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार

नाही व पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे विचाराधीन अपील आयोगाने निकाली काढावे.

अपिलार्थीची सदर विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख महेबुब हुसेन, रा.बाळमटाकळी, ता.शेवगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शेवगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३९
निर्णय दिनांक ०२.०३.२०१०

१ श्री. केशव लक्ष्मण बरकते, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

१ जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : व्यवस्थापक, रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था, अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रावसाहेब पटवर्धन सहकारी संस्था,अहमदनगर या संस्थेसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित संस्थेस पाठवून त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली. तथापि सदर पतसंस्थेने

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी आपले आदेश दि.३०.०३.२००९ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व संबंधित संस्थेच्या व्यवस्थापकास अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडील माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्थेशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडील दि.०९.०२.२००९ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित संस्थेच्या व्यवस्थापकाकडे पाठवून अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले होते. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.६८३१/२००९, रावसाहेब नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित विरुध्द जन माहिती अधिकारी / सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर या एका वेगळ्या प्रकरणामध्ये त्यांना सदर पतसंस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणतेही निर्देश दि.२९.०६.२०१० पर्यंत न देण्याचे त्यांच्या दि.०१.०२.२०१० रोजीच्या आदेशाव्दारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे

की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि. १३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयाचा आधार घेऊन यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णयही विचारात घेणे आवश्यक आहे.

"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील

असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेशी संबंधित माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव लक्ष्मण बरकते, कांताबाई फुलसैदर चाळ, भोसले आखाडा, बुरुडगांव रोड, अहमदनगर.

२. सहायक निबंधक सहकारी संस्था, नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८००
निर्णय दिनांकः ०२.०३.२०१०

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
संत ज्ञानेश्वर डी.एड.कॉलेज,मुकुंदपुर (नेवासा फाटा), ता.नेवासा,जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी,
संत ज्ञानेश्वर डी.एड.कॉलेज,मुकुंदपुर (नेवासा फाटा), ता.नेवासा,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतुदीनुसार प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये संत ज्ञानेश्वर डी.एड.कॉलेज,मुकुंदपुर (नेवासा फाटा), ता.नेवासा, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या

तरतुदी त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्यामुळे अपिलार्थीचा सदर अर्ज निकाली काढला. संबंधित महाविद्यालयाकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने परत त्याच महाविद्यालयाकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही संबंधित महाविद्यालयाकडून न झाल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित महाविद्यालयाचे प्रतिनिधी त्यांच्या वकिलासह आयोगासमोर उपस्थित आहेत.

संत ज्ञानेश्वर डी.एड.कॉलेज, नेवासा फाटा (मुकुंदपुर) ता.नेवासा,जि.अहमदनगर तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे महाविद्यालय हे पूर्णतः त्यांनी उभारलेल्या निधीतूनच चालविले जात आहे. त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळत नाही व त्यांच्या महाविद्यालयास कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर मान्यता मिळाली आहे. तसे शपथपत्र संस्थेच्या अध्यक्षांनी आयोगास सादर केले आहे.

यासंदर्भात सर्व उपस्थितांना आयोगातर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, अशाप्रकारच्या प्रकरणांसंदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले

असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०२.०३.२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, घर नं. २०/८, गजानन हौसींग सोसायटी (जुना मुकूंदनगर) औरंगाबाद रोड, अहमदनगर-४१४ ००१.

२. प्राचार्य, संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय (मराठी माध्यम), मुकुंदपुर, नेवासा फाटा,ता. नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२२
निर्णय दिनांक ०२.०३.२०१०

१ श्री. संजय केशव नागोडे, : अपिलार्थी
रा. दिघी, ता.नेवासा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
नेवासा, जि.अहमदनगर

१ जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : चेअरमन,
दिघी विविध कार्यकारी सेवा सहकारी
सोसायटी मर्यादित, दिघी, ता.नेवासा,
जि. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे दिघी वि.का.से.सोसायटी,मर्या.अहमदनगर या संस्थेसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, नेवासा,जि.अहमदनगर यांच्याकडे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी म्हणजे दि. २२.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये, सहायक निबंधक सहकारी संस्था,नेवासा यांनी संबंधित संस्थेस अपिलार्थीस परस्पर

माहिती देण्याचे सूचित करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली व अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.१४.०८.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित सहकारी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था यांना, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेविषयी माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपनिबंधक, सहकारी संस्था यांना अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे आदेश देता येणार नाहीत. परंतु सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाने जिल्हा उपनिबंधकांकडे जी माहिती नियमितपणे सादर करणे त्रयस्थ पक्षास अनिवार्य आहे ती माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस पुरवता येईल.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये अशाप्रकारची माहिती उपनिबंधकांकडे मागितली असेल तर या प्रकरणी त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे, त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय केशव नागोडे,रा. दिघी, ता.नेवासा,जि.अहमदनगर

२. सहायक निबंधक सहकारी संस्था, नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५०
निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री.सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी
मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, महात्मा गांधी निवासी अपंग विद्यालय,
गांधीनगर, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी, गट-अ,
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २६-०२-२०१० रोजीचे एक पत्र जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज

केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०३-२००९ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून, आता या अपिलावर त्यांचे काहीही म्हणणे नाही. या अर्जामध्ये त्यांनी अंतिमत: आयोगास त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील निकाली काढण्याची आयोगास केलेली विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ६५०/२००९, दिनांक ०६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी निवासी अपंग विद्यालय, गांधीनगर, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४३

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. बबन विश्वनाथ सोनवणे, : अपिलार्थी

रा. फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, प्रादेशिक परिवहन

महामंडळ कार्यालय, सिडको, एन-१, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक परिवहन महामंडळ

कार्यालय, सिडको, एन-१, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ सांख्यिक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, सिडको, औरंगाबाद

प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, सिडको, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मिलिंद बंड (विभाग नियंत्रक)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. मिलिंद बंड यांच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. मिलिंद बंड यांच्या विरोधात सन २००५ ते २००८ या कालावधीत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या झेरॉक्स प्रती, तक्रारीची चौकशी करण्यात आली असेल तर चौकशीचा अहवाल, अपिलार्थीने दिनांक २०-०७-२००५ रोजी महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ, मुंबई यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द केलेल्या तक्रारीवर झालेल्या कारवाईची झेरॉक्स प्रत व त्रयस्थ पक्षाची शैक्षणिक पात्रता आणि त्यांच्या पदोन्नतीबाबतचा आढावा - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्रयस्थ पक्ष श्री. मिलिंद बंड यांच्या विरुध्द एकही तक्रार त्यांच्याकडे प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, औरंगाबाद यांच्याकडून माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात, विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी, राज्य परिवहन, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून परस्पर माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या

अशा प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेल्या वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्रामध्ये, त्रयस्थ पक्षासंदर्भात त्यांच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही, असे कळविले आहे. त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द मूळात तक्रार दाखल झाली नसल्यामुळे प्रादेशिक महामंडळ कार्यालयाकडून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ संदर्भात त्यांना असे कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अशी कार्यवाही केली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती, ही विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, औरगाबाद यांच्याशी संबंधीत होती असे जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आणि तसे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन, औरंगाबाद यांची अपिलार्थीस माहिती देण्याची अशा प्रकारची पध्दत चुकीची आहे. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी जर संबंधित नव्हती तर त्यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या

अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, संबंधित विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, औरंगाबाद यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे, त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे व परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्यामुळे आता प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन, औरंगाबाद प्रदेश यांना या मुद्यावरील माहिती आता अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी व विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन, औरंगाबाद यांच्यातर्फे विनादिनांकाच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली गेली आहे ती माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००९ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्रयस्थ पक्षाच्या ' पदोन्नतीबाबतचा आढावा ' अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. परंतु पदोन्नतीबाबतचा आढावा म्हणजे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा त्यांनी या परिच्छेदामध्ये केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाच्या ' पदोन्नतीबाबतचा आढावा ' ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली व अपिलार्थीस पुरविलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांना अद्यापपर्यंत पुरविली गेलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, जर त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवर चौकशी होऊन अंतीम निर्णय झाला असेल तर, अंतीम निर्णय

अपिलार्थीस कळवावा आणि जर अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर कोणतीही कारवाई झाली नसेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे, असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बबन विश्वनाथ सोनवणे, रा. फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सांख्यिक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४४

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. कृष्णदास शंकरराव सोमासे, : अपिलार्थी

ई/३०-१-२, गुलमोहर कॉलनी, सिडको, एन-५, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. आर. शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. जे. एस. शेरे,

सहायक संचालक, सामाजिक वनीकरण यांच्या प्रवासभत्त्याच्या बिलासोबत त्यांनी जोडलेल्या बस तिकिटांच्या छायांकित प्रती त्यांना प्राप्त झालेल्या नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक १०-११-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील जून २००७ ते फेब्रुवारी २००८ या कालावधीशी संबंधित, त्रयस्थ पक्ष यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्ष श्री. डी. आर. शिंदे, माजी लागवड अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रकरणी दोषारोप सिध्द झाल्याचे उप संचालक, सामाजिक वनीकरण यांना ज्या आदेशान्वये कळविले गेले आहे त्या आदेशाची प्रत, सह संचालक यांनी आदेशित केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्ष श्री. डी. आर. शिंदे यांच्याकडून ३०,००० रुपये वसूल केले असल्यास, ज्या चलनाव्दारे पैसे बँकेत भरणा केले त्या चलनाची प्रमाणित छायांकीत प्रत, त्रयस्थ पक्ष श्री. जे. एस. शेरे सहायक संचालक, इत्यादींच्या सप्टेबर २००६ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या प्रवासभत्ता देयकाच्या प्रती व यासोबत जोडलेल्या बस तिकिटांच्या छायांकित प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती सशुल्क पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-१२-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्रयस्थ पक्ष श्री. जे. एस. शेरे यांच्या प्रवासभत्ता देयकासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिलेल्या बस तिकिटाच्या छायांकित प्रती या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. जे. एस. शेरे यांची प्रवासभत्ता बिले मंजूर होताना श्री. जे. एस. शेरे यांनी त्यांच्या प्रवासापृष्ठ्यर्थ प्रवासाच्या तिकिटांच्या प्रती त्यांच्या बिलासोबत जोडल्या नव्हत्या त्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती व आताही ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. जे. एस. शेरे यांनी सप्टेबर २००६ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीमध्ये केलेल्या प्रवासाच्या प्रवासभत्त्याच्या बिलासोबत त्यांनी जोडलेल्या बस तिकिटांच्या छायांकीत प्रती हव्या आहेत असे आढळून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, श्री. जे. एस. शेरे यांनी त्यांच्या प्रवासभत्त्याच्या बिलासोबत अशा प्रकारच्या बस तिकिटांच्या प्रती जोडल्या नव्हत्या. श्री. जे. एस. शेरे यांच्या प्रवासभत्त्याची बिले ही बस तिकिटाच्या शिवाय मंजूर झाली आहेत हे पाहता, अपिलार्थीस आता अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही हे उघड आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस श्री. जे. एस. शेरे यांच्या प्रवास बिलाच्या संदर्भात, त्यांनी श्री. जे. एस. शेरे यांची प्रवासभत्त्याची बिले बसच्या तिकिटा-शिवाय मंजूर झाली आहेत अशी माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या

आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही व्यक्तिशः मागितली असल्यामुळे, ही माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थीस उपरोक्त कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ती संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कृष्णदास शंकरराव सोमासे, ई/३०-१-२, गुलमोहर कॉलनी, सिडको, एन-५, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, प्लॉट नं. २४२, सिडको, एन-३, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४५

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. माने सोनाजी रघुनाथ, : अपिलार्थी

४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी श्री. तुळशीराम रुंजाबा साळवे यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २२-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याने त्यांची या प्रकरणी कोणतीही

तक्रार राहिलेली नाही. या पत्रामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे केलेले अपील हे ते मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ६४५/२००९, दिनांक २४-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माने सोनाजी रघुनाथ, ४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४६

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र भागीनाथ बत्तिसे,<br>मु. पो. टेंभी, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रकल्प व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे<br>विकास महामंडळ मर्यादित, मुंबई - ६६ | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ<br>साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई - ६६ | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. सं. शं. इंगळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम १८ (ग) नुसार शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " त्रयस्थ पक्ष श्री. सं. शं. इंगळे यांना दिनांक १९-१०-२००६ रोजी निलंबीत केले असताना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची प्रत, साक्षीदारांची यादी, जोडपत्र चार या दस्तऐवजाची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सोबत माहिती जोडली आहे असा उल्लेख करुन माहिती दडपण्याचा प्रयत्न होतो हे टाळावे " अशा स्वरुपाची माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, औरंगाबाद हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०१-१२-२००८ रोजी व्यवस्थापकीय संचालकांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देणे आवश्यक आहे अशी टिपणी सादर केली होती. तथापि या टिपणीवर तत्कालीन

व्यवस्थापकीय संचालक यांनी ' अपिलार्थी श्री. बत्तिसे यांनी मुख्यालयात येऊन त्यांनी केलेले अपील माघारी घेतो असे सांगितले. व्यवस्थापकीय संचालकांनी पुन्हा दूरध्वनी करावा ' असे अभिप्राय नोंदवून ही टिपणी त्यांना परत केली.

वरील घटनाक्रम, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे, त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत नसावी. आज रोजी त्रयस्थ पक्षास सुनावणीस उपस्थित राहण्याचे जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत सूचित करुनही संबंधित त्रयस्थ पक्ष आयोगासमोर उपस्थित राहिले नाहीत. हे पाहता अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र भागीनाथ बत्तिसे, मु. पो. टेंभी, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई - ६६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई - ६६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४७

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. विजेंद्र कचरु खरात, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३८२, काबरानगर, सूत गिरणीच्यामागे, गारखेडा
परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप आयुक्त, मालमत्ता विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सिडको) , महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मालमत्ता अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी औरंगाबाद शहरातील जाफरगेट कडबा मंडी येथील सिटी सर्वे नंबर १२९६० येथील २५००० चौरस फूट भूखंडाविषयी चौकशी अधिकारी म्हणून उप आयुक्त

श्री.सोमनाथ शेटे यांनी चौकशी करुन सादर केलेल्या चौकशी अहवालाची छायांकीत प्रत मागितली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांना आयोगाकडे विचाराधीन अपील सादर करावे लागले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी या टप्प्यावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन याच कालावधीमध्ये आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. विजेंद्र कचरु खरात, प्लॉट नं. ३८२, काबरानगर, सूत गिरणीच्यामागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको) , महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४८

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष लक्ष्मणराव महाजन,<br>रा. दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये रस्ते अनुदानाअंतर्गत एकूण मिळालेले अनुदान, या अनुदानातून शहरात केलेल्या विविध कामाच्या नकला, कामनिहाय झालेला खर्च, कामाची अंदाजपत्रके, कामनिहाय जाहीर प्रगटन, कामाच्या

अनामत रकमेच्या पावत्याच्या नकला, टेंडरसाठी भरलेल्या नकलांच्या पावत्या व एम. बी. नं. ९४ मधील पृष्ठ क्रमांक ६७, ३८, ७२ व ७४ च्या नकला - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०१-२००९ रोजी आपले आदेश पारीत केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे " कामाच्या नकला " अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि " कामाच्या नकला " म्हणजे नेमके काय व यासंदर्भात अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा कोणताही खुलासा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील " कामाच्या नकला " ही माहिती अपिलार्थीस, ती मोघम स्वरुपाची असल्याने, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील " कामाच्या नकला " ही माहिती

वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील " कामाच्या नकला " ही माहिती वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष लक्ष्मणराव महाजन, रा. दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४९

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. मुखतार अहेमद खान पि. सुभान खान, : अपिलार्थी
द्वारा, महागुजरात रोडवेज, जुना मोंढा, जाफर गेट जवळ,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, उर्दू हायस्कूल, संजयनगर, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २५-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण

माहिती त्यांना आता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्यामुळे, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती केली असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६४९/२००९, दिनांक ३१-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुखतार अहेमद खान पि. सुभान खान, द्वारा, महागुजरात रोडवेज, जुना मोंढा, जाफर गेट जवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, उर्दू हायस्कूल, संजयनगर, बी-११, बायजीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५१

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. मुहम्मद अब्दुल जाहेर अमजद पि. महमद याकूब, : अपिलार्थी
रा.घर नं. ९-१-३९, गनीमपूरा, (पोस्ट ऑफीस इतवारा),
नांदेड- ४३१६०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता (पाणी पुरवठा), नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व पुढे त्यामुळे संबंधितांच्यावर खोटी माहिती दिल्याबद्दल कडक शासन व्हावे आणि अपिलार्थीस सत्य माहिती मिळावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नवीन घर क्रमांक ९-१-३८ मुहंमद याकूब म. इस्माईलमध्ये

पाण्याच्या नळाचा ग्राहक क्रमांक व पाणी पुरवठ्यासाठी नावावर नळ घेण्यासाठी संबंधितांनी नळ जोडणी घेतांना महानगरपालिकेत दाखल केलेली कागदपत्रे, नकाशा व या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण नस्तीची नक्कल, पाण्याच्या नळावर लावण्यात आलेल्या विशेष पाणी कर व या संदर्भातील कागदपत्राच्या नकला, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीचा हा अर्ज संबंधित उप अभियंता यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या दिनांक २१-१२-२००८ रोजीच्या पत्रान्वये सहायक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय क्रमांक ३ यांच्याकडे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भीत केलेले घर क्रमांक ९-१-३८ ला नळ जोडणी केली का व ते विशेष पाणी कर भरतात का अशा स्वरुपाची माहिती विचारली. यावर सहायक आयुक्त यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे मालमत्ता क्रमांक ९-१-३८ महानगरपालिका, नांदेड या मालमत्तेवर २००८ - २००९ या वर्षासाठी १००/- रु. इतकी सामान्य पाणीपट्टी लावण्यात आली असल्याचे त्यांना कळविले आहे व या संदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपिलार्थीस पुरविली. या कागदपत्रामध्ये, नळ व भूमिगत गटार नाही, असा या बांधकामासंदर्भात उल्लेख केल्याचे आढळून येते. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी श्री. सी. आर. देशमुख यांना अपिलार्थीस विशेष पाणी कराबाबत दोन दिवसात माहिती देण्याचे सूचित केले. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही विशिष्ट स्वरुपाचा निर्णय न देऊन त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या बैठकीचे इतिवृत्त आयोगास सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने नांदेड शहरातील घर क्रमांक ९-१-३८ च्या पाणी जोडणी संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेल्या नस्तीच्या प्रतीची व त्यावर आकारण्यात येणाऱ्या करासंदर्भात काही माहिती मागविली होती. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या नळ जोडणीवर त्यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या कर आकारणीची माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण नस्तीची नक्कल अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीच्या सर्व छायांकित प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला कथित अपील निर्णय म्हणजे, अपिलावर निर्णय कशा प्रकारे असू नये याचा उत्तम नमुना आहे, असे येथे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपले अभिप्राय व्यक्त करुन नंतर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय देणे सर्वसाधारण

परिस्थितीत बरोबर आहे, परंतु या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या नळ जोडणीसंदर्भात माहिती मागविली आहे ती जोडणी अनधिकृत असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तेव्हा या संदर्भात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी मालमत्ता क्रमांक ९-१-३८ ला दिलेल्या नळ जोडणीच्या प्रकरणासंदर्भात त्यांनी वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुहम्मद अब्दुल जाहेर अमजद पि. महमद याकूब, घर नं. ९-१-३९, गनीमपूरा, (पोस्ट ऑफीस इतवारा), नांदेड- ४३१६०४

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (पाणी पुरवठा), नांदेड वाघाळा शहर

महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५२

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख मुख्तार शेख नुरअली,<br>पो. हे. कॉ. ब. नं. ४१ नेमणुक, पो. स्टे. माहूर,<br>ता. माहूर, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस मुख्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्याचे कारण दर्शवून विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, " साक्षांकन नमुन्यात खोटी माहिती भरुन दिल्या संदर्भात करण्यात आलेल्या आरोपात खात्यामार्फत कार्यालयाच्या स्थळावर अपिलार्थीस कोणत्या प्रकारची शिक्षा देण्यात आली आहे त्याबाबतची तपशीलवार माहिती," अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, " त्यांनी साक्षांकन फॉर्ममध्ये खोटी माहिती दिल्याने त्यांची सेवा समाप्त करुन त्यांना एक महिना नोटीसच्या ऐवजी एक महिन्याचे वेतन सर्व भत्ते धरुन पोलीस अधिनियम १९५९ मधील नियम क्रमांक ७८ (३) प्रमाणे मंजुर करण्यात आले," अशी माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मुद्यांवर अचूक माहिती दोन दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००९ रोजी," खात्यामार्फत कार्यालयाच्या स्थळावर साक्षांकन नमुन्यात खोटी माहिती दिल्याने सेवामुक्त करण्यात आलेले आहे. त्या शिवाय कोणतीही शिक्षा दिली नाही, " असे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी राजीनामा दिला नसताना राजीनाम्याचे कलम त्यांना लावून त्यांची सेवामुक्तता करण्यात आली. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे नांदेड पोलीस दलात फेब्रूवारी १९८४ मध्ये पोलीस शिपाई म्हणून नियुक्त झाले होते. त्यावेळी त्यांनी भरुन दिलेल्या साक्षांकन फॉर्ममधील अनुक्रमांक १० च्या समोर त्यांच्या विरुध्द कोणताही खटला प्रलंबित नाही, अशी त्यांनी माहिती दिली होती. परंतु तदनंतर अशी वस्तुस्थिती उघडकीस आली की, अपिलार्थीच्या पोलीस दलातील नियुक्तीपूर्वी सन १९८३ मध्ये त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन, शिवाजीनगर, नांदेड येथे गुन्हा रजिस्टर नंबर १७१/८३ मध्ये कलम ४४७, ३२४ व ३४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल झालेला होता व या गुन्ह्यांबद्दल त्यांच्याविरुध्द दिनांक २०-१२-१९८३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. यानंतर अपिलार्थीस कनिष्ठ कोर्टाने शिक्षा दिल्यानंतर अपिलार्थीने सत्र न्यायालयामध्ये अपील केले. सत्र न्यायालयाने दिनांक ०१-०६-१९८५ रोजी अपिलार्थीची निर्दोष मुक्तता केली. अपिलार्थीची या प्रकरणी जरी निर्दोष मुक्तता झाली असली तरी ही मुक्तता त्यांची नियुक्ती झाल्यावर व त्यांनी साक्षांकन नमुना फॉर्म भरुन दिल्यानंतर सुमारे १५ महिन्यानंतर झालेली आहे, म्हणजेच साक्षांकन नमुना भरुन दिला त्यावेळी अपिलार्थी विरुध्द न्यायालयात फौजदारी खटला प्रलंबित असूनही अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द कोणताही खटला प्रलंबित नसल्याची खोटी माहिती पोलीस अधीक्षकांना सादर केली असल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ३१-१०-१९८५ रोजी त्यांना सेवामुक्त करण्यात आले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत काही माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती स्पष्ट स्वरुपात नसल्याने अपिलार्थीस परत जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २१-०३-२००९ रोजी त्यांना सेवामुक्त करण्याची शिक्षा दिल्याचे अपिलार्थीस कळविले गेले आहे. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांना दिलेल्या शिक्षेसंदर्भात काही

आक्षेप आहेत, सदर आक्षेप हे प्रशासकीय स्वरुपाचे आहेत. अशाप्रकारच्या आक्षेपावर निर्णय देण्याची अधिकारिता आयोगाला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख मुख्तार शेख नुरअली, पो. हे. कॉ. ब. नं. ४१ नेमणुक, पो. स्टे. माहूर, ता. माहूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस मुख्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५३

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. मनोज बाबुराव शिंदे, : अपिलार्थी
रा. मोतीनगर, रिंग रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संबंधात त्यांच्याकडे मागविण्यात आलेल्या माहितीसंदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भारताच्या राजपत्र, केंद्र सरकारने स्थापन केलेल्या कोणत्या गुप्तवार्ता, सुरक्षा संघटनेशी किंवा वाणिज्य संघटनेशी नगरपरिषद संबंधित आहे, नगरपरिषदेला माहिती अधिकाराखाली आजपर्यंत त्रयस्थ पक्षाशी संबंधित आलेल्या अर्जांच्या छायांकित प्रती, या

अर्जासंदर्भात किती लोकांना पत्राद्वारे कळविले किंवा लेखी परवानगी मागितली व त्रयस्थ पक्षाने दिलेल्या उत्तरांची छायांकित प्रत आणि परवानगी मिळाल्यानंतर नगर परिषदने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात अर्जदाराला पुरविलेली माहिती किंवा उत्तर - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असल्याचे अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस निश्चित कोणत्या कालावधीची माहिती आवश्यक आहे त्याचा उल्लेख करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत व त्यांना अपिलार्थीकडून निश्चित कोणत्या प्रकारे अर्ज करुन हवा आहे, याची त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कल्पना दिली होती. तथापि अपिलार्थीने हा तपशील त्यांना न पुरविल्यामुळे ते अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या अर्जाद्वारे माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे त्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे या कालावधीचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. म्हणजे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः अपूर्ण स्वरुपात अर्ज सादर केल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे, याचा उल्लेख करणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'भारत सरकारच्या राजपत्रामध्ये, केद्र सरकारने स्थापन केलेल्या कोणत्या गुप्तवार्ता, सुरक्षा संघटनेशी किंवा वाणिज्य संघटनेशी नगरपरिषद संबंधित आहे,' अशी माहिती मागविली आहे. ही माहिती देण्यासाठी माहितीशी संबंधित कालावधीचे कोणतेही बंधन नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती आता द्यावी लागेल. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २४ च्या तरतुदीनुसार विभागीय संघटनांना माहिती अधिकार अधिनियम लागू नसल्याचे नमूद केले आहे आणि या संघटनांची यादी अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची क्रमांक २ मध्ये दिलेली आहे. या यादीमध्ये एकूण १८ संघटनांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांना या संघटनांपैकी कोणत्या संघटनेशी नगरपरिषद संबंधित आहे याची माहिती अपिलार्थीस आता पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती ही कालपरत्वे, अस्थायी स्वरुपाची असल्याने, वेळेनुसार ती बदलत असल्यामुळे, या उर्वरित मुद्यांसदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना, आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जात करणे त्यांना गरजेचे होते. परंतु त्यांनी असा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जात केला नसल्याने या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५४

निर्णय दिनांक ०३-०३-२०१०

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
द्वारा, एस.के. जोनवाळ, प्लॉट नं.४, प्रा. रावसाहेब ढवळे
यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
लेखाधिकारी (शिक्षण), जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कनिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण), जालना
जन अपिलीय अधिकारी : लेखाधिकारी (शिक्षण), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही व त्यांना, त्यांनी मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो अप्राप्त असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी  यांच्याकडे, नेहरु विद्यालय गोलापांगरी या शाळेच्या दिनांक ०१-०१-१९७४ ते ३१-१२-१९८९ या कालावधीमध्ये लेखा परीक्षण केलेल्या अहवालाची साक्षांकित प्रत आणि त्या अनुषंगाने शाळेने केलेल्या अनुपालन अहवालाची छायांकित झेरॉक्त प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या पत्रान्वये या शाळेच्या संदर्भात सन १९८७-८८ ते १९९१-९२ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवालाची प्रत दिली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व दिनांक ०१-०१-१९७४ ते १९८६-८७ या कालावधीमधील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले.  तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी शिक्षण उपसंचालक हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा लेखाधिकारी, शिक्षण उपसंचालक  कार्यालय यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाठविला.  या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने अथवा या संदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थीस अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि शिक्षण उपसंचालक हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीस उर्वरित माहिती हवी असल्याचा युक्तिवाद त्यांनी आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जालना जिल्हा १९८२ साली निर्माण झाला असून त्यांच्या कार्यालयाची स्थापना १९९३ साली झाली आहे. त्यांच्या कार्यालयाची स्थापना १९९३ साली झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयाने नेहरु विद्यालय गोलापांगरी शाळेची सन १९८७-८८ ते १९९१-९२ या कालावधीचे लेखापरीक्षण केले होते, त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली. तथापि दिनांक ०१-०१-१९७४ ते सन १९८६-८७ या कालवधीमधील संबंधित संस्थेचे लेखापरीक्षण औरंगाबाद येथील कार्यालयाने केले असल्यामुळे, त्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध नाही, त्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-१९७४ ते ३१-१२-१९८९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे. त्यापैकी १९८७-८८ ते दिनांक ३१-१२-१९८९ या कालावधीशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दुसऱ्या संदर्भाद्वारे प्राप्त झाली आहे. दिनांक ०१-०१-१९७४ ते १९८६-८७ या कालावधीशी संबंधित माहिती जर शिक्षण विभाग औरंगाबाद येथील कार्यालयाकडे उपलब्ध होती तर या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस उर्वरित कालावधीशी संबंधित माहिती देण्याच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी, हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत उर्वरित माहितीचा शोध औरंगाबाद येथील कार्यालयात घेऊन तदनंतर अपिलार्थीस ही माहिती याच कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गहाळ झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले तर त्यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यांवर होती त्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी किंवा

जर ही माहिती, सदर माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपल्यामुळे नष्ट करण्यात आली असेल तर, तसा पुरावा त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा, एस.के. जोनवाळ, प्लॉट नं.४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२८

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, : अपिलार्थी
रा. तांबरी विभाग, उस्मानाबाद - ४१३ ५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निकाल स्वयंस्पष्ट नसल्याने तो त्यांना मान्य नाही. सदरील निकाल संशयास्पद असून निकालपत्रात संबंधित दोषी अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर निकाल कार्यकारी अभियंता व अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या दोघांच्या संगनमतातून दिला गेला असल्याचे त्यांना निकालपत्रातील आदेश वाचल्यावरुन वाटत आहे. त्यांच्या जन अपिलीय अधिकारी यांच्या

निकालपत्रावरील अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत कळंब तालुक्या-मध्ये दिनांक ०१-०४-२००३ ते ३१ मार्च २००८ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या पाझर तलावाच्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- रोजगार हमी योजना कमिटीने दिनांक ०५-०५-२००८ ते ०६-०५-२००८ या कालावधीमध्ये कामास भेटी देवून घेतलेल्या आढाव्याच्या अहवालाच्या छायांकित प्रती व दिनांक ०१-०४-२००३ ते ३१-०५-२००८ या कालावधीमध्ये कळंब उपविभागाने केलेल्या पाझर तलावाच्या कामाची संख्या, तलाव निहाय एकूण खर्च, वर्षनिहाय प्रत्येक पाझर तलावावर कुशल व अकुशल कामावर झालेला खर्च, कुशल काम केलेल्या ठेकेदारांची कामनिहाय नावे, पाझर तलावाच्या अंदाजपत्रकाच्या व त्यास तांत्रिक मान्यता दिलेल्या आदेशाच्या व पाझर तलावाच्या ब्ल्यू प्रिंटच्या छायांकित प्रती, पाझर तलावाच्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती व ज्या रेकॉर्डच्या आधारे कामाचे चेक अदा केले होते त्या सर्वांच्या छायांकित प्रती, संबंधित सर्व ठेकेदार व मजूर संस्थेला कुशल कामाबाबत दिलेल्या सर्व वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रती आणि अकुशल कामावरील मजुरांच्या हजेरीपटाच्या छायांकित प्रती- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, जिल्हा परिषद, कळंब यांच्याकडे पाठविली व तदनंतर दिनांक २९-०९-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५१८६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत न कळविल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००८ रोजी निर्णय देऊन या संदर्भात आपले आदेश दिनांक ०३-०१-२००९ रोजी पारित केले. सदर निर्णयाने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०२-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत व दिनांक १३-०३-२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असता, या दोनही वेळेस अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला, त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधित असताना देखिल त्यांनी या अर्जातील संपूर्ण १० मुद्यांची माहिती त्यांच्या नियंत्रणाखालील उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, जिल्हा परिषद कळंब यांना, त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या

पत्राद्वारे, अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील सर्व मुद्यांवर परस्पर माहिती देण्याचे सूचित केले. ही संबंधित कार्यकारी अभियंता यांची कृती चुकीची आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्या ताब्यात असल्यामुळे त्यांनी ती सरळ अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार देणे त्यांना अनिवार्य होते व इतर ९ मुद्यांवरील माहितीकरिता, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी यांच्याकडे पाठवून उर्वरित ९ मुद्यांवरील माहिती त्यांना अपिलार्थीस देण्याचे सूचित करावयाचे होते व या पत्राची प्रत अपिलार्थीस द्यावयाची होती. तथापि संबंधित कार्यकारी अभियंता यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती या घटनाक्रमाच्या प्रथम टप्प्यावर केलेली नाही. यानंतर कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००९ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वेळेचे कोणतेही बंधन घातलेले नाही. तसेच ही माहिती विनामूल्य द्यावयाची किंवा कसे याचा त्यांनी या निर्णयामध्ये कोठेही उल्लेख केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर दिनांक २४-०२-२००९ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. एवढेच नव्हे तर, नंतर ही माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक १३-०३-२००९ रोजी पाठवूनही ती घेण्यास देखिल अपिलार्थीने नाकारले, असे या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन नि:संशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता यांनी

संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत न पाठविता, ही प्रत उपविभागीय अधिकाऱ्यास पाठविण्याकरिता २ दिवसाचा विलंब केला आहे व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक २४-०२-२००९ रोजी ही माहिती देऊ केली आहे. म्हणजेच संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने देऊ केली असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद, उस्मानाबाद हे व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय अधिकारी आणि त्यांचे सर्व सहायक ज्यांना, अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, हे सर्वजण अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यास जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. संबंधित कार्यकारी अभियंता आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाशी संबंधित कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद, उस्मानाबाद (श्री. चौगुले, सध्या कार्यकारी अभियंता, भूमी अभिलेख प्रकल्प पंढरपूर या पदावर कार्यरत) व संबंधित उपविभागीय अधिकारी श्री. टी. पी. हनवते (सध्या उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, जिल्हा परिषद, कळंब या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना जिल्हा परिषदेच्या अस्थापनेवरील या प्रकरणाशी संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी आपल्या कार्यालयामध्ये अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याकरिता, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पुर्वनियोजित वेळी स्वत: उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालवधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: पुरवावी.

३. सचिव, जलसंपदा यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता व उपविभागीय अधिकारी (श्री. चौगुले व श्री. हनवते) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जिल्हा परिषदेच्या अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, तांबरी विभाग, उस्मानाबाद - ४१३ ५०१

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२९

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. डी. एन. खवले, : अपिलार्थी

मु.पो. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघुपाटबंधारे

विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ,

उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क मुदतीत न कळविल्यामुळे आणि अपिलीय अधिकाऱ्याने त्यांच्याशी खोडसाळ पत्रव्यवहार करुन जाणुनबूजुन त्यांच्या प्रथम अपील अर्जावर बेकायदेशीर निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जाची संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, हातोला साठवण तलाव, हातोला पिंपळगाव पर्यायी रस्ता व अप्पर मांजरा प्रकल्प उजवा कालवा यांच्या संदर्भात सन १९९० ते २००८ या कालावधीशी संबंधित एकूण २२ मुद्यांद्वारे संमिश्र स्वरुपाची माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विविध ठिकाणावरुन संकलीत करावयाची असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वेळ लागेल, असे अपिलार्थीस कळविले व तदनंतर दिनांक १२-११-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३३१/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आता तयार असून ही माहिती अपिलार्थीस ते सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण २२ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही मुद्यांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी अशाप्रकारची माहिती विसंगत असल्यामुळे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही मुद्यांवरील अंशतः माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ मधील, 'रस्ता शिल्लक असेल तर तो किती अंतराचा आहे', हा मुद्दा वगळता या मुद्यातील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ मधील, 'एकत्रित पाठविण्यात आली असल्यास वेगवेगळे टपाल शुल्क आकारुन एकत्रित माहिती पाठविण्याचे प्रयोजन काय,' मुद्दा क्रमांक १५ मधील संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक १६ मधील हातोला साठवण तलाव क्रमांक २ च्या पुर्व बाजूचे दगड सिमेंटचे बांधकामाच्या चाचणीच्या अहवालाची व त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक १७ मधील, 'प्रत्यक्ष कामाच्या दर्जाबाबत आपणाकडून कोणत्या प्रकाराची कार्यवाही करण्यात आली,' हा भाग वगळता उर्वरित संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक २१ मधील, 'पाणी सोडण्याच्या तारखा व सोडलेल्या पाण्याचे परिमाण दर्शविलेल्या नोंदवह्याच्या नक्कला,' वगळता उर्वरित संपूर्ण व मुद्दा क्रमांक २२ संपूर्ण ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे देय होत नाही. मात्र उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता त्यांना सशुल्क माहिती देण्यासाठी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या

कालावधीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला असल्याने, अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डी. एन. खवले, मु.पो. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघुपाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३०

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा. शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कृषि अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
जिंतूर, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी, जिंतूर, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचालेली माहिती अद्याप त्यांना प्राप्त नसल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी  यांच्याकडे " त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०१-११-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीमध्ये जिंतूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जिंतूर तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामाची नावे व ज्या शेतकऱ्यांच्या शेतात काम केले आहे त्या शेतकऱ्यांचे नाव, गाव, पत्ता व गट नंबर, कामावर असलेल्या मजुरांची पत्यासह यादी आणि त्यांना दिलेल्या पगार रजिस्टरच्या छायांकित सत्यप्रती, मजुरांच्या मजूरीबाबत शासन निर्णयाची छायांकित प्रत व या कामासाठी जिंतूर तालुक्यातील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला व खर्च झालेला आणि शिल्लक असलेला महिनानिहाय निधी - या मुद्यांचा समावेश होता.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने  अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, जिंतूर यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर तालुका कृषी अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मस्टरच्या प्रती सोडून उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांच्याकडे आज तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.  मस्टरच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीअंतर्गत मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती अत्यंत मर्यादित अशी होती. ही माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ अथवा इतर साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याची शक्यता कोणत्याही प्रकारे संभवत नव्हती. तथापि एवढे असूनही अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी यावर कडी करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात कोणताही निर्णय न देऊन आपली बेजबाबदार कार्यशैली स्पष्ट केली आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीमुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द केले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. टी. सुखदेव (सध्या रजेवर) यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांना कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल, त्यांच्यावर एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा, असे आदेशित करण्यात येत आहे. श्री. आर. टी. सुखदेव सध्या रजेवर आहेत, असे त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी श्री. अ.ह. तडवी, सहायक अधीक्षक, यांनी आयोगास अवगत केले आहे. श्री. सुखदेव यांना आयोगाचे आदेश तात्काळ उपलब्ध होतील याची जबाबदारी आता श्री. अ. ह. तडवी, सहायक अधीक्षक यांच्यावर टाकण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी

त्यांच्या कार्यालयाकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नाही, हे त्यांनी आयोगास सादर केलेले कारण आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयास येणाऱ्या खर्चाचा प्रश्न त्यांनी त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्तरावर सोडवावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. श्री. आर. टी. सुखदेव यांना या प्रकरणी एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जिंतूर, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, जिंतूर, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. आर. टी. सुखदेव (मार्फत - सहायक अधीक्षक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जि. परभणी) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६६

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. राजू भुजंगराव तारे, : अपिलार्थी
मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०१-२०१० रोजीचे पत्र जे आयोगास दिनांक ०८-०१-२०१० रोजी प्राप्त झाले ते

आयोगास सादर करण्यात आले. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कामाच्या जायमोक्यावर जाऊन ती दाखविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविलेल्या कामाने व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अभिलेख्यावरुन त्यांचे समाधान झाले असून त्यांना आता त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नाही. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १४६६ निकाली काढावे अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १४६६/२००८, दिनांक ०५-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०३-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजू भुजंगराव तारे, मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११६

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ सौ. हरमिंदरकौर मनजितसिंघ, : अपिलार्थी
घर क्रमांक ३-३-४१३, भगतसिंह रोड, गुरुव्दारा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड प्रशासकीय समिती
कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

१. चेअरमन, तख्त सचखंड, श्री हजूर अबचलनगर साहेब, नांदेड
२. जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड
त्रयस्थ पक्ष : श्री. देविंदरपालसिंघ, श्री. सुरजसिंघ बल अथवा श्री. संतसिंघ संधू व जय शिवराय बँक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे

माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. देविंदरपालसिंघ व इतर यांच्या पगारासंदर्भात व इतर मुद्दयावर काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे विचारली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे ती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार चेअरमन, तख्त सचखंड, श्री हजूर अबचलनगर साहेब, नांदेड व जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व त्यांचे वकील हजर आणि अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे सहायक अधीक्षक गुरुव्दारा बोर्ड, नांदेड व जन अपिलीय अधिकारी हे अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड हे आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १८-०१-२०१० रोजी विनामूल्य पुरविण्यात आली असून ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. गुरुव्दारा

बोर्डास शासनाकडून कोणतेही भरीव अर्थसहाय्य प्राप्त होत नाही. भक्तांनी दिलेल्या देणगीच्या रकमेतून या संस्थेचा कारभार चालत असतो असेही त्यांनी पुढे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे. सदर संस्था महसूल व वन विभागाच्या दिनांक १०-०१-१९७५ रोजीच्या अधिसूचनेव्दारे स्थापन झालेली संस्था आहे. या अधिसूचनेप्रमाणे नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्रीहजूर अबचलनगरसाहेब अधिनियम १९५६ च्या कायद्यानुसार स्थापन झालेली ही संस्था आहे. त्यामुळे अपिलार्थीस मागणी केलेली माहिती देणे भाग आहे. जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिनांक १८-०१-२०१० रोजी विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी ती पूर्णपणे सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनमूल्य पुरविली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. हरमिंदरकौर मनजितसिंघ, घर क्रमांक ३-३-४१३, भगतसिंह रोड, गुरुव्दारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, गुरुव्दारा बोर्ड, नांदेड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५६

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. बी. आर. पवार, : अपिलार्थी

रा. "धरतीधन", मयुर कॉलनी, यशवंतनगर,

खानापूर फाटा, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कॉलेज ऑफ व्हेटरनरी,

उदगीर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय व पशुविज्ञान

महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्राध्यापक, पशुवैद्यकीय महाविद्यालय

उदगीर, जि. लातूर

जन अपिलीय अधिकारी : सहायोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय,

उदगीर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये ८ मुद्यांद्वारे काही माहितीची विचारणा केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या ट्रान्सफर टी. ए. बील रु. ११,९५७/- या विषयासंदर्भात, "आता पावेतो ते बील रु. ११,९५७/- मला का मिळाले नाही, त्याचे कारण काय? ते बील मला नियमाने मिळावे,"  अशी माहिती टापालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने संदर्भीत केलेले ट्रान्सफर टी.ए. बील त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीस कळविले.  जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१२-२००७ रोजी प्रथम अपील करुन त्यांना ट्रान्सफर टी. ए. बील व्याजासह प्राप्त होण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनंती केली.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०३-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी ११,९५७/- ही रक्कम नजर चुकीने नमूद केल्याचे कबूल केले असल्याने,  अपिलार्थीचे अपील अग्राह्य समजून ते खारीज केले.   जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने  व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या ट्रान्सफर टी. ए.बीलाच्या संदर्भात काही प्रशासकीय मुद्यांवर त्यांचा युक्तिवाद केला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीचे कथित ट्रान्सफर टी. ए. बील, या बीलावर काही त्रृटी असल्यामुळे ते विद्यापीठाकडे परत पाठविले आहे. परंतु या त्रृटींची पूर्तता केली गेली नसल्याने अपिलार्थीचे ट्रान्सफर टी. ए. बील त्यांना आजपावेतो मंजुर करता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे रु. ११,९५७/- इतके ट्रान्सफर टी.ए. बील त्यांना प्राप्त न होण्याचे कारण अशी माहिती विचारुन, ते बील अपिलार्थीस नियमाप्रमाणे मिळावे अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती अपेक्षित आहे ती माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेली माहितीच अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागण्याचा अधिकार आहे. जन माहिती अधिकारी यांच्या एखाद्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्टीकरण मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशाप्रकारचे स्पष्टीकरण देणे, या प्रक्रिया मुळात माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांचे ट्रान्सफर टी. ए. बील मिळावे, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. हा मुद्दा देखील माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही माहिती मागितली नसून त्यांचे ट्रान्सफर टी. ए. बील मंजुर करण्याची विनंती केली आहे. अशाप्रकारे

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहितीच ही मूळात अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचा दिनांक २७-१०-२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध असल्याचे सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढवून जन अपिलीय अधिकारी आणि आयोगाकडे व्यापक व्याप्तीची माहिती त्यांना अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. परंतु या मुद्याचा अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये समावेश नसल्याने या मुद्यावरील माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या मुद्यांवर अर्जदाराने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागितली आहे, त्याच मुद्यांवर त्यांना जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील करणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अधिनियमातील विहित प्रक्रियांचा, माहितीची व्याप्ती बदलून, अपिलार्थीने भंग केला असल्यामुळे अपिलार्थीस व्यापक व्याप्तीची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बी. आर. पवार, "धरतीधन", मयुर कॉलनी, यशवंतनगर, खानापूर फाटा, वसमत रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्राध्यापक, पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५७

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, : अपिलार्थी
रा. नारळी बाग, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
उच्च माध्यमिक शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी एका महिन्यात निर्णय दिला नाही. माहिती अधिकारी हजर नसताना सुध्दा त्यांनी सुनावणी घेतली, सुनावणीवरील आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत केले नाही आणि माहिती अधिकाऱ्यास दोषी न धरल्यामुळे आणि श्री. मोरे यांच्या मार्फत माहिती देण्यात आली नसल्यामुळे व ही बाब भ्रष्टाचाराचे समर्थन करणारी असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. तान्हाजी मोरे प्रथम लिपीक यांच्या संदर्भात एकूण १७ मुद्यांद्वारे त्यांची वैयक्तिक स्वरुपाची व इतर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, अस्पष्ट व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या पत्राद्वारे आपले आदेश पारित केले. या पत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती देऊन त्रयस्थ पक्षाची मालमत्ता व इतर दायित्वाबाबात आणि त्यांच्या गोपनीय अहवालाबाबत शिक्षण संचालकांकडे त्यांनी मागणी केली असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८ व ९ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे त्यांच्यावर दंडाची कार्यवाही करण्यात यावी व त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८ व ९ ची माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी बरासचा भाग हा त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाकडे विचारणा करणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम (११) च्या तरतुदीप्रमाणे प्रथमतः आवश्यक होते. तथापि त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस ही माहिती उघड करण्यासाठी शिक्षण उपसंचालकांच्याकडे त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्राद्वारे आक्षेप घेतला असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना उघड करता आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या मत्ता व दायित्व दर्शविणाऱ्या पत्राची मागणी केली आहे. अशाप्रकारच्या माहिती संदर्भात आयोगाने वेळोवेळी अशा प्रकारची माहिती उघड न करण्याची भूमिका घेतली आहे. या प्रकरणी देखिल अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) च्या तरतुदींचा भंग करणारी असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'त्रयस्थ पक्षाचे स्वतःचे घर आहे काय? असल्यास प्लॉट घेण्यास परवानगी घेतली आहे काय? याची छायांकित प्रत,' मागितली आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, त्यामुळे ती अपिलार्थीस देय नाही. याही उपर मूळात त्रयस्थ पक्ष व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये प्लॉट खरेदीच्या परवानगी संदर्भात कोणताही पत्रव्यवहार झाला नसल्याचे, जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादात स्पष्ट झाले असल्यामुळे व ही माहिती मूळात अस्तित्वात नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ द्वारे

अपिलार्थीने, 'त्रयस्थ पक्षाच्या घरात फ्रिज आहे काय? असल्यास विकत घेण्याअगोदर कार्यालयास कळविले आहे काय? परवानगी घेतली आहे काय?' अशा प्रकारची, जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशा प्रकारची माहिती वर स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ती माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तसेच त्रयस्थ पक्षाने फ्रिज खरेदी या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नसल्यामुळे, ही माहिती देखिल मूळात अस्तित्वात नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही.

अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती मूळात अस्तित्वात नसल्याने आणि ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस ती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, नारळी बाग, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५८

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. महेश कृष्णाजी जोशी, : अपिलार्थी

द्वारा, वृंदावन कॉलनी, प्लॉट नं. ४३, जुना जालना,

जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अधीक्षक, भूमी अभिलेख जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्यालय सहायक, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे द्वितीय अपील मंजुर करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे व जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " जालना शहरातील सर्वे नंबर २६४, २१७, २३८, २२७,२१८ व

४२५ ही शासनाच्या नावाची आहेत. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख हे खाजगी इसमाच्या नावाने आहेत का, असल्यास असे किती नगर भुमापन क्रमांक खाजगी इसमांच्या नावाने आहेत याची माहिती, " अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजुर केले व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००८ रोजी निर्णय देऊनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना कधीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही आयोगाने आदेशित करावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून, ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील, "जालना शहरातील सर्वे नंबर २६४, ................ ,४२५ हे शासनाच्या नावाचे आहेत. परंतु आपल्याकडील अभिलेख हे खाजगी इसमाच्या नावाने आहेत का" या भागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीसाठीच्या मुद्यामधील या भागाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे मत व्यक्त करणारी माहिती अर्जदारास देणे, ही प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "जालना शहरातील शासनाच्या मालकीचे किती नगर भूमापन क्रमांक खाजगी इसमांच्या नावाने आहेत," ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या सर्वे नंबर संदर्भात माहिती बरोबर आणली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपेक्षा ही माहिती वेगळी आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी विचारणा केल्याप्रमाणे शासनाच्या मालकीचे किती नगर भूमापन क्रमांक खाजगी इसमांच्या नावाने आहेत याची माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बिलोली (सध्या तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, हिंगोली या पदावर कार्यरत)

यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली, संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश कृष्णाजी जोशी, द्वारा, वृंदावन कॉलनी, प्लॉट नं. ४३, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख

कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५९

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी
रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी / प्रमुख लिपीक, नगर परिषद, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, ' सेलू नगरपरिषदेच्या कार्यालयीन कर्मचा-यांची सविस्तर माहिती ' या विषयावर माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नगरपरिषद सेलूच्या कार्यालयीन कर्मचा-यांशी संबंधित विविध मुद्दयावरील सविस्तर माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे व ती माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीचा उल्लेख न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००८ व २२-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन करण्यासाठी त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आस्थापना शाखेकडून वेळेवर न दिली गेल्यामुळे ते अपिलार्थीस मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००८ व २२-१२-२००८ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये दिलेली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणतेही अभिप्राय नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांचा एकूण पगार ही माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. याचबरोबर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या संदर्भात देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविल्याचे आढळून येत नाही. वास्तविक पाहता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) नुसार स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीपैकी एक आहे. ही माहिती अपिलार्थीस न देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे कोणतेही स्पष्टीकरण या प्रकरणी समर्थनीय होऊ शकत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू यांची शैक्षणिक पात्रता, त्यांची वेतनश्रेणी, नियुक्तीच्या वेळेचा पगार, आता ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाचा पगार, ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. आयोगास असेही आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कर्मचा-यांची वेतनश्रेणी कळविली आहे. परंतु या प्रकरणी कर्मचा-यांना, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी त्यांना देण्यात येत असलेला पगार ही माहिती पुरविली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संबंधित कर्मचा-यांच्या सेवेसंदर्भात व पगारासंदर्भात मागणी केलेली संपूर्ण माहिती मुख्याधिका-याच्या माहितीसह त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या

प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य कारण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६०

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी

व्दारा- सचिन जन. स्टोअर्स, प्र. नि. हा. शाळेजवळ,

कैलासनगर, नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आदेशित करुनही माहिती अधिका-याने त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, केरोसीन हॉकर्सना केरोसीन कोणत्या ठराविक दिवसात व वेळेत अर्धघाऊक विक्रेत्यांनी द्यावे असे निर्देश असलेल्या आदेशाची सत्यप्रत, अशी माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, पुरवठा विभागात कार्यरत असलेले श्री. नरेंद्र वाघमारे व इतर कर्मचारी कोणत्या शासकीय नियमानुसार, कोणत्या आधारे, कोणाच्या आदेशान्वये कार्यरत आहेत. पूर्वकालीक व अंशकालीक कर्मचारी नसतांना सुध्दा पुरवठा विभाग येथे शासकीय नियमानुसार कार्यरत असल्यास या नियमाची प्रमाणित प्रतीसह माहिती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयात श्री. नरेंद्र वाघमारे नावाचे कर्मचारी कार्यरत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०१-२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरवठा विभागातील श्री. नरेंद्र वाघमारे व इतर

कर्मचा-यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी फक्त श्री. नरेंद्र वाघमारे हे कर्मचारी हे त्यांच्या कार्यालयात नियुक्त केले गेले नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि इतर कर्मचा-यांच्याबाबत अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये या कर्मचा-यांच्या बाबत मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस उघड करण्यासाठी कोणताही प्रत्यावाय असू नये. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयातील पुरवठा शाखेतील सर्व कर्मचा-यांच्या नेमणुकीच्या आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जर संबंधित कर्मचा-यांच्या नेमणुकीचे आदेश जन माहिती अधिकारी यांना सहज उपलब्ध झाले नाही तर त्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तिकांवरुन त्यांच्या आदेशाच्या निर्णय क्रमांकाची व दिनांकाची माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली तरी त्यांचे काम भागू शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या नेमणूक आदेशाची माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा- सचिन जन. स्टोअर्स, प्र. नि. हा. शाळेजवळ,

कैलासनगर, नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५८

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. वामन भावजी पाटील, : अपिलार्थी
हरदेवजी कृपा हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. जी. ६, फ्लॅट नं.
१६, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, किनगांव, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १४-०५-२००७ व दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी चौकशी केली असल्यास चौकशी अहवालाची प्रत व संबंधितांवर केलेली कार्यवाही, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा अर्ज मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, किनगांव, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे पाठवून दिला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे निर्णय देऊन अपिलार्थीस डुप्लिकेट टी. सी. व प्रवेश निर्गम उतारा दिनांक २८-०९-२००७ पर्यंत संबंधित मुख्याध्यापक देतील याची शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी खात्री करावी असे शिक्षणाधिका-यास सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित दिनांक १४-०५-२००७ व दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या अर्जाची प्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी पाठविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी शिक्षणाधिका-याची, अपिलार्थीचा अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास पाठवावयाची कृती सर्वथा चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे केलेल्या अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही अशी माहिती मागितली होती. त्यामुळे ही माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्तरावर अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न करता शिक्षण विभागाच्या नेहमीच्याच पध्दतीप्रमाणे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात त्यांना माहिती देण्याचे सूचित केले व एक प्रकारे अपिलार्थीस स्वत: माहिती देण्याचे टाळून अपिलार्थीची दिशाभूल केली. अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-०५-२००७ व दिनांक १०-०७-२००७ या रोजीच्या अर्जावर केलेली कार्यवाही म्हणजे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात संबंधित प्राधिकरणांशी दिनांक ३१-०७-२००७ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भात त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती ही होय. त्यामुळे आता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०५-२००७ व दिनांक १०-०७-२००७ अर्जासंदर्भात दिनांक ३१-०७-२००७ पर्यंत ज्या वेगवेगळया संबंधित प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला असेल त्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या संदर्भातील त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्या लागतील. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर दिनांक ३१-०७-२००७ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसेल तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावे जेणेकरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वामन भावजी पाटील, हरदेवजी कृपा हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. जी. ६, फ्लॅट नं. १६, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, किनगांव, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८५९

निर्णय दिनांक ०४-०३-२०१०

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, : अपिलार्थी
घर क्रमांक ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नगर रचनाकार तथा सहायक संचालक, नगर रचना,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक संचालक, नगररचना व मूल्य निर्धारण
विभाग, गोदावरी कॉम्प्लेक्स, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, नांदेड वाघाळा शहर महानगर-पालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. राजू बाबुराव शिंगरुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये आदेशित केल्याप्रमाणे श्री. प्रकाश येवले, सहायक आयुक्त यांनी व आस्थापना विभागाने कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे

सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, या प्रकरणी उप आयुक्त (अनधिकृत बांधकाम विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड व श्री. दिलीप गुट्टे यांनी भ्रमणध्वनीव्दारे तोंडी सूचना देऊनही सहायक आयुक्त यांनी अनधिकृत बांधकामाबद्दल कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे यांनी अनधिकृतपणे त्यांच्या मुलाच्या घराच्या पश्चिम बाजूला केलेल्या अनधिकृत बांधकामाबद्दल एकूण सहा मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थी व त्यांच्या मुलाने दिलेल्या तक्रार अर्जाच्या प्रमाणित प्रती, अनधिकृत बांधकाम विभागाकडून केलेला पंचनामा, श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे यांना देण्यात आलेली नोटीस, सदर कार्यवाही कोर्टात दाखल करण्यासंदर्भात केलेले आदेश, संचिका क्रमांक २१०/१७/२००३-२००४ महानगरपालिकेच्या अभिवक्त्याकडे पाठविल्यानंतर त्यांनी कोर्टात कार्यवाही दाखल केली अथवा करणार आहे व सदरील कार्यवाही कोर्टात दाखल केल्यास कार्यवाहीचा अनुक्रमांक व दिनांक - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांना श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत त्यांच्या-

विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार न्यायालयात प्रकरण दाखल करण्याची सूचना दिली व त्याची प्रत अपिलार्थीस देण्याचे सूचित केले आणि नगर रचना विभागातील कर्मचारी श्री. केजकर, श्री. कदम यांनी अपिलार्थीचे प्रकरण डिसेंबर २००६ पासून प्रलंबीत ठेवल्यामुळे आस्थापना विभागास संबंधितांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयानुसार कार्यवाही न झाल्या-मुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात आयोगासमोर कोणताही खुलासा करता आला नाही अथवा यासंदर्भात कोणतीही कागदपत्रे त्यांना आयोगास दाखविता आली नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०८-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण सहा मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक पाचशी संबंधित माहितीवरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीबाबत कोणताही बोध होत नसल्याने, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या अर्जातील उर्वरित पाच मुद्दयांवरील माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी यातील मुद्दा क्रमांक ५ वगळता उर्वरित पाच मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यावरुन त्यांच्यावर आयोगाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिका-यास ज्या प्रशासकीय स्वरुपाच्या सूचना दिलेल्या आहेत त्या सूचनांच्या अंमलबजावणी-मध्ये हस्तक्षेप करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जातील या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात् आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणाच्या सुनावणीकरिता उपस्थित राहिलेल्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अधिका-यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नाही. येथून पुढे आयोगाकडे सुनावणीसाठी उपस्थित राहताना सुनावणीच्या विषयाशी संबंधित ज्या अधिका-यांना माहिती आहे अशाच अधिका-यांना आयोगाकडे सुनावणीस पाठविण्याची दक्षता आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे व इत:पर आज पाठविलेल्या अधिका-यासारख्या अधिका-यांना आयोगाकडे सुनावणीसाठी पाठवू नये असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य कारण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक पाच वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**	**( वि. बा. बोरगे )**

**दिनांक	०४-०३-२०१०**	**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, घर क्रमांक ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा, नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३५

निर्णय दिनांक : ०५.०३.२०१०

१. श्री. अनिरुध्द नागेश दडके, : अपिलार्थी
रा.तरोडा बू. ता.जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयात केलेल्या रजिस्ट्रीचे (दस्तऐवज क्र. ५३३/८९) मूळ कागदपत्रे मिळण्यासाठी केलेल्या दि. २४.०७.२००८ व ०७.०८.२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अशा स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.११.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे नोंदणी महानिरीक्षक,पुणे यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज मूळ प्रतीमध्ये त्यांच्याकडील दि. १५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, नांदेड यांच्याकडे पाठविला. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्याने व परिणामी व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती तथा प्रभारी अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या अर्जावर दुय्यम निबंधक कार्यालयाने कोणतीही कार्यवाही अद्यापपावेतो केली नाही. अपिलार्थीने ज्या दस्तऐवजाची त्यांच्याकडे माहिती मागितली आहे ते दस्तऐवज जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने त्यांनी ते दस्तऐवज नष्ट केले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंत केली नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तसे कळविण्यास कोणतीही अडचण नव्हती. परंतु त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. आता सुनावणीच्या वेळी जन माहिती

अधिकारी हे अपिलार्थीने मागणी केलेले दस्तऐवज, त्यांचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे त्यांच्या कार्यालयातर्फे नष्ट केले आहेत असे आयोगास सांगत आहेत. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेले दस्तऐवज क्र. ५३३/८९ हे नष्ट केल्याचा सबळ पुरावा अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावा.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०८.०८ रोजीच्या अर्जावर जर इतर कोणत्याही प्राधिकरणाशी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावरील दिनांकापर्यंत काही पत्रव्यवहार केला असेल तर त्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या सबळ पुराव्यासह त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरावाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल श्री. विभुते (सध्या सह निबंधक वर्ग-२, उदगीर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. विभुते (सध्या सह निबंधक वर्ग-२, उदगीर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिरुध्द नागेश दडके, ३७,'योगेश्वरी', विठ्ठलनगर, तरोडा (बु.),ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३६
निर्णय दिनांक : ०५.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शाह शेख रहीम कादरी पिता शेख ईमाम कादरी,<br>रा. सांगवी बु. ता. जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगर पालिका कार्यालय,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त,<br>नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "चैतन्यनगर जवळील रेल्वे डिव्हिजनलगत नांदेड येथील कब्रस्तानच्या जागेतील रोडमध्ये गेलेल्या एकूण जागेचे क्षेत्रफळाबाबत सद्यस्थिती", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये सर्व्हेनंबर,गटनंबर आखीव पत्रिका याचा उल्लेख केला नसल्यामुळे नेमकी कोणती जागा रोडमध्ये गेली याचा बोध होत नसल्याचे त्यांना कळविले आणि अपिलार्थीस समक्ष येऊन भेटण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्याकडे दि. १८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. अशाप्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित अपिलार्थीने होऊन वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, नांदेड वाघाळा महानगर पालिकेच्या मालकीचा कोणताही रोड अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये वर्णन केलेल्या जागेतून गेलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे ते ही माहिती देण्यासाठी अपिलार्थीची वाट पाहत राहिले. परंतु अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये दिलेली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे तयार करुन ठेवली आहे. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही

उपस्थित न राहिल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीस अद्यापही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या कालावधीपर्यंत विनामूल्य व व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरित करण्यासाठी,हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या कालावधीपर्यंत उपलब्ध करुन ठेवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाह शेख रहीम कादरी पिता शेख ईमाम कादरी, वजिराबादवाले,रा.सांगवी बु.,ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३७

निर्णय दिनांक : ०५.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव,<br>रा. होंडाळा, ता.मुखेड, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>जीवन विकास निवास मतीमंद कर्मशाळा,<br>उदगीर, जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी गट -अ,<br>जिल्हा परिषद, लातूर. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारण्याचे नाकारले व यासंदर्भात त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर देखील त्यांना अद्यापपावेतो माहिती उपलब्ध न करुन देण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेच्या संदर्भात सन १९९५ ते २००४ या कालावधीमधील काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे रजिस्टर्ड टपालाने मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते

दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांच्या कुटुंबाच्या ओळखपत्राची प्रत सोबत जोडली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.१२.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु ती सुनावणी झाली किंवा कसे, अथवा यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी,यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या दिवशी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हस्तांतरित करण्यासाठी उपलब्ध करुन ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित करता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठया प्रमाणात असल्यामुळे पोस्टास लागणारा खर्च टाळण्याकरिता त्यांनी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित करण्याचे योजले होते. या कारणास्तव त्यांच्याकडून आजतागायत अपिलार्थीस माहिती हस्तांतरित होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांनी ज्या माध्यमाद्वारे अपेक्षिली आहे, त्या माध्यमाद्वारेच त्यांना अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन उपलब्ध करुन देणे भाग आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाद्वारे माहितीची मागणी केलेली असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना रजिस्टर्ड टपालाने हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पाठवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळा,उदगीर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब अध्यक्ष, संधी निकेतन, शिक्षण संस्था, वडगाव, ता.उदगीर, जि.लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळा,उदगीर, जि.लातूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३. अध्यक्ष, संधी निकेतन शिक्षण संस्था, वडगाव ता.उदगीर, जि.लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जीवन विकास निवासी

मतीमंद कर्मशाळा, उदगीर,जि.लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु.होंडाळा, पो.दापका (राजा), ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जीवन विकास निवासी मतीमंद कर्मशाळा, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,गट -अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, संधी निकेतन शिक्षण संस्था, वडगाव, ता.उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३८
निर्णय दिनांक : ०५.०३.२०१०

१. श्री. बिराजदार तुकाराम गणपतराव, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
ग्यानमाता प्राथमिक व माध्यमिक विद्यालय (इंग्रजी मा.),
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांनी मुख्याध्यापक,ग्यानमाता प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, इंग्लीश मेडीयम, नांदेड यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टामार्फत दि. १५.१०.२००८ रोजी अर्ज केला असता, मुदतीच्या आत व मुदतीच्या नंतरही अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी उडवाउडवीचा पत्रव्यवहार करुन त्यांची दिशाभूल केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक,ग्यानमाता प्राथमिक व माध्यमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम),नांदेड यांच्याकडे, त्यांच्या शाळेच्या संदर्भात व्यापक व्याप्ती असलेली माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी त्यांच्या शाळेला लागू होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०२.२००९ रोजी, ग्यानमाता इंग्लीश स्कूल,नांदेड या शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्यामुळे त्या शाळेला सदरचा कायदा लागू होणार नाही, असा निर्णय दिला. परंतु या निर्णयाने अपिलार्थीची दिशाभूल झाली असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आढळून आले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या शाळेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी त्यांना लागू होत नसल्याचे व पर्यायाने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहिती देणे त्यांना बंधनकारक नसल्याचे स्पष्ट केले व तसे शपथपत्र आयोगास सादर केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी,नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निर्णयाद्वारे, मा. उच्च न्यायालयाने ज्या संस्थांना शासनाकडून प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे भरीव अनुदान प्राप्त होत नाही, त्या शिक्षण संस्थांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे स्पष्ट करणारा निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन अपील प्रकरणी देखील अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे त्या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम,२००५ लागू होणार नाही. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुकाराम गणपतराव बिराजदार, "माऊली निवास",श्रीरामनगर,हनुमानगढ,नांदेड.

२. मुख्याध्यापक, ग्यानमाता विद्या विहार, इंग्लीश स्कूल, एअर पोर्टजवळ, कामठा रोड, नसरतपुर,नांदेड-४३१ ६०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३१

निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ सौ. ताराबाई सखाराम बनकर, : अपिलार्थी
रा. जय भवानी नगर, प्लॉट नं. ४४, सर्वे नं. ६९, एन-४,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय,
इसारवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गटविकास अधिकारी, पंचायत समिती
कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
इसारवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये सरपंच,

ग्रामपंचायत इसारवाडी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. भूजंगराव विठ्ठलराव पूंड, इसारवाडी यांच्या प्रत्येक वर्षाच्या नमुना नंबर ८ च्या सन १९६८ ते २००८ या कालावधीतील सत्यप्रतींची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक इसारवाडी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये फक्त १९९४-९५ व २००८- २००९ या सालाच्या नमुना नंबर ८ च्या प्रतीचा समावेश असल्यामुळे, अपिलार्थीस प्राप्त झालेली ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटले. म्हणून त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय इसारवाडी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचा युक्तिवाद केला आणि त्यांना ही माहिती वारसा हक्काच्या संदर्भात हवी असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नव्याने बदलून आले असून, त्यांच्या कार्यालयातर्फे अपिलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली गेली आहे. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज केला व ज्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले, त्यावेळी श्रीमती एस.डी. वेताळ या ग्रामसेविका जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. सध्या त्या पंचायत समिती, पैठण येथे कार्यरत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जामध्ये सन १९६८ ते २००८ या कालावधीतील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती ज्या ग्रामपंचायतीकडे मागितली आहे ती ग्रामपंचायत एका पुनर्वसीत गावाची असून या ग्रामपंचायतीची स्थापना १९७२ साली झाली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो १९७२ ते १९९३-९४ व १९९६-९७ ते २००७-२००८ या कालावधीतील माहिती प्राप्त व्हावयाची आहे, असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही परिस्थितीत ही माहिती अपिलार्थीस आता द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी व माहितीची व्याप्ती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी त्यांना जर अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाली असल्याचे आढळून आले तर त्यांनी तसा अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्याकडे पाठवावा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी अशाप्रकारचा अहवाल ग्रामसेवक, ग्रामपंयाचत कार्यालय इसारवाडी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीस अद्याप द्यावयाच्या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या ग्रामसेवकावर होती त्या ग्रामसेवकावर

सध्याच्या ग्रामसेवकांकडून असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती एस.डी. वेताळ यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना श्रीमती एस.डी. वेताळ, ग्रामसेविका, पंचायत समिती, पैठण यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. ताराबाई सखाराम बनकर, जय भवानी नगर, प्लॉट नं. ४४, सर्वे नं. ६९, एन-४,

सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इसारवाडी, ता. पैठण,जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३२

निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, : अपिलार्थी
पांडव निवास, दत्त मंदिराजवळ, टिळकनगर, सिल्लोड,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अजिंठा, ता.
सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
वनसंरक्षक, वन संरक्षक कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वन परिक्षेत्र अधिकारी, अजिंठा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र, अजिंठा यांच्याकडे राखीव वनक्षेत्रापासून त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या आरागिरणीच्या अंतराबाबतची माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कोणकोणते वनपरिक्षेत्र राखीव आहे, कोणत्या राखीव वनक्षेत्रापासून किती अंतरावर आरागिरण्या चालू आहेत त्यांची नावे, पत्ते, मालकांची नावे, परवान्यासह विस्तृत माहिती व सदरील राखीव वनक्षेत्र घोषित झाल्याच्या शासनाच्या अध्यादेशांच्या सत्यप्रती, अन्वी राखीव वनक्षेत्र ते सिल्लोड येथील सुरु असलेल्या आरागिरण्यांचे अंतर, मोजणीचे निकष, अंतर मोजणीचा नकाशा, अंतर मोजणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आणि त्यांनी सादर केलेला लेखी अहवाल यांच्या प्रमाणित नकला - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी १ जानेवारी २००३ ते १ सप्टेंबर २००८ असा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ती अर्धवट आणि चुकीची असल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील वनसंरक्षक, औरंगाबाद यांच्याकडे केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे केलेले अपिलार्थीचे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील, त्यांना सहायक वन

संरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे करण्याचे सूचित केले. वास्तविक पाहता, वन संरक्षक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे दिनांक ११-१२-२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांच्या स्तरावर सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे पाठविणे या प्रकरणी संयुक्तिक व माहिती अधिकार अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता पोषक झाले असते. परंतु वन संरक्षक, औरंगाबाद यांनी अशाप्रकारची कृती न करता उलट अपिलार्थीस सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे त्यांचा प्रथम अपील अर्ज करण्याचे सूचित केले. वन संरक्षक, औरंगाबाद यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. सबब वन संरक्षक औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ११-१२-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या स्तरावर सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत पाठवून तदनंतर सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना हे अपिलार्थीच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश देतील, असे पहावे.

सहायक वन संरक्षक, जालना यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

या प्रकरणी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे सादर होण्यासाठी लागणारा विलंब आयोग या निर्णयाद्वारे क्षमापित करित आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वन संरक्षक, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्तरावर अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्या सोबतच्या जोडपत्रासह सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत पाठवावा.

३. सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांनी, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर तीन आठवड्याच्या आत या अर्जावर, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, पांडव निवास, दत्त मंदिराजवळ, टिळकनगर, सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, अजिंठा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३३
निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
रा. हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
आर.टी.ओ. कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
आर.टी.ओ. कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. व्ही. आर. गुजराथी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०५-०३-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नाही. या पत्रामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, आवश्यक

ती माहिती प्राप्त झाल्यामुळे ते विचाराधीन अपील क्रमांक ५३३/२००९ हे स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ५३३/२००९, दिनांक ०६-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३४
निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ श्री. सुनिल मरीबा कांबळे, : अपिलार्थी
रा. इंगोले यांचा वाडा, विकास नगर, कळमनुरी,
ता. कळमनुरी जि. हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त पोलीस अधीक्षक, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पोलीस उपअधीक्षक (गृह), हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

या सुनावणीसंदर्भात अपिलार्थीने त्यांचे म्हणणे दिनांक २९-०१-२०१० रोजी आयोगास फॅक्सद्वारे पाठविले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या विचाराधीन अपिलाशी संबंधित सर्व माहिती त्यांना जन माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली

यांच्याकडून प्राप्त झाली आहे. या संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार शिल्लक राहिली नसल्यामुळे त्यांचे अपील निकाली काढावे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने आयोगास त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

२. अपील क्रमांक ५३४/२००९, दिनांक ०२-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुनिल मरीबा कांबळे, इंगोले यांचा वाडा, विकास नगर, कळमनुरी, ता. कळमनुरी जि. हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), हिंगोली यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३९

निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ श्री. संगितराव सुर्यभान दारोकार, : अपिलार्थी
व्दारा- श्री. संजय सहदेव वानखडे,
विष्णू कॉम्प्लेक्स, दुसरा माळा, आय. टी. आय.
कॉलेजसमोर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. सहदेव गंगाराम वानखडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन ते दारिद्ररेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. सहदेव गंगाराम वानखडे, विभागीय भांडारपाल (सेवानिवृत्त) यांचे नावे " संकीर्ण " MPWA या शीर्षावर अदा केलेली एकूण रक्कम आणि त्यांच्याकडून वसूल केलेली रक्कम यासंदर्भात दिनांक २१-०६-१९८५ ते दिनांक ३०-०६-१९९४ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे दिनांक १५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आणि जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक

१५-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संगितराव सुर्यभान दारोकार, व्दारा- श्री. संजय सहदेव वानखडे, विष्णू कॉम्प्लेक्स, दुसरा माळा, आय. टी. आय. कॉलेजसमोर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४०

निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

१ श्री. जोंधळे अर्जुन भुजंगराव, : अपिलार्थी
रा. फुलेनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार, तालुका कंधार,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार, तालुका कंधार,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : स. कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, फुलेनगर येथील शहरी दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची जनगणना सन १९९७-९८ मध्ये झाल्याप्रमाणे फुलेनगर येथील नावानिशी यादी मिळणेबाबत व फुलेनगर येथील शहरी सर्व्हेक्षण २००५-०६ मधील दारिद्र्यरेषेखालील ज्या कुटूंबाची नावे वगळली आहेत त्यांची यादी व त्याचे कारण, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. (अर्जामध्ये त्यांनी विचारलेल्या माहितीमध्ये किंचित सुधारणा करुन)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई येथे असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीस या कार्यालयाशी परस्पर संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार यांच्याकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस कंधार शहरातील शहरी दारिद्र्यरेषेखालील जनगणना झालेली कुटूंबांची १९९७-९८ व २००५-०६ या

कालावधीची यादी त्यांच्या दिनांक ०८-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे पाठविली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील सन १९९७-९८ ची यादी व शहर सर्व्हेक्षण २००५-०६ नुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या केलेल्या जनगणनेची यादी अशा दोन याद्या देय होत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी सन १९९७-९८ मध्ये दारिद्र्यरेषेखालील यादीमध्ये समाविष्ट असलेल्या आणि सन २००५-०६ मध्ये झालेल्या सर्व्हेक्षणानुसार दारिद्र्यरेषेखालील वगळलेल्या कुटूंबाची यादी व त्यांना वगळण्याची कारणे अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि १९९७-९८ च्या दारिद्र्यरेषेखालील यादीतील, सन २००५-०६ नुसार झालेल्या सर्व्हेक्षणानुसार वगळलेल्या कुटूंबांची यादी अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवली जात नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता १९९७-९८ च्या जनगणनेनुसार दारिद्र्यरेषेखालील निश्चित केलेल्या व्यक्तींची यादी आणि २००५-०६ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार असलेली दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी या दोन यादीतील तुलना करुन याचा निष्कर्ष स्वतःस काढावा लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी सन २००५-०६ मध्ये सन १९९७-९८ च्या यादीतील काही लोकांना वगळण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहेत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा निर्णयाबद्दलची कारणे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कृतीचे स्पष्टीकरण करणारी माहिती अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सन २००५-०६ मध्ये तयार करण्यात आलेल्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या यादीमधून १९९७-९८ च्या यादीतील व्यक्ती वगळल्या गेल्याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाहीत. जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे सन १९९७-९८ व २००५-०६ मधील सर्व्हेक्षणा-नुसार त्यांनी तयार केलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची यादी ही माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य कारण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जोंधळे अर्जुन भुजंगराव, रा. फुलेनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा स. कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४२

निर्णय दिनांक ०५-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बन्सी उत्तमराव मोटे,<br>" श्रध्दा, " सह्याद्री फॅब्रिकेटर समोर, संत नामदेव नगर,<br>धानोरा रोड, बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे ' अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर) असा दर्जा देताना सब ओव्हरसिअरचा सेवाकाळ विचारात धरण्याबाबत ' या विषयावर सन १९९० ते १९९१ या कालावधीशी संबंधित एकूण तीन मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीस शासनाच्या दिनांक १२-०९-१९९० च्या निर्णयानुसार दिनांक ०१-०४-१९८१ पासून शाखा अभियंत्याचा दर्जा देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विभागीय आयुक्त औरंगाबाद कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत, या प्रस्तावावर विभागीय आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आलेल्या निर्णयाची साक्षांकीत प्रत, या अनुषंगाने ग्रामविकास विभागाकडील दिनांक १०-०५-१९९१ ची साक्षांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस पुरविली व उर्वरित दोन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस लवकरच पाठविण्याचे आश्वासीत केले. तथापि ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००९ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊनही त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही. यावर आयोगाने अपिलार्थीस, मूळात त्यांना, त्यांचा सब ओव्हरसिअरचा सेवाकाळ विचारात घेऊन दिनांक ०१-०४-१९८१ पासून शाखा अभियंत्याचा दर्जा देण्याचा प्रस्ताव तयार केला होता किंवा कसे व यासंदर्भात अपिलार्थीकडे कोणता सबळ पुरावा आहे काय, याची विचारणा केली असता, त्यास अपिलार्थीने नकारार्थी उत्तर दिले. तथापि या नंतरच्या कालावधीत अपिलार्थीस कालबध्द पदोन्नती व मानीव दिनांक मिळण्याबाबत त्यांच्या कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयास केलेल्या प्रस्तावाची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे स्पष्ट करणारे पुरावे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहेत, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा पुनश्चः त्यांच्या व विभागीय आयुक्त कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये शोध घ्यावा आणि अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. याच कालावधीमध्ये अपिलार्थीस शाखा अभियंता दर्जा देण्यावर मूळात प्रस्ताव तयार केला गेला नव्हता असे त्यांना इतर कागदपत्रावरुन आढळले तर त्यांनी तसे अपिलार्थीस याच कालावधीमध्ये कळवावे, असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे. या

कालावधीमध्ये त्यांना जर त्यांच्या कार्यालयातून हलगर्जीपणामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती, संबंधित अभिलेख्यांच्या अनुपलब्धतेमुळे देता येणे शक्य होत नसल्याचे आढळले तर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय स्वरुपाची अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई याच कालावधीमध्ये करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य कारण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बन्सी उत्तमराव मोटे, " श्रध्दा " सह्याद्री फॅब्रिकेटर समोर, संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५०
निर्णय दिनांक : ०६.०३.२०१०

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
रा.पाथरवाला बु., ता.अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद , जालना.

त्रयस्थ पक्ष : श्री. घुगे शिवहरी पंढरीनाथ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कंत्राटी ग्रामसेवकांची निवड व ग्राम सेवक मुख्यालयी राहत नसल्याबद्दल त्यांच्याविरुध्द केलेली कारवाई या विषयावर एकूण ५ मुद्यांद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.

४७/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कायालयात चलनाद्वारे भरण्याचे आवश्यक त्या तपशीलासह सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले लेखी निर्णय दि. १३.०४.२००९ रोजी पारित केले. तथापि ही सुनावणी होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ५ च्या संदर्भातील माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना दि. २५.०२.२००९ रोजी पुरविली आहे व त्यांना आता फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती देणे बाकी आहे. या (मुद्दा क्र.५) संदर्भात माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट विकास अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याने त्यांना ही माहिती त्यावेळी अपिलार्थीस वेळेवर देता आली नाही. आता ते ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०२.२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी संपूर्ण माहिती दिली आहे व

त्याबाबतचा सबळ पुरावा आयोगास दाखविला आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही हा त्यांचा मुद्दा, आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती, प्रत्यक्षात त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित सर्व गट विकास अधिकारी यांच्याकडे असल्यामुळे, अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशी कृती वेळेत न केल्यामुळे त्यांना आता ही माहिती सर्व गट विकास अधिकारी यांच्याकडून एकत्रित करुन घेऊन अपिलार्थीस पुरवावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला (बु.), ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५१
निर्णय दिनांक : ०६.०३.२०१०

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहा. अभियंता,
विज वितरण कंपनी, खोपोली (पनवेल),
जि.रायगड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहा. अभियंता,
विज वितरण कंपनी, खोपोली, ता.खानापूर,
जि.रायगड

त्रयस्थ पक्ष : श्री. बी.एम.सावंत,
सहा.अभियंता.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. २६.०९.२००८ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे संगनमताने त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याचे टाळत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, श्री. बी.एम.सावंत, सहायक अभियंता, विज वितरण कंपनी खोपोली यांनी महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम, १९७९ अन्वये वेळोवेळी मत्ता व दायित्त्व विवरणपत्रे सादर केली आहेत काय? केली असल्यास ज्या कार्यालयास सादर केली त्या कार्यालयाचे आवक-जावक वहीतील क्रमांक व दिनांक याची छायांकित प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.११.२००८ रोजी सहा.अभियंता, विज वितरण कंपनी, खोपोली यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर त्यांना संबंधितांकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज खरोखरीच सादर केला किंवा कसे या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही व अशाप्रकारचा पुरावा असल्यास तो सादर करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. याही पेक्षा दुसरे महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. बी.एम.सावंत सहा.अभियंता यांनी महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ च्या तरतुदीप्रमाणे वेळोवेळी मत्ता व दायित्त्व विवरणपत्र सादर केलेल्या पत्राची व सदर पत्र ज्या कार्यालयात प्राप्त झाली त्या कार्यालयाच्या आवक-जावक नोंदवहीच्या छायाप्रतीची मागणी केली आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्रयस्थ पक्ष श्री. बी.एम. सावंत हे वीज वितरण कंपनी मर्यादित या

कंपनीचे कर्मचारी असल्यामुळे, त्यांना वीज कंपनीचे सेवा व वर्तणूक विषयक नियम लागू होतील, अर्थातच त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ लागू होणार नाहीत. त्यामुळे त्रयस्थ पक्षाने त्यांचे मत्ता व दायित्त्व विवरणपत्र या अधिनियमातील तरतुदीनुसार वीज कंपनीकडे सादर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचे अवलोकन करता आवश्यक त्या कागदपत्राचा अभाव आणि संबंधितंच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे,'रायगड',राजे संभाजी नगर (प), तुळजापूर, जि.उस्मानाबाद-४१३ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता,विज वितरण कंपनी, खोपोली (पनवेल), ता.खानापूर,जि.रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहा. अभियंता,विज वितरण कंपनी, खोपोली (पनवेल),ता.खानापूर,जि.रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५२
निर्णय दिनांक : ०६.०३.२०१०

१. श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरवून दंड करणे अपेक्षित असताना देखील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निकालपत्रामध्ये अशाप्रकारची कार्यवाही न केल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली गेली नाही, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीतील "३०५४ नॉन प्लॅन गट-अ या योजनेअंतर्गत प्रमुख जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, इतर ग्रामीण मार्ग इत्यादी मार्गावरील जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून पूर्ण, प्रगतीत, सुरु

नसलेले, नवीन निविदा स्तरावरील सर्व प्रकारच्या कामाबाबत एकूण सात मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मंजूर कामांची यादी, मंजूर कामांच्या अंदाजपत्रकांची व तांत्रिक मान्यतेची प्रत व मोजमापपुस्तिकेच्या प्रती व मोजमाप पुस्तिकेवरुन ज्या कंत्राटधारकाची कामांची बीले अदा केली आहेत, त्या चेकच्या प्रती, या शीर्षाखाली केलेला एकूण खर्च, अंदाजपत्रक, सन २००६-०७ ची अंदाजपत्रक व दरसूचीची छायांकित प्रत, प्रयोगशाळेतून तपासणी केलेल्या बांधकाम साहित्याच्या प्रमाणित प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचे चाचणी अहवालासंबंधी परिपत्रक क्र.५६४२/९६, दि. २८.०८.१९९६ ची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५६५८/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दि. ११.०९.२००८ रोजी चलनाद्वारे केला. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांना त्वरित उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या प्रतिनिधीसह, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती शुल्क भरुनही अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत दि. ०५.०३.२०१० रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने दिलेल्या पत्त्यावर अपिलार्थी स्वतः अथवा अन्य कोणीही न आढळल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता येऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसादानुसार अपिलार्थीने या प्रकरणी दि. ११.०९.२००८ रोजी आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा तपशील कळविण्याचा दिनांक व प्रत्यक्षात अपिलार्थीने सदरचे शुल्क भरल्याचा दिनांक पाहता, अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस दि. २७.०९.२००८ अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क देय होत होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये अपिलार्थीस संपूर्ण माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ च्या संदर्भातील मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांच्या दि. २८.०८.१९९६ च्या परिपत्रकाची प्रत आयोगास आढळून आली नाही. याचाच अर्थ, आता देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊ

केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरुनही अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित वेळेतच नव्हेतर आजतागायत प्राप्त झाली नाही, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५६५८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क स्वीकारुनही त्यासंदर्भातील कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थीस सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देऊ केली असल्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'जन माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे, अशा सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ५६५८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत परत करावे.

४. सचिव (सा.बां.) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दि. १६.०८.२००८ रोजी उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (बां.) या पदावर कार्यरत असलेले) तथा कार्यकारी अभियंता (बां.) जि.प.उस्मानाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना सध्याचे जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर,तांबरी विभाग, विद्यानगर, उस्मानाबाद-४१३ ५०१..

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५३
निर्णय दिनांक : ०६.०३.२०१०

१. श्री. उमाप ईश्वर श्रीमंत, : अपिलार्थी
रा. अंधोरी, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय, भूम,
जि. उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी,
सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद,उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, अंधोरी, पो.आरणगाव,
ता.परंडा, जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी : उप अभियंता,
जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा,
उपविभाग भूम, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय, भूम यांच्याकडे मौ. अंधोरी पो. आरणगाव, ता.परंडा यांच्या कार्यक्षेत्रातील मराठवाडा पॅकेज व बोअर पुनर्भरण प्रकल्पाअंतर्गत झालेल्या कामाच्या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दि.२८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर संबंधित उपअभियंत्याने कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील, सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, अंधोरी व उपअभियंता, जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, भूम,जि.उस्मानाबाद उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी उपअभियंता, जि.प.ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग भूम,जि.उस्मानाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग भूम, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती भूम, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांच्या दि.२८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उमाप ईश्वर श्रीमंत,रा. अंधोरी, पो.आरणगाव,ता. परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, अंधोरी, पो.आरणगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता,जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग भूम,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४६

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

१ श्री. सावंत दत्तराव अण्णासाहेब, : अपिलार्थी
मु. पो. उखळी बु., ता. सोनपेठ, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सोनपेठ, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, जि. परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०२-०१-२००९ रोजी श्री. मंदाडे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर केला होता. परंतु मुदत संपल्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक ०४-०२-२००९ रोजी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. ताटे यांच्याकडे प्रथम अपील केले. तरीही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने ते जिल्हा कृषी अधीक्षक, परभणी यांच्याकडे गेले असता त्यांनी अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे जाण्याचा सल्ला दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००५ ते २००८ मध्ये उखळी येथील शेतकऱ्यांना फळबागेसाठी किती अनुदान दिले व ते कोणास दिले, या कालावधीत ज्या शेतकऱ्यांना गांडूळ प्रकल्प दिले त्यांची यादी, या कालावधीमध्ये नाला सरळीकरणाचे किती काम झाले व कोणाच्या सहाय्याने केले, या कालावधीतील शेततळे अनुदानाविषयी माहिती, या कालावधीतील पाणी आडवा पाणी जिरवा या योजनेअंतर्गत केलेल्या कामाची माहिती व वरील सर्व कामे पूर्ण झाल्याचा खुलासा - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाद्वारे मागितली असून, या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहिती मागविली होती त्यावेळी श्री. एन.पी. मंदाडे या नावाचे कृषि अधिकारी हे माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. तसेच अपिलार्थीने दिनांक ०४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले त्यावेळी श्री. एस.एल. ताटे या नावाचे अधिकारी जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत होते, आता ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ते ७ दिवसाच्या आत देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील एकूण ६ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक ४, ५ शी संबंधित अंशतः व मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित पूर्ण माहिती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ४ व ५ द्वारे मागणी केलेल्या माहितीतील 'धान्य वाटपाचा तपशील' या भागावरील माहिती वगळता उर्वरित भागावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. 'धान्य वाटपाचा तपशील' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावरील माहिती हे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केले नसल्यामुळे, अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती एखाद्या विशिष्ट मुद्यावर मागणे अभिप्रेत आहे. जेणेकरुन अर्जदारास निश्चित स्वरुपात माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना सुलभ होईल. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ६ द्वारे, 'वरील सर्व कामे पूर्ण झाल्याचा खुलासा द्यावा', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. ही माहिती, अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित ३ मुद्यांवरील संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर स्पष्ट केलेली देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एन पी. मंदाडे हे जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. श्री. एन. पी. मंदाडे हे सध्या जिल्हा लातूर, तालुका औसा येथे मंडळ कृषी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या केलेल्या उपेक्षेमुळे कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय अपिलार्थीस अपेक्षित माहिती-पासून वंचित राहावे लागले आहे. त्यामुळे श्री. मंदाडे हे अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावायाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब श्री. एन. पी. मंदाडे, मंडळ कृषी अधिकारी, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा, असे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न होण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एन.पी. मंदाडे हे तर जबाबदार आहेतच परंतु सध्याचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सोनपेठ मधील संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आहेर डी. एल. व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक हे देखिल तितकेच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. कारण त्यांनी देखिल या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सुनावणीच्या दिवसापर्यंत कोणताही सकारात्मक प्रयत्न केला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. आयोगाकडील सुनावणीची नोटीस त्यांना फेब्रुवारी २०१० च्या पहिल्या आठवड्यात प्राप्त झाली असताना व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, ही माहिती त्यांना आज दिनांक

०६-०३-२०१० पर्यंत तयार करुन आणून आयोगास दाखविणे सहज शक्य होते. तथापि ते ही माहिती आयोगास आज देखिल दाखवू शकत नाहीत, अशी या प्रकरणाची आज रोजीची वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी देखिल कोणतेही प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या निष्क्रीय कार्यशैलीद्वारे त्यांनी देखील अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून निश्चितपणे वंचित ठेवले असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस कृषी आयुक्त, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एन. पी. मंदाडे यांना उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

४. कृषी आयुक्त, पुणे यांना जन माहिती अधिकारी श्री. डी. एल. आहेर, कृषि अधिकारी, सोनपेठ, जिल्हा परभणी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सावंत दत्तराव अण्णासाहेब, मु. पो. उखळी बु., ता. सोनपेठ, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सोनपेठ, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. एन. पी. मंदाडे, मंडळ कृषि अधिकारी, ता. औसा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४७

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

१ श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, : अपिलार्थी
बालाजी पान सेंटर, बसस्टँड समोर, मु. पो. सेलू,
ता. सेलू, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पंचायत समिती सेलू,
जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्वशिक्षा अभियान,
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विविध कालावधीतील काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला असल्याचे कबूल केले व या अर्जामधील प्रकरणाची विविध स्तरावर चौकशी होऊन ते निकाली काढण्यात आल्याचे अपिलार्थीस कळविले. या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती त्यांना दिली नसल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५व ७ शी संबंधित माहिती मिळणे बाकी आहे. ती माहिती त्यांना त्वरित मिळावी, अशी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच बदलून आले आहेत. तथापि त्यांना कार्यालयात असलेल्या अभिलेख्यावरुन अपिलार्थीस ही माहिती वेळोवेळी दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५ व ७ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ही माहिती ते अपिलार्थीस लागलीच देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा असून, अपिलार्थीस माहिती देण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीने ज्या प्रकरणाविषयी त्यांच्याकडे माहिती मागविली आहे त्या प्रकरणावर झालेल्या चौकशीबाबत अपिलार्थीस या पत्रामध्ये अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास अशा प्रकारचा प्रतिसाद देण्याची कृती ही त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शवित आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५ व ७ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. ती माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५ व ७ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. लोंढे, गट शिक्षणाधिकारी (सध्या गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर या पदावर कार्यरत) यांनी कोणतीही माहिती न देऊन या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५ व ७ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. लोंढे यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, बालाजी पान सेंटर, बसस्टँड समोर, मु. पो. सेलू, ता. सेलू, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्वशिक्षा अभियान, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. लोंढे गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. ( By R.P.A.D.)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४८

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

१ श्री. राधाकिशन गंगाराम लिंगायत, : अपिलार्थी
मु. झोडगांव, पो. करंजी, ता सेलू, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा
योजना, सेलू, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सेलू, जि. परभणी

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्रीमती छाया सखाराम कुंभार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०१-०१-२००० पासून माहिती मागविली असून, त्यांना दिनांक ०१-०१-२००० ते जानेवारी २००१ पर्यंतची माहिती मिळाली नाही. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट व खोटी माहिती पुरविली

असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे झोडगांव, तालुका सेलू येथील अंगणवाडी क्रमांक १ मधील दैनंदिन आहार वाटप रजिस्टरची व इतर माहितीच्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना उद्देशून केले होते. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे पाठविला. त्यांनी या अपील अर्जावर दिनांक ०७-०२-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक २५-०२-२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००९ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती ही अर्धवट, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-०१-२००० ते जानेवारी २००१ या कालावधीशी संबंधित व तसेच

त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'क', 'ड' व 'इ' शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. ही माहिती त्यांना त्वरित मिळावी, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने ज्या प्रकल्पाविषयी त्यांच्याकडे माहिती मागविली आहे तो प्रकल्प मूळात २००१ मध्ये सुरु झाला असल्यामुळे, अपिलार्थीस सन २००० ते २००१ या कालावधीमधील माहिती देणे त्यांना शक्य नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'क' व 'ड' शी संबंधित माहिती त्यांना दिनांक १९-०३-२००९ व १२-०९-२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'इ' द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना इंधन बील न देण्याबाबतचे कारण विचारले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे कारण विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०७-२००१ ते २४-०८-२००१ या कालावधीतील माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. मुद्दा क्रमांक 'क' च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मेडीकल रजेवर जाणाऱ्या कार्यकर्ती / मदतनीस यांना शासनाच्या आदेशाप्रमाणे मानधन कोणत्या आदेशान्वये देण्यात येत नाही त्या आदेशाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कार्यकर्ती / मदतनीस यांच्या बाळंतपणाप्रित्यर्थच्या अनुज्ञेय रजेचे शासन निर्णय अपिलार्थीस दिले आहेत. या निर्णयामध्ये फक्त बाळंतपणाच्या रजेचा उल्लेख

आहे. जन माहिती अधिकारी यांनी यावर असा खुलासा केला आहे की, अंगणवाडी मदतनीसाच्या नेमणूका ठोक रकमेच्या तत्त्वावर होत असल्याने त्यांना वैद्यकीय रजा अनुज्ञेय नाही. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अंगणवाडी मदतनीसांच्या नेमणूका करण्याकरिता शासनाने त्यांना दिलेल्या आदेशाच्या प्रती या मुद्यासंदर्भात माहिती म्हणून अपिलार्थीस पाठवाव्यात व त्यासोबत त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेला खुलासा अपिलार्थीस करावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'ड' च्या संदर्भात अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ३१-१०-२००८ रोजी केला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००८ रोजी माहिती पुरविली, हा त्यांचा युक्तिवाद आयोग स्वीकारत नाही. अपिलार्थीस जरी ही माहिती वेगळ्या संदर्भाद्वारे दिली असली तरी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी अर्ज केल्यास त्यांना त्या अर्जाच्या संदर्भात माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. त्यामुळे जन माहती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'ड' शी संबंधित संपूर्ण माहिती द्यावी लागेल.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांना आता देय असलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ' च्या संदर्भात दिनांक ०७-०७-२००१ ते २४-०८-२००१ या कालावधीशी संबंधित संपूर्ण माहिती आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'क' व 'ड' च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-१०-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल

त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ', 'क' व 'ड' च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राधाकिशन गंगाराम लिंगायत, मु. झोडगांव, पो. करंजी, ता सेलू, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४९

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबुराव जनार्धन गिराम,<br>मु. पो. मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मोठेवाडी, ता.<br>माजलगांव, जि. बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी, पंचायत समिती,<br>माजलगांव, जि. बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२०००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे इष्ट राहिल, असे आयोगास वाटते. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबुराव जनार्धन गिराम, मु. पो. मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५४

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी

९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड - ४३१ ६०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

पाणीपुरवठा विभाग,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. जाधव यांनी त्यांना दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपूर्ण व चुकीची माहिती कळविली तसेच दुसरे जन माहिती अधिकारी श्री. एस. व्ही. कायंदे यांनी त्यांच्या दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध झाल्यानंतर तात्काळ पुरविण्यात

येईल असे उत्तर दिले. यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५९४ त्यांना दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील त्यांचे आदेश दिनांक ११-१२-२००८ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे संबंधितांनी त्यांना दिनांक ३०-१२-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८, ९ व ११ या मुद्दयांचा समावेश नाही. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड क्षेत्रातील सर्व विभागांना चालू असलेल्या पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनच्या कामासंदर्भात एकूण १३ मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दोन जन माहिती अधिका-यांशी संबंधित होती. त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र पत्राव्दारे प्रतिसाद दिला. तथापि एका उप अभियंत्याने अपिलार्थीस प्रोजेक्ट मॅनेजर, आय. एल. ॲण्ड एफ. एस. यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली व दुसरे उप अभियंता श्री. कायंदे यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होताच ती त्यांना पुरविण्यात येईल असे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी दिनांक ११-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी व्यथित होऊन वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत असा युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८, ९ व ११ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये सीडीच्या स्वरुपात माहिती मागितली नसताना त्यांना सीडी पुरविण्यात आली ही जन माहिती अधिकारी यांची झालेली चूक आहे. त्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दयांवरील अपिलार्थीस ज्या स्वरुपात माहिती अपेक्षित आहे त्या स्वरुपात ती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. थोडक्यात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. व्ही. कायंदे यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. व्ही. कायंदे (सध्या उपविभागीय अभियंता या पदावर हिंगोली येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड - ४३१ ६०४.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५५

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार भगवान शिंदे,<br>व्दारा- अध्यक्ष, वकील संघ, परंडा, तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे व दिलेली माहिती अपूर्ण, अर्धवट व दिशाभूल करणारी असल्यामुळे आणि साक्षांकीत केलेली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये दुरुस्ती करण्यात आलेल्या पाझर तलावांच्या संदर्भात काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २,७४८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करुन अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असा निष्कर्ष काढण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २,७४८ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही केल्याचे दिसून येत नाही. एवढे असूनही माहिती मुदतीत न दिल्याचे आणि दिलेली माहिती अपूर्ण, अर्धवट आणि दिशाभूल करणारी असल्याचे अभिप्राय देऊन त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांना देण्यात आलेली कथित माहिती कशा प्रकारे अपूर्ण, अर्धवट आणि दिशाभूल करणारी आहे हे आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही, अथवा हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, आणि माहिती अधिका-याने सूचित केलेले शुल्क न भरुन अधिनियमातील कलम ७ (५) चा भंग केला आहे हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार भगवान शिंदे, व्दारा- अध्यक्ष, वकील संघ, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५६

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

१ श्री. उमाकांत विश्वनाथराव बावगे, : अपिलार्थी
रा. वंजारवाडी, पो. हंडरगुळी, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना न मिळाल्यामुळे आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीने ते दुःखी कष्टी झाले असल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहसील कार्यालय, देवणी यांनी अपिलार्थीच्या विरुध्द दिलेल्या निर्णया-संदर्भात एकूण २१ मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या नंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे सदरचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०९-२००८ रोजी चलनाव्दारे भरले व दिनांक २४-०९-२००८ रोजी सदरचे चलन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सादर केले. परंतु आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस कथित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या वकिलास दिनांक २८-११-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस तहसीलदार, देवणी यांच्याकडून दिनांक २८-११-२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. परंतु या माहितीपैकी नेमकी कोणत्या

मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस अपूर्ण वाटत आहे हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. तथापि या प्रकरणी एक बाब अशी निदर्शनास येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे दिनांक २२-०९-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके चलनाव्दारे भरुन दिनांक २४-०९-२००८ रोजी सदरचे चलन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सादर केले होते. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुनही दिनांक २८-११-२००८ रोजी म्हणजे, अंदाजे दोन महिन्याच्या विलंबाने त्यांना माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस सशुल्क माहिती विलंबाने देण्याची कृती चुकीची आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी घेतला असल्यामुळे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी पात्र होत आहेत. परिणामी तहसीलदार, देवणी यांना अपिलार्थी यांच्याकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२.    जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक    ०६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१    श्री. उमाकांत विश्वनाथराव बावगे, रा. वंजारवाडी, पो. हंडरगुळी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२    जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३    जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४    निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५७

निर्णय दिनांक ०६-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार (M.R.E.G.S.), तहसील कार्यालय, पूर्णा,<br>तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय<br>कार्यालय, स्टेशन रोड, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | १. नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी |
| | | : | २. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे आणि सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना आदेशित करुनही अद्यापपावेतो त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्णा तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात एप्रिल २००८ ते ऑगस्ट २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज तहसीलदार, पूर्णा यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी मूळ स्वरुपात वर्ग केला आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे तहसीलदार, पूर्णा यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने आपला लेखी युक्तिवाद आयोगास फॅक्सव्दारे पाठविला असून या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो एकूण आठ ग्रामपंचायतीच्या संदर्भात माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी देखील अजूनही आठ ग्रामपंचायतीची माहिती देणे बाकी असल्याचे आयोगासमोर कबूल केले व ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून आठ ग्रामपंचायतीशी संबंधित माहिती प्राप्त होणे बाकी आहे व ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०४
निर्णय दिनांक: ०९-०३-२०१०

१. श्री. राजेंद्र किसनराव गुप्ते, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद,लघुपाटबंधारे विभाग,बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद विभाग, बीड
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे,जिल्हा परिषद विभाग,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अनियमितपणा झाकण्यासाठी रद्दी कागद घालून त्यांना मूळ माहिती न पुरविल्यामुळे आणि त्यांच्या संस्थेने केलेल्या कामाचे अन्य संस्थेच्या नावाने देयक काढून त्यातील पैसे घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळण्यासाठी जन

माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून दिरंगाई केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंधापूरी व मुर्शदपूर ता.बीड या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या विशेष दुरुस्तीच्या कामाबाबत, त्या कामाच्या निविदा संचिका व त्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत मिळणेबाबत,अशी माहिती व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०००/- इतके त्यांना चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.०४.२००७ रोजी चलनाद्वारे केला. तथापि शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. ०२.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०४.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पुरविली. तथापि या कथित माहितीमध्ये अनावश्यक कागदपत्रे असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व संबंधित जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविली गेलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नव्हती. त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. ०४.०४.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविल्याचे आयोगास अवगत केले व या संदर्भातील पुरावा आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने दि. १९.०४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०००/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरले होते. त्यामुळे अशा परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती ताबडतोब मिळणे अपरिहार्य होते. तथापि अपिलार्थीला माहिती न मिळाल्याने त्यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०३.२००९ रोजी प्रथम अपील करावे लागले. यावरुन अपिलार्थीने दि. १९.०४.२००७ रोजी पैसे भरल्यानंतर अकरा महिन्यापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापृष्ठयर्थ लावलेला विलंब कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही सुमारे दोन वर्षांचा कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न होणे, ही बाब निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तरतुदींना छेद देणारी आहे, अशी आयोगाची खात्री आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही संपूर्ण दोन वर्षे इतक्या कालावधीमध्ये देखील माहिती उपलब्ध न करुन देऊन, त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद,बीड व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकारी अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी समजावे, अशी तरतुद आहे, अशा सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत होऊनही व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार त्यांच्या कार्यालयात भरुनही, अद्यापपावेतो संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. १०००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. १०००/-इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

४. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद,बीड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना जन माहिती अधिकाऱ्याचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र किसनराव गुप्ते, 'कृष्णाई', अयोध्यानगर,एम.आय.डी.सी.एरीया, बीड

ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे,जिल्हा परिषद विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०६
निर्णय दिनांक: ०९-०३-२०१०

१. श्री. बाबुराव यशवंता बांगर, : अपिलार्थी
   रा.आनंदगाव,ता.शिरुर कासार,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
   गट विकास अधिकारी,
   पंचायत समिती, शिरुर कासार,जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
   मुख्य कार्यकारी अधिकारी,
   जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांच्याकडे, मौ.आनंदगाव ता.शिरुर कासार येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या इस्टिमेटची प्रत,अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संबंधितांकडून माहिती

प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०२.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी दि. २६.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहितीसाठीचा मूळ अर्ज ग्रामपंचायत आनंदगाव, ता.शिरुर कासार यांच्याकडे वर्ग करण्याचे सूचित केले. यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार,जि.बीड यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडील दि. १३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. अपिलार्थीने ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही गट विकास अधिकारी यांना दिलेली आहे. तथापि माहिती प्राप्त होऊनही, माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांनी दि. १३.०४.२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीची माहिती प्राप्त झाल्याची पोचपावती त्यांनी आयोगासमोर सादर केली.या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर कासार,जि.बीड यांच्याकडून दि. १३.०४.२००९ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट विकास अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती, ही माहिती संबंधित गावाच्या (मौ.आनंदगाव, ता.शिरुर कासार,जि.बीड) पाणीपुरवठा समितीच्या ताब्यात होती. सदर

पाणीपुरवठा समितीस, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे, 'सार्वजनिक प्राधिकरण' असे संबोधता येणार नाही. एवढे असूनही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार,जि.बीड यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील आवश्यक ती माहिती त्यांना विनामूल्य पुरविली आहे. प्राप्त माहितीवर तोंडी अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. तसेच यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखील कोणतेही भाष्य लेखी स्वरुपात केलेले नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबुराव यशवंता बांगर, मु.आनंदगाव,पो.पाडळी, ता.शिरुर कासार, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर कासार,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१०
निर्णय दिनांकः ०९-०३-२०१०

१. श्री. बापू सदाशिव गायकवाड, : अपिलार्थी
रा.देवळाली, ता.जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहा.धर्मादाय आयुक्त,
उपविभाग, उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त,
उस्मानाबाद विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना

जाणीवपूर्वक दिली नाही, तसेच अपिलार्थीस माहिती मिळू नये, विलंब व्हावा म्हणून सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. २०.१२.२००८ रोजी त्यांचे प्रथम अपील नामंजूर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, न्या.नों.क्र. एफ-८१,उस्मानाबाद या संस्थेच्या कार्यकारी मंडळ, सर्वसाधारण सभा, मालमत्ता, करण्यात आलेले बांधकाम व कामकाजाबाबत सन १९६२ पासून ते दि. २२.०९.२००८ रोजीच्या कालावधीतील काही माहिती एकूण २० मुद्यांद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ च्या संदर्भातील माहिती दिली व मुद्दा क्र. १ ते ४ व ७ ते २० च्या संदर्भात ही माहिती, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ,उस्मानाबाद यांच्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.११.२००८ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी या अपील अर्जावर दि. २३.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आपला निर्णय पारीत करुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दि. २१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ,उस्मानाबाद यांच्यासंदर्भात काही माहिती मागविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागविली आहे. ती संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अंतर्गत नोंदणी झालेली संस्था असून या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ हे लागू होत नसल्याचा निर्णय मा.उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन नं.५२९४/२००८, मुख्य विश्वस्त श्री. गोविंद रामानंद सद्‍गुरु प्रल्हाद महाराज रामदासी संस्थान,साखरखेर्डा, जि.बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर यांच्यासंदर्भात दिला असून त्यातील काही भाग खालीलप्रमाणे उद्धृत केला आहे.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

वरील निर्णयाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती परस्पर संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याची त्यांची सूचना चुकीची आहे, असे दिसून येते. तथापि माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता सार्वजनिक प्राधिकरणाचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती सार्वजनिक प्राधिकरणास त्यांच्या अधिकाराचा वापर करुन ती प्राप्त करुन घेता येते, ही तरतुद पाहता, जन माहिती अधिकारी यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३७ (१)(ब) आणि(क) च्या तरतुदीनुसार संबंधित संस्थेकडून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे मागवून घ्यावीत. या कागदपत्रांपैकी सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यांतर्गत जी कागदपत्रे संस्थेला नियमितपणे धर्मादाय आयुक्तांकडे सादर करणे अनिवार्य असेल, अशा कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती धर्मादाय आयुक्त यांना सादर करणे संस्थेस सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यांतर्गत अनिवार्य नसेल, ती माहिती अपिलार्थीस उघड करण्याचा निर्णय सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर घ्यावा, सहायक धर्मादाय आयुक्त यांना वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापु सदाशिव गायकवाड, मु.पो.देवळाली, ता.जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८११
निर्णय दिनांक: ०९-०३-२०१०

१. श्री. जाधव वामन नामदेव, : अपिलार्थी
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
परीक्षा नियंत्रक,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव,परीक्षा कक्ष,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक

जन अपिलीय अधिकारी : कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. प्रदीप दांडेगावकर, श्रीमती सविता जळकोटे, श्रीमती साबणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याचे टाळल्याने त्यांच्यावर जबर दंड ठोठावण्यात यावा. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे, २००८ ते जून, २००८ या कालावधीतील त्यांच्या प्राधिकरणातर्फे घेतल्या गेलेल्या बी.एड.च्या परीक्षेसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. प्रदीप दांडेगावकर व श्रीमती सविता जळकोटे व श्रीमती साबणे यांच्या मे, २००८ मध्ये घेतलेल्या बी.एड.परीक्षेच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांची व आय.सी.आर.३० गुण वस्तुनिष्ठची छायाप्रत व विद्यापीठाचे संबंधित विषयाचे Model Answers च्या छायांकित प्रती, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. या अर्जावर अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विद्यापीठाच्या नियमानुसार कोणासही देता येत नाही, असे कारण दर्शवून ती अपिलार्थीस उघड करण्याचे नाकारले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ११.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्यात येऊ नये, असा ठराव पारित केलेल्या सभेच्या कार्यवृत्तांताची प्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री. प्रकाश दांडेगावकर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्रयस्थ पक्षाच्या उत्तरपत्रिकांची माहिती मागविली होती. तथापि अशाप्रकारची माहिती उघड न करण्याचा निर्णय त्यांच्या विद्यापीठाने यापूर्वीच घेतला असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली नाही. आज रोजी सुनावणीमध्ये आयोगाने त्यांना आदर्श उत्तरपत्रिका न देण्याबाबत त्यांच्या विद्यापीठाच्या निर्णयाच्या प्रतीची मागणी केली असता, त्यांनी परीक्षा मंडळाच्या दि. २१.०८.२००८ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांताची प्रत आयोगास सादर केली. या कार्यवृत्तांतामध्ये, 'आदर्श उत्तरपत्रिका' उघड करु नयेत, अशा अर्थाचे कोणतेही विधान नाही, असे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, आयोगाने त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयांनी वेळोवेळी अशा प्रकरणी घेतलेल्या भूमिकेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाने दिलेल्या विद्यापीठाच्या बी.एड.परीक्षेच्या उत्तरपत्रिका न देण्याची कृती बरोबर आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील विशेषतः, आदर्श उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. अशाप्रकारच्या उत्तरपत्रिका प्रसिध्द केल्यास उलट विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होईल, त्यांना आपले नेमके कोठे चुकते, याचाही बोध होईल व परिणामी ज्ञान प्रबोधनास मदत होईल. आदर्श उत्तरपत्रिका उघड केल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१) व ९ च्या कोणत्याही तरतुदीस छेद जाईल, असे आयोगास वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, 'आदर्श उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती' ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना जबर दंड ठोठवावा,अशी विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असल्यामुळे व सदर प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरुन दिला आहे. येथे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने माहिती देण्याचे टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे कोणतेही आदेश आयोग पारित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'आदर्श उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती' ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वामन नामदेव जाधव, द्वारा श्री. प्रदीप दा.दांडेगावकर, धरम काटयाजवळ, नांदेड रोड, वसमत, जि.हिंगोली-४३१ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव,परीक्षा कक्ष,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९४
निर्णय दिनांक ०९/०३/२०१०

१ श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय कार्यालय, लातूर.

**निर्णय**

श्री. सुरेश सुदामराव गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०५.२००९ रोजी केलेले दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०५.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, यशवंत नगर, मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८२
निर्णय दिनांक ०९/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मारोती लक्ष्मणराव गोरे,<br>रा. तरोडा बु., नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मारोती लक्ष्मणराव गोरे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०३.२००८ रोजी केलेले दिनांक १३.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.०७.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि.०३.११.२००७ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मारोती लक्ष्मणराव गोरे, "शाकुंतल" १५, स्वस्तिक नगर, शिव रोड, तरोडा बु., नांदेड, ता.जि. नांदेड-५.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०२

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

१ श्री. वामन चंपतराव ढाले, : अपिलार्थी
मु. पो. बासंबा, ता. जि. हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत बासंबा, ता. जि. हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये मौजे बासंबा येथील ग्रामपंचायत कोट्या अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाच्या मार्फत प्राप्त झालेल्या निधीमध्ये तयार केल्या गेलेल्या सिमेंट रोडचे झालेले काम, त्यांचे अंदाजपत्रक, जमा खर्च व मोजमाप पुस्तिका यांच्या सत्यप्रती, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

तथापि प्राप्त माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १८-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असे आयोगास सांगितले व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००९ रोजी पोस्टाने माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत करुन यासंदर्भात आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे. तथापि ही माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असताना ती पोस्टाद्वारे पाठविण्याचे प्रयोजन काय, अशी विचारणा आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली असता, त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांची मौजे बासंबा येथून बदली होत असल्यामुळे, त्यांनी आपल्या कार्यभाराच्या शेवटच्या दिवशी अपिलार्थीस माहिती पोस्टाने पाठविली.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या

शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तपशील जो त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे त्यांना अनिवार्य होते, तो तपशील त्यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी सूचित करणारे पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी पात्र होत आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे व्यक्तिशः माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता पुन्हा व्यक्तिशः माहिती पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. तसेच अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी स्वतः ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी संबंधितांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वामन चंपतराव ढाले, मु. पो. बासंबा, ता. जि. हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बासंबा, ता. जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०३

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

१ श्री. शेख अब्दुल गनी शेख अब्दुल अजीज, : अपिलार्थी
रा. पलटन मोहल्ला, हिंगोली, ता. जि. हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस निरीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग,
पोलीस मुख्यालय, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), हिंगोली, ता. जि. हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : अप्पर पोलीस अधीक्षक, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या दिनांक

१४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्याकडे, "हिंगोली न्यायालयाने प्रदान केलेले हमदस्त एन. पी. डब्ल्यु. पकड वारंट तामील करुन एफ. आय. आर. क्रमांक ३९४/०६ दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या घटना स्थळ पंचनाम्यामध्ये मेडीकल सर्टिफिकेट व अर्जदाराच्या बयानाची सत्यप्रत," ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीच्या अर्जासोबत या माहिती व्यतिरिक्त हिंगोली जिल्ह्यामध्ये गुन्हा अन्वेषण विभागाने किती छापे मारले, किती गन्ह्यांची नोंद झाली ही सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती, ज्यामध्ये संबंधितांचे नाव, कलम व न्यायालयात दाखल केलेले खटले यांचा समावेश होता, अशीही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, हिंगोली यांच्याकडे केले होते. संबंधित पोलीस निरीक्षकाने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत .

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांना दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे असे लिहून दिले आहे की, त्यांनी पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्याशी चर्चा केली असता, त्यांना सदरची माहिती पोस्टाने

पाठविल्याचे समजले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पाठविली असल्यामुळे, त्यांना आता या माहितीची आवश्यकता नाही, तरी त्यांचे अपील निकाली काढण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-०१-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पूर्णतः पुरविली गेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये बयान व मेडीकल सर्टिफिकेट नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, या बाबतीमध्ये तक्रारीचे स्वरुप अदखल पात्र गुन्ह्याचे असल्यामुळे व कायद्यानुसार अपिलार्थीच्या चौकशीचे आदेश नसल्यामुळे त्यांनी तक्रारकर्त्याला प्रथम वर्ग दंडाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दाद मागण्याची समज दिली आणि तशी समज प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ संबंधितांची पोचसही त्यांना प्राप्त आहे. यामुळे अपिलार्थीस मेडीकल सर्टिफिकेटची प्रत व बयानाची प्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे प्रकरण पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः मिळाली असल्यामुळे व विशेषतः अपिलार्थीने जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे त्यांच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीची कबूली पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख अब्दुल गनी शेख अब्दुल अजीज, पलटन मोहल्ला, हिंगोली, ता. जि. हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), हिंगोली, ता. जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०८

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

१ श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, : अपिलार्थी
रा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु.घर नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.), बीड ता.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या सुनावणीची आजची तारीख पुढे ढकलण्यासाठी केलेले लेखी अर्ज आयोगास सादर करण्यात आले आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांच्या अर्जातील विनंती मान्य करुन, या अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत असून, सदर सुनावणी आता दिनांक १०-०५-२०१० रोजी,

दुपारी ०३.०० वाजता ठेवण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांची उपस्थिती अनिवार्य आहे. यापैकी कोणीही अनुपस्थित राहिले तरी प्रकरणामध्ये एकतर्फी निर्णय घेण्यात येईल व तो संबंधितांना बंधनकारक राहील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु.घर नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.), बीड ता.जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०९

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

१ श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी
९-४-४५५, कयुम प्लॉट्स, नांदेड,
ता. जि. नांदेड - ४३१ ६०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महनगरपालिका आयुक्त कार्यालय,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपायुक्त (सा.), नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक ११-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सुनावणीसाठी दिनांक ०६-१०-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित केले. परंतु सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर काही

तात्कालीक कामानिमित्त सुनावणी घेण्यासाठी असमर्थता व्यक्त केली आणि अपिलाची सुनावणी दिनांक १०-१०-२००८ रोजी पुढे ढकलली. ठरविल्याप्रमाणे अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यावेळी गेले असता, माहिती अधिकारी व्यतिरिक्त इतर व्यक्ती त्यांच्या कार्यालयात उपस्थित होते आणि जन अपिलीय अधिकारी हे त्यांच्या अपिलावर लक्ष केंद्रीत करु शकत नव्हते. शेवटी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्राद्वारे निर्णय कळविण्यात येईल असे आश्वासित केले. परंतु अपिलार्थीने द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न लागल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. के. टी. शास्त्री, फोरमन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा केंद्र यांच्या सेवा विषयक बाबी संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती संकलीत करण्यासाठी वेळ लागेल, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या या अर्जासंदर्भात दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा सुनावणी ठेवूनही अपिलार्थीस कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती आणि विशेषतः ज्या कारणास्तव अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे ते कारण पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहिल, असे आयोगास या टप्प्यावर वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान, ९-४-४५५, कयुम प्लॉट्स, नांदेड, ता. जि. नांदेड - ४३१ ६०४

२ जन माहिती अधिकारी, महनगरपालिका आयुक्त कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१२

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

१ श्री. उमाप ईश्वर श्रीमंत, : अपिलार्थी
रा. अंधोरी, पो. अरणगांव, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने एकाच माहितीसाठी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयात दोन वेगवेगळी व्दितीय अपिले सादर केली होती. याबाबत अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद येथील कार्यालयात दिनांक २५-०३-२००९ रोजी दाखल केलेल्या व्दितीय

अपील अर्जावर आयोगाने दिनांक ०६-०३-२०१० रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले आहेत. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उमाप ईश्वर श्रीमंत, रा. अंधोरी, पो. अरणगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२७

निर्णय दिनांक ०९-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. निळकंठ भिवनाजी राऊत,<br>मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, तळणी, तालुका हदगांव,<br>जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव,<br>तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" वर निर्देशित पोचीमायच्या जागेच्या ग्रामपंचायत हद्दीतील इमारतीवरील कर आका स्वयंमूल्यांकन तक्त्याची नक्कल ही मूळ (original) कर आकारणी स्वयंमूल्यांकन तक्त्याची colourpl copy (colour xerox प्रत) असावी. पोचीमायच्या जागेच्या नमुना ८ च्या उता-यावर चतु:सिमा, लांबी रुंदी आदी बाबींची नोंद असावी. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तळणी श्री. एस. जी. चव्हाण यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. आयोगाने अपिलार्थीस उपस्थित राहण्यासाठी पाठविलेले पत्र पोस्ट खात्याकडून परत आलेले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या-कडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. तथापि या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार

अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे तीच प्राप्त होऊ शकेल. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर नव्याने नोंदी घेऊन नंतर ती अर्जदारास पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे या प्रकरणी देखील अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१७
निर्णय दिनांकः १०-०३-२०१०

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
रा. पाथरवाला बु. ता.अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १.शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना.
२.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००९ रोजी सुनावणी घेऊनही त्यांना अद्यापपावेतो या सुनावणीचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व शिक्षा अभियानातील पुस्तके गट शिक्षणाधिकारी यांनी शौचालयात फेकल्यासंदर्भात दि. ०१.०१.२००८ ते दि.१०.१२.२००८ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जालना जिल्हयात सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत पहिली ते आठवीपर्यंत पुरविलेल्या व शिल्लक पुस्तकांची तालुकानिहाय संख्या,भोकरदन तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियानातील शौचालयात व मुतारित फेकलेल्या पुस्तकांची संख्या,यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या व त्या तक्रारीच्या चौकशी अहवालाची प्रत, या प्रकरणी दोषी गट शिक्षणाधिकाऱ्याविरुध्द जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी गट शिक्षणाधिकारी भोकरदन कार्यालयास भेटी दिल्यासंदर्भातील माहिती आणि जालना शहरातील सेंट मेरी या शाळेसंदर्भात पालकांनी व अनेक संघटनांनी जिल्हा परिषदेकडे तक्रारी केल्यासंदर्भातील माहिती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण रु.२४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस सदरचे शुल्क अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात माहिती देण्यासाठी लावले असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या चौकशी अहवालाच्या माहितीसंदर्भात त्यांच्या कार्यालयात अहवाल संकलनाचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात या पत्रामध्ये कोणतेही भाष्य नाही. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने शुल्क भरण्याची कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दि.१२.०१.२००९

रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला तथापि यासंदर्भातील लेखी आदेश दि. १६.०४.२००९ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०३.२००९ रोजी माहिती पुरविली होती. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस त्यांनी यापूर्वीच दि. २४.०१.२००९ रोजी पुरविली होती. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे न दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अप्राप्त असल्याचे आयोगास अवगत केले व उर्वरित माहिती त्यांनी वेळोवेळी व विनामूल्य प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यक्षेत्रातील असल्याने त्यांनी दि. ११.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.,जालना यांच्याकडे वर्ग केला होता. अपिलार्थीच्या या माहितीसंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.जालना अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची सद्यस्थिती त्यांना अवगत करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १, २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना दि. २४.०१.२००९ व दि. ०९.०३.२००९

रोजी पुरविली आहे. मात्र अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे त्यांनी, जालना शहरातील सेंट मेरी, या इंग्रजी माध्यमाच्या शाळेसंदर्भात पालकांनी व अनेक संघटनांनी जिल्हा परिषदेकडे तक्रार केली होती, या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन शाळेवर केलेल्या कार्यवाहीची प्रत मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती दि. १०.१२.२००८ रोजी मागितली होती. या दिनांकास जन माहिती अधिकारी यांच्याकडून सेंट मेरी हायस्कूल, जालना यांच्याविरुध्द त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नव्हती. त्यामुळे या मुद्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीस, "आजतागायत सेंट मेरी हायस्कूल, जालना यांच्यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही", अशी माहिती पुरविणे जास्त संयुक्तिक झाले असते. परंतु,या संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सदर चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यात येईल, असे त्यांना आश्वासित केले व सद्यस्थितीत त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ शी संबंधित अहवाल उपलब्ध नाही, असे अवगत केले आहे. यावरुन अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी या मुद्यासंदर्भात आवश्यक माहिती पुरविली असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अशाप्रकारे आवश्यक ती सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरवली गेल्यामुळे अपिलार्थीस आता माहिती देण्यासंदर्भात आयोगातर्फे कोणतेही आदेश नाहीत. तथापि अपिलार्थीस जर आता सेंट मेरी हायस्कूल, जालना यांच्याविरुध्द केलेल्या कथित तक्रारीच्या संदर्भातील चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजही हवी असेल तर त्यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

जालना यांच्याकडे करुन ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी, त्या प्रकरणाची असलेली तत्कालीन स्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जरी विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी तो अपूर्ण आहे. कारण त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहितीचे शुल्क न कळविता फक्त त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहितीचे अंदाजित शुल्क कळविण्यासाठी त्यांना कोणतीही अडचण नव्हती. तथापि अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील चार मुद्यांपैकी फक्त एका मुद्यावरील माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची त्यांची कृती चुकीची आहे, याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, जालना यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा. पाथरवाला बु., ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१८
निर्णय दिनांकः १०-०३-२०१०

१. श्री. दिनेश सुगमचंदजी सुराणा, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे गणेश बालक मंदिर या शाळेसंदर्भात काही माहिती मागितली होती. त्यांनी ती अपिलार्थीस, दि. २७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, सदर माहिती संबंधित शाळेकडून प्राप्त करुन घेऊन, पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय

अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दि.०७.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित संस्थेचे सचिव यांची नेमणूक झाली असल्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांचे प्रथम अपील संस्थेच्या सचिवांकडे करण्याचे सूचित केले. परंतु संबंधित सचिवांकडून अपिलार्थीस कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडेच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे गरजेचे होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न करता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित संस्थेच्या सचिवांकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील करण्याचे सूचित केले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.जालना यांची ही कृती चुकीची आहे. कारण शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये प्रत्येक जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांची आता अशा प्रकारच्या शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. या प्रकरणी

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.जालना यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे उचित राहिल, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,जालना यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनेश सुगमचंदजी सुराणा,रा. अंबडमार्ग ,काद्राबाद भाजीमंडी, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१९
निर्णय दिनांक: १०-०३-२०१०

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा.पूर्णा, जि. परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व त्यांच्या अपिलावर सुनावणी न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या दि. १०.०८.२००६ च्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावाच्या संदर्भात काही

माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. धानोरामोत्या येथील शाळा बांधकामासंदर्भात जि.प.स्थायी समितीच्या दि. १०.०८.२००६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सत्यप्रत, जर ठरावाची प्रत शिक्षण विभागास दिली असेल तर त्यांनी त्यावर केलेल्या कार्यवाहीची प्रत व श्रीमती शोभा भगवानराव भायेकर यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०७.२००८ रोजी सादर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी ते जन माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांनी दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.परभणी यांच्याकडे पाठविला. तथापि शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी यांनी यावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे आणि परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.१०.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांच्याकडील दि. २१.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.परभणी यांच्याविरुध्द अपील अर्ज दाखल करण्याचे सूचित केले व त्यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णय देण्याच्या या पध्दतीने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ०६.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीच्या प्रतिनिधीने, ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले. तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाल्याचे त्यांनी याचबरोबर आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आता, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०१.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर, दि. ०६.०३.२०१० रोजी प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. परंतु त्याचबरोबर या प्रकरणी आयोगाच्या असेही निदर्शनास येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. २८.०९.२००८ अगर तत्पूर्वी मिळणे क्रमप्राप्त असताना त्यांना ही माहिती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्याकडून एक वर्ष पाच महिने आणि आठ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी घेतलेला कालावधी हा निश्चितपणे समर्थनीय नाही, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरवून जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल तत्कालीन प्रभारी जन माहिती अधिकारी श्री. राजाराम इघारे (सध्या उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, परभणी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस शिक्षण संचालक (पुणे) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक (पुणे) यांना तत्कालीन प्रभारी जन माहिती अधिकारी श्री. राजाराम इघारे (सध्या उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद परभणी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे,रा.शिवाजी रोड, मुळे गल्ली,पूर्णा, जि. परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय,मध्यवर्ती इमारत,१७,डॉ.आंबेडकर मार्ग,ससून हॉस्पीटलजवळ,पुणे-१.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२०
निर्णय दिनांक: १०-०३-२०१०

१. श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा सहायक निबंधक,
सहकारी पतसंस्था, परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
परभणी.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक (प्रशासन),जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. यु.आर.गंगाने,
मुख्याध्यापक,जिल्हा परिषद
कें.प्रा.शा.रावळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांना समाधानकारक माहिती मिळण्यासाठी ते दि. ०४.०५.२००९ पासून आमरण उपोषण करणार आहेत, असा त्यांनी आयोगास नम्रपणे इशारा दिला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी  यांच्याकडे त्रयस्थ पक्षाने मानवत,पाथरी,सेलू व परभणी तालुक्यातील विविध सहकारी पतसंस्था,अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक, जिल्हा परिषद एम्प्लॉईज को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी इ. संस्थांकडून घेतलेल्या कर्जाबाबतच्या बेबाकी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. ०८.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज एकूण सात वित्तीय संस्थांना देऊन त्या अर्जावर अधिनियमानुसार कार्यवाही करण्याचे त्यांना सूचित केले. अपिलार्थीचा अर्ज संबंधित संस्थांना प्राप्त झाल्यानंतर काही संस्थांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी  दि. ०५.०३.२००९ रोजी निर्णय देऊन व्यवस्थापक, जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, परभणी यांना अर्जदारास पूर्णपणे माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले.  तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,परभणी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,परभणी यांनी अपिलार्थीस संबंधित संस्थांमार्फत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. गुंगाने यांनी वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत आणि यासंदर्भात संबंधित संस्थेमार्फत देण्यात आलेल्या बेबाकी प्रमाणपत्राची सत्यप्रत, अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबींशी संबंधित आहे. त्रयस्थ पक्षाने वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड केलेली आहे किंवा कसे, ही माहिती उघड झाल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. एवढेच नव्हेतर अपिलार्थीने त्यांच्या स्तरावर वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून उचललेले कर्ज आणि त्याची त्रयस्थ पक्षाने केलेली परतफेड या घटनांची माहिती ही, कोणत्याही प्रकारे 'सार्वजनिक माहिती' या प्रकारात मोडत नाही. ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आणि पूर्णपणे खाजगी आहे. ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य तर होणार नाहीच परंतु त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८(१)(ञ) चा भंग होईल, अशी आयोगाची खात्री आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करणे, आयोग गरजेचे समजत नाही. परिणामी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी,द्वारा करंजीकर निवास, भगवान वाघमारेच्या बाजूस, गणपती चौक, जिंतूर रोड,परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१३

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. राजु हरिदास वायाळ, : अपिलार्थी
मु. सावरखेडा (गोंधन), पो. सिपोरा (अंभोरा),
ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु., ता जाफ्राबाद, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "श्री. शिवाजी विद्यालय भारज बु., तालुका जाफ्राबाद संस्था घेत असलेल्या वार्षीक परिक्षेतील निकालाच्या (गुणनोंद) प्रती त्याही विषय शिक्षकांच्या सह्या असलेल्या व वार्षीक निकाल असलेल्या तक्त्यासह त्यांच्या प्रती सन २००५,२००६,२००७ व २००८ इयत्ता ८ वी ते १० वी (सर्व तुकड्यासह) गुणनोंदच्या प्रती," अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कधी प्रतिसाद दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे नमूद करुन प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले नाही, असा त्यांनी या अपील अर्जामध्ये अभिप्राय दिलेला आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०२-२००९ रोजी निर्णय देऊन मुख्याध्यापकाने त्यांच्याकडे दिनांक ०४-०२-२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००९ पर्यंत माहिती देण्यात येईल असे आश्वासीत केल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यामध्ये त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे कारण नमूद केलेले नाही व फक्त आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापि ही माहिती त्यांना अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन आणि प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तथापि त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपैकी अद्यापपावेतो कोणती माहिती मिळावयाची आहे व प्राप्त

माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणजे नेमके काय झाले याचा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे उल्लेख केलेला नाही व प्राप्त माहितीबद्दल तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी देखिल आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे, हे देखिल आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या आणि सर्व संबंधितांच्या उपस्थितीअभावी कळण्यास मार्ग नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजु हरिदास वायाळ, मु. सावरखेडा (गोंधन), पो. सिपोरा (अंभोरा), ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु., ता जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१४

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. भास्कर नथुजी खरात, : अपिलार्थी
रा. चंदन झिरा, औरंगाबाद रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कर अधीक्षक, नगरपरिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडील डिमांडर रजिस्टरच्या संदर्भात सन १९७४ ते १९८५ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागविली होती.

" प्लॉट नं. १-२ कन्हैयानगर जालना येथील घर क्रमांक ४२४ (१९७४) (१९८५) घर क्रमांक ८०० ते रिव्हीजन रजीस्टर चे डीमांड रजीस्टरच्या प्रत्येक सालची झेरॉक्स प्रमाणीत प्रत".

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनयमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००९ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेला पुरावा आयोगाकडे सादर केला आहे व तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७४ ते १९८५ या कालावधीशी संबंधित माहिती मागविली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सन १९९४ ते २००४ या कालावधीशी संबंधित माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली कथित माहिती मूळात अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मूळात मागितली नव्हती, असे या माहितीशी संबंधित असलेल्या कालावधीतील फरकामुळे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही खूप जुनी असल्यामुळे आणि त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले असल्यामुळे ही माहिती देण्यासाठी त्यांना काही अवधी लागेल. जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात एकूण १५ दिवसाचा कालावधी देण्यात येत असून, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेखात जन माहिती अधिकारी यांना आढळून आली नाही तर मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांवर होती त्या कर्मचाऱ्यांवर आवश्यक वाटल्यास याच कालावधीमध्ये प्रशासकीय अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचा विचार करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर नथुजी खरात, चंदन झिरा, औरंगाबाद रोड, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१५

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी

रा.नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गट प्रमुख, संपूर्ण जलस्वराज्य प्रकल्प, पंचायत समिती,

जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी उशिर झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट प्रमुख, संपूर्ण जलस्वराज्य प्रकल्प, पंचायत समिती, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे, सिंधी

काळेगाव पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे, जुन २००५ ते ऑगस्ट २००५ या कालवधीशी संबंधित काही माहिती टपालाद्वारे मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट प्रमुखाकडे नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या अर्जाची प्रत अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मौजे सिंधी काळेगांव, ता. जि. जालना यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली व संबंधित समितीकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १५-११-२००८ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. परंतु या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

गट प्रमुख यांच्यावतीने समुदाय विकास व क्षमता बांधणी तज्ञ, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित समितीने दिनांक १७-११-२००८ रोजी पोस्टाने पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी संबंधित गट प्रमुख तथा उपमुख्य कार्यकारी अधिकरी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झालेली आहे, असे असताना त्यांनी अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्या सहीने अपिलार्थीस दिनांक १७-११-२००८ रोजी माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास या प्रकरणातील गट प्रमुखाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्याकडे उपलब्ध असणे मूळात अभिप्रेत आहे. त्यामुळे ही माहिती संबंधित गट प्रमुखानेच जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे क्रमप्राप्त होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता संबंधित पाणी पुरवठा समितीच्या सचिव व अध्यक्षांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले व संबंधितांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. या संपूर्ण प्रक्रियेस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागल्याचे आयोगास आढळून येत आहे. याचा परिणाम अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विलंबाने प्राप्त होण्यात झाला आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती विलंबाने उपलब्ध करुन देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१६

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, : अपिलार्थी

ट्रेड युनियन सेंटर लक्कडकोट, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,

पाडळी (पारधी), पो. मापेगाव खुर्द, ता. परतूर, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परतूर,

जि. जालना

त्रयस्थ पक्षा : श्री. राजाराम शंकर वाघ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. राजाराम शंकर वाघ यांच्या वेतनासंदर्भात एकूण २ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या

ऑगस्ट, सप्टेंबर १९९३, जुलै १९९४, जुलै १९९५, नोव्हेंबर १९९७ ते डिसेंबर २००१ या कालावधीतील नमुना नंबर २४ च्या साक्षांकित प्रती व ग्रामपंचायत पाडळी (पारधी) कार्यालयास पंचायत समिती, परतूर कार्यालयाने जानेवारी २००० ते डिसेंबर २००१ या कालावधीत कर्मचाऱ्यांच्या वेतन प्रतिपूर्तीकरीता ५०% रक्कम दिली आहे. या रकमेचा तपशील (दिलेली रक्कम, दिनांक, चेक नंबर) - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित ग्रामसेवकाकडून उपलब्ध झाली नसल्यामुळे ती उपलब्ध झाल्यानंतर अपिलार्थीस पुरविण्याचे त्यांनी आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-०८-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत देणे भाग आहे. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही हा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे. अशाप्रकारचा युक्तिवाद हा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या मूलभूत तत्वाला छेद देणारा आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीत जर त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर त्यांनी तसा अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर यांच्याकडे पाठवावा. ग्रामसेवकाचा सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांवर होती त्या कर्मचाऱ्यांवर त्यांनी आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही कार्यवाही त्यांनी ग्रामसेवकाचा अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत पूर्ण करावयाची आहे व या कार्यवाहीची प्रत त्यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीस द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. तनपूरे तत्कालीन ग्रामसेवक (सध्या विस्तार अधिकारी, पंचायत समिती, परतूर या पदावर कार्यरत) यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना अधिनियमातील कलम

२० (१) च्या तरतुदीप्रमाणे एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. श्री. तनपूरे तत्कालीन ग्रामसेवक (सध्या विस्तार अधिकारी, पंचायत समिती, परतूर या पदावर कार्यरत) यांना या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर लक्कडकोट, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाडळी (पारधी), पो. मापेगाव खुर्द, ता. परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. तनपूरे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे).

५ गट विकास अधिकारी, पंचायत समिती परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२१

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी S.R.G., तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा कृषि कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्यासंदर्भात सन २००१-०२ ते २००६-०७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या योजनेच्या कामाच्या लेखा परीक्षणाची सत्यप्रत, या योजनेच्या अंतर्गत कोणकोणती कामे करण्यात आली, प्रत्येक कामावर झालेला नगदी खर्च, धान्य स्वरुपात झालेला खर्च, प्राप्त निधी, प्राप्त गहू व तांदूळ यांचे परिमाण आणि मजुरांच्या याद्या - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा अर्ज संबंधित सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालयांकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सर्व तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या अपील अर्जाची प्रत पुढील कार्यवाहीस्तव पाठवून व त्याची प्रत अपिलार्थीस देऊन पुढील सुनावणीबाबत संबंधित तालुका कृषि अधिका-यांशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तालुका स्तरावरील असल्यामुळे त्यांनी त्यांच्या तालुका कृषि अधिका-यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले असल्याचे

आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरुन अद्यापपावेतो अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी, देगलूर, धर्माबाद, किनवट, हदगांव, कंधार, भोकर व माहूर या सात तालुका कृषि अधिका-यांनी माहिती दिलेली नाही. ही माहिती संबधित तालुका कृषि अधिकारी २० दिवसात उपलब्ध करुन देतील असे त्यांनी आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही नांदेड जिल्ह्यातील १६ माहिती अधिका-यांशी संबंधित आहे. त्यापैकी ९ माहिती अधिका-यांनी माहिती दिलेली आहे. उर्वरित सात जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस अद्याप-पावेतो माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देय होत आहे. सबब उर्वरित सात तालुका कृषि अधिकारी, देगलूर, धर्माबाद, किनवट, हदगांव, कंधार, भोकर व माहूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत संबंधित सर्व तालुका कृषि अधिकारी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे त्यांनी पहावे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही न पुरवून तालुका कृषि अधिकारी, देगलूर, धर्माबाद, किनवट, हदगांव, कंधार, भोकर व माहूर यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणते-चा अभाव स्पष्ट केला आहे अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (कृषि) यांना संबंधित तालुका कृषि अधिकारी, देगलूर, धर्माबाद, किनवट, हदगांव, कंधार, भोकर व माहूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. वरील निर्णयामध्ये नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांनी वरील क्रमांक २ मधील आदेशाचे संबंधित जन माहिती अधिकारी विहित मुदतीत पालन करतील, असे पहावे.

४. सचिव (कृषि) यांना संबंधित तालुका कृषि अधिकारी, देगलूर, धर्माबाद, किनवट, हदगांव, कंधार, भोकर व माहूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, रा. जानापुरी, पो. वडेपुरी S.R.G., तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी देगलूर/धर्माबाद/ किनवट/ हदगाव/कंधार/भोकर/माहूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२२

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. चव्हाण प्रमोद राजेश्वरराव,<br>रा. नानेगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, बदनापूर, तालुका बदनापूर,<br>जिल्हा जालना | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिका-याने आदेशित करुनही माहिती पुरविली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांच्याकडे, मौजे नानेगांव तालुका बदनापूर हे गांव हगणदारीमुक्त झाल्यासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नानेगांव यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करुन त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी त्यांनी या युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती पूर्णतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे, मौजे नानेगांव या गावामध्ये हगणदारी मुक्तीसाठी काय उपाययोजना केल्या, अशा प्रकारची माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होते. तसेच मुद्दा क्रमांक २ व्दारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे नानेगांवामध्ये असलेल्या वैयक्तीक शौचालयाच्या बांधकामांची संख्या, घर क्रमांक, कुटूंब प्रमुखाचे नाव, ही माहिती विचारली आहे. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे. मात्र या माहितीतील घराच्या कोणत्या बाजूला, दिशेला, संबंधितांनी शौचालयाचे बांधकाम केले, अशा प्रकारची माहिती विचारली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, जर त्यांना या प्रकरणी संबंधितांनी केलेल्या बांधकामाचे नकाशे प्राप्त झाले असल्यास या नकाशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस द्यावी, म्हणजे अपिलार्थीस संबधितांनी केलेल्या बांधकामाच्या दिशेविषयी माहिती प्राप्त होऊ शकेल. याच अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे, मौजे नानेगांव येथील गावामध्ये ९० टक्के लोकांच्याकडे वैयक्तीक शौचालये बांधलेली नसतांना देखील हे गांव हगणदारीमुक्त गाव कसे घोषित केले गेले, अशी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय असणार नाही. मात्र हे गाव हगणदारीमुक्त घोषित करण्याबाबत संबंधित तपासणी पथकाने केलेल्या पाहणी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असू शकते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ३ च्या सारखीच माहिती मागितली आहे. त्यामुळे या मुद्दयावर देखील अपिलार्थीस वेगळ्याने माहिती देण्याची आवश्यकता नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील " सदरचे बोअरचे काम कोणाच्या आदेशाने झाले आहे " ही माहिती वगळता या मुद्दयामधील उर्वरित कोणत्याही भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण मुद्दा क्रमांक ५ मधील, उर्वरित भागातील मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक मत व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अशा प्रकारे वरील परिच्छेदातील, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली आणि त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक २ अंशतः, मुद्दा क्रमांक ३ व मुद्दा क्रमांक ५ अंशतः ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक २ अंशतः, मुद्दा क्रमांक ३ व मुद्दा क्रमांक ५ अंशतः ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्याची तपासणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून केल्यास त्यांना मौजे नानेगांव हे गांव हगणदारीमुक्त कसे घोषित केले गेले याची माहिती प्राप्त होऊ शकेल. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसापर्यंत अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या विषयाशी संबंधित सर्व अभिलेखे त्यांना या कालावधीमध्ये तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीला कोणताही प्रतिसाद दिला नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व याच कालावधीत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चव्हाण प्रमोद राजेश्वरराव, रा. नानेगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२८

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, : अपिलार्थी
रा. बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व दिनांक २३-०६-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती

अधिकारी यांनी खोटी व उशीरा माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंग कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, पैठण तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर लावलेल्या वीट भट्टयाच्या संदर्भात एकूण सहा मुद्दयांव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, ' पैठण तालुक्यामध्ये गोदावरी नदी किनारी वीट भट्टया पाडण्यासाठी त्यांच्या कार्यालयाने कोणासही परवानगी दिली नाही, त्यामुळे कार्यवाही केली नाही, ' असे कळविले. तथापि ही माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेहीजण गैरहजर राहिले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधला नाही व अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, स्वरुप व प्रत्यक्षातील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर उप

विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी पुनश्च या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत पुनश्च सुनावणी घेऊन, आपला निर्णय पारित करावा. ही सुनावणी घेताना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहतील असे त्यांनी पहावे व सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी द्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत पुनश्च सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, रा. बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२९

निर्णय दिनांक १०-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकर इंगळे,<br>रा. आनंदनगर चौक, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक प्रशासन अधिकारी,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, त्यांनी मागणी केलेल्या पाच मुद्दयांपैकी चार मुद्दयांची माहिती त्यांना चार दिवस उशिराने प्राप्त झाली. त्यामुळे या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आयोगास संबंधित माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे आणि त्यांच्या अपिलाची सुनावणी न घेतल्याबद्दल प्रथम अपिलीय अधिका-यावर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अर्धापूर व मुदखेड तालुक्यात मोफत बियाणे, खते वाटपाच्या संबंधात सन २००७ मध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशी प्रकरणी दिलेल्या अहवालाच्या संदर्भात व इतर अनुषंगीक माहितीसंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे. उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना दिनांक ०९-०३-२०१० पर्यंत प्राप्त झाली आहे. या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदी-प्रमाणे कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या प्रतिसादाव्दारे अपिलार्थीस दिलेली माहिती ही अपूर्ण आहे. त्यामुळे अपिलार्थीने तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी वेळीच सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीला आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची कदाचित आवश्यकता पडली नसती. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. देशमुख यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद आयुक्त (कृषि), पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर कबूल केले आहे. वास्तविक पाहता ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस वेळीच पुरविता आली असती. परंतु त्यावेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या चौकशी अहवालाच्या मान्यतेची प्रत त्यांच्याकडे प्राप्त न झाल्यामुळे ते अपिलार्थीस ती माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याबाबतचे जन माहिती अधिकारी यांचे हे स्पष्टीकरण आयोग स्वीकारत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी केली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती चौकशीच्या मान्यता अहवालाशी संबंधित असल्याने व सदर चौकशीचा मान्यता अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी उपलब्ध नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देऊ शकले नाहीत. ही बाब जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाबाहेरची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्यापासून हेतुपुरस्सर दडवून ठेवल्याचे सिध्द होत नाही. सबब अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही. मात्र आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर चौकशीचा मान्यता अहवाल प्राप्त झाला असल्याने त्यांनी या अहवालाच्या मान्यतेची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, रा. आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८२
निर्णय दिनांक १०/०३/२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा खनीकर्म अधिकारी (गौण खनिज विभाग),
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही

बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८३
निर्णय दिनांक १०/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानिया नगर, तरोडा बु., ता.जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे.

सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२७
निर्णय दिनांक : ११.०३.२०१०

१. श्री.गुंडरे देविदास निशिकांत, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर,
जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,
जि.लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देऊन दिशाभूल केल्याच्या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या कामाची यादी, रोहयो रस्त्याची मोजमापपुस्तिका, अंदाजपत्रकाची प्रत, मजूरांच्या मस्टर्सच्या प्रती व मजूरीच्या स्लीप, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०१.२००९ रोजी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. त्यांनी त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता,निलंगा यांच्याकडे पाठविला. मध्यंतरीच्या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१,६७४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात त्यांच्या दि. २२.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असून त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करण्यात यावी व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात त्यांना विचारणा केली असता, त्यांना निश्चित कोणत्या कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती प्राप्त झाल्या नाहीत, हे आयोगास स्पष्ट करुन सांगता आले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, त्यामुळे सदर माहितीसंदर्भात अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित न राहिल्यामुळे ते अपिलार्थीस विहित कालावधीमध्ये शुल्काची रक्कम कळवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ती संकलीत करण्यास वेळ लागला.तथापि आता उर्वरित माहिती ते अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित विस्तृत स्वरुपाच्या माहितीची मागणी केलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात अधिनियमातील कलम ७(३) (क) नुसार अंदाजित शुल्काचा तपशील अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कळविण्याऐवजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात प्रथम अपील दाखल केल्यानंतर दि. १७.०२.२००९ रोजी कळविला आहे. जन माहिती अधिकारी यांची सदर कृती गैर व चुकीची आहे. त्याचबरोबर या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता,या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः संपर्क साधणे अपेक्षित आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. त्यामुळे अपिलार्थीस पुरवावयाच्या माहितीची कल्पना जन माहिती अधिकारी यांना होती, हे सिध्द होत आहे. सबब अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) मधील विहीत कालावधीमध्ये कधीही उपस्थित राहिले नाहीत, असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः वेळोवेळी संपर्क साधणे अपेक्षित आहे. यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी विहीत कालावधीमध्ये व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर न केल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी आयोग अमान्य करीत आहे.तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत शुल्काचा तपशील न कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन सूचित करण्यात येत आहे की, इतःपर त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीनुसार सतर्कतेने कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.गुंडरे देविदास निशिकांत,मु.पो.विलास नगर,वाघमारे यांचा वाडा,दुध डेअरीसमोर, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२८
निर्णय दिनांक : ११.०३.२०१०

१. श्री. टोंपे सुखदेव विश्वनाथ, : अपिलार्थी
रा.लोणी,ता.परंडा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर तीस दिवसांच्या आत आणि प्रथम अपील केल्यानंतर पंचेचाळीस दिवस होऊनही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्याकडे, त्यांच्या विद्यालयातील सन १९८०-८१ ते २००८-०९ पर्यंतच्या प्रत्येक वर्षाची सेवाज्येष्ठता यादी,

या कालावधीमध्ये नियुक्त केल्या गेलेल्या शिक्षक मान्यतेच्या आदेशाच्या प्रती, महाविद्यालयातील स्टॉक रजिस्टर व रोस्टरच्या सत्यप्रती, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने नेहमीप्रमाणे कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीचे प्रथम अपील प्रलंबित ठेवले असल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. ए.एफ.पठाण आयोगासमोर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे वकील,श्री. ए.एफ.पठाण यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे एप्रिल, २००९ मध्ये सादर केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी त्यांच्या संस्थेने शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे माहे एप्रिल,०९ मध्ये दिलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम,जन माहती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. २८.०१.२००९ पर्यंत देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे त्यांना भाग होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. एवढेच नव्हेतर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीस सरळ माहिती देणे अपेक्षित असताना त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.उस्मानाबाद यांच्याकडे सादर केली आहे. या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. शिक्षणाधिकारी यांच्याकडे या मुद्यासंदर्भातील माहिती सादर न करण्याचे, जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी असे कारण दिले आहे की, अपिलार्थीने कोणत्याही एका विशिष्ट शिक्षकाचे नाव घेऊन त्यांच्या नियुक्ती आदेशाची मागणी न केल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती नाकारण्याची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयात सन १९८०-८१ ते २००८-०९ या कालावधीमध्ये नियुक्त केल्या गेलेल्या शिक्षकांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती मागितल्या आहेत. याचा अर्थ अपिलार्थीस, या कालावधीमध्ये संबंधित संस्थेने या महाविद्यालयामध्ये नेमलेल्या सर्व शिक्षकांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती, आवश्यक आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपात माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी नेमक्या या मुद्याच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्याचे टाळले असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मधील विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस न देता शिक्षणाधिकाऱ्याकडे सादर करुन व तसेच सादर केलेली माहिती देखील अपूर्ण स्थितीत सादर करणे आणि असंयुक्तिक कारणास्तव ती देण्याचे नाकारण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,उस्मानाबाद यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्यावेळी ते आयोगासमोर उपस्थित

नाहीत. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळून, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, उस्मानाबाद यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/-

इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. टोंपे सुखदेव विश्वनाथ,रा.लोणी,ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२९

निर्णय दिनांक : ११.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. केशव विश्वनाथ डंबरे,<br>रा.दिंडोरी, ता.भूम, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद,उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०५.०३.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने, या प्रकरणाशी संबंधित माहिती, संबंधित समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडून त्यांना दि. ०५.०३.२०१० रोजी प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार

नाही व अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली तक्रार ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने, आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव विश्वनाथ डंबरे,रा.दिंडोरी,पो.हाडोंग्री, ता.भूम, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३०
निर्णय दिनांक : ११.०३.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,<br>रा.निलेगाव,ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, तुळजापूर,जिल्हा उस्मानाबाद | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद. | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्यामुळे व पूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ९७ दिवस होऊनही जाणूनबुजून टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे मौ. फुलवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत सिमेंट रोड व गटाराच्या कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने दि. ०२.०१.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने यानंतर वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील सादर करताना, फक्त माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्जाची प्रत आयोगास सादर केली आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती माहिती दिली व कोणती माहिती अद्यापि देण्याचे बाकी आहे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखील अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,रा.निलेगाव,ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर,जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२३

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. संजय गोपाळराव सोनखेडे,<br>एन - ११, जी १९/५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,<br>औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २०-०९-२००८ व २१-०९-२००८ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सर्व निदेशक व सर्व शिल्प निदेशक या पदाकरिता केलेल्या भरती प्रक्रियेसंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निवड प्रक्रियेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याचे गुणपत्रक प्रसिध्द का केले नाही व कोणत्या नियमाने गुणपत्रक गोपनीय ठेवण्यात आले, अपात्र विद्यार्थ्यांना, त्यांना किती गुण मिळाले हे कसे समजणार याची माहिती व निवड प्रक्रियेच्या कोणत्या नियमानुसार पहिल्या टप्प्याच्या व दुसऱ्या टप्प्याच्या (लेखी व प्रात्यक्षिक) परीक्षेचे गुण गोपनीय ठेवणे बंधनकारक आहे त्या नियमाची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २३-०२-२००९ रोजी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापना विभागाकडे पाठविला. यानंतर आस्थापना विभागाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस ती दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही आणि अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी, त्यांच्या कार्यालयातर्फे भरती प्रक्रिया चालू होती, ही प्रक्रिया अंतिम करण्यात आली नव्हती. जर संबंधित उमेदवाराच्या परीक्षेचे गुण त्यावेळी उघड केले असते तर कदाचित त्याचा परिणाम त्यांच्या घेण्यात येणाऱ्या तोंडी परीक्षेवर झाला असता. त्यामुळे अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे गुणपत्रिकेची माहिती मागितली त्यावेळी त्यांना ती देता आली नाही. ही भरती प्रक्रिया दिनांक २६-०२-२००९ रोजी पूर्ण झाली. यानंतर अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या गुणपत्रिकेच्या संदर्भातील माहिती त्यांनी, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या दुसऱ्या अर्जासंदर्भात दिनांक ३०-०६-२००९ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे कारण आणि त्यांचा अभिप्राय अपेक्षित असलेली माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अशा प्रकारचे स्पष्टीकरण व जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे कारण त्यांनी अर्जदारास देणे हे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या आदेशाची प्रत दिली आहे. या आदेशावरुन अपिलार्थीस शासकीय कार्यालयामध्ये पदे भरताना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीची माहिती उपलब्ध होऊ शकते.

हे पाहता, अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देय असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जावरुन असे प्रतीत होत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक २०-०९-२००८ व २१-०९-२००८ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार केलेल्या पद भरतीसंदर्भात संबंधित उमेदवाराच्या लेखी व तोंडी परीक्षेतील गुणांची माहिती येथे अपिलार्थीस हवी आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या दुसऱ्या अर्जासंदर्भात दिली असल्याचे आयोगास अवगत केले व या गुणपत्रिकेची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाली असल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अर्जामध्ये त्यांचे नाव संजय गोपाळराव सोनखेडे असे दर्शविले आहे व या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या पुराव्यामध्ये मात्र त्यांनी संजय गोपालाल सोनखेडे या व्यक्तीचे प्रमाणपत्र सादर केले आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्रातील विसंगतीमुळे ही माहिती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती वेगळ्या संदर्भात पुरविली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय गोपाळराव सोनखेडे, एन - ११, जी १९/५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२४

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. पांढरपोटे ज्योतिराम सर्जेराव, : अपिलार्थी
मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम
उपविभागीय कार्यालय, माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम
विभागीय कार्यालय, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, माजलगांव, जि. बीड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र. २, जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राची वेगवेगळ्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८१००/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आणि पैसे भरल्यास माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असे त्यांना आश्वासित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा न करता ते उप अभियंत्याशी पत्र व्यवहार करीत राहिले व अंतिमतः त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०२-२००९ रोजी कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर राहिल्यामुळे, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील एकतर्फी निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८१००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या

कार्यालयात न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने , अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी स्वतः संपर्क साधणे त्यांना अनिवार्य होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वतःहून दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८१००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिला नसल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीनुसार हा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे त्यांना अनिवार्य आहे. परंतु अशाप्रकारचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न दिल्यामुळे, अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती तयार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, उपरोक्त कालावधीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पुर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल. या कलावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांढरपोटे ज्योतिराम सर्जेराव, मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र. २, जिल्हा

परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२५

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. विजयकुमार भगवान शिंदे, : अपिलार्थी
द्वारा - अध्यक्ष, वकील संघ परंडा, मु.पो.ता. परंडा,
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाचा जीप क्रमांक एम. एच. २५-६०४६ चे सन २००५ ते डिसेंबर २००८ पर्यंतच्या लॉक बूकची प्रत व याच कालावधीमध्ये डिझेल व दुरुस्तीपोटी झालेला खर्च, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने दिनांक २५-०२-२००९ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. तथापि शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १००/- रुपयाच्या मर्यादेत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १७-०४-२००९ रोजी तयार करुन ठेवली होती व त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती घेऊन जाण्याचे लेखी पत्राद्वारे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी हे त्यांच्याकडे, त्यांनी मागणी केलेली माहिती हस्तगत करुन घेण्याकरिता कधीही उपस्थित न झाल्याने, त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- इतके भरण्याचे सूचित केले होते. तथापि या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या शुल्काचा तपशील दिला नव्हता, जो त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देणे अनिवार्य होते. यानंतर अपिलार्थीने दिनांक २५-०२-२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती दिनांक ०२-०३-२००९ पर्यंत देणे त्यांना अनिवार्य होते. परंतु या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १७-०४-२००९ रोजी म्हणजे, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर तयार केली असल्याचे व ती अपिलार्थीस देऊ केली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस, त्यांनी शुल्क भरुनही वेळेत माहिती न देण्याची ही कृती सर्वथा चुकीची आहे. त्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल व या माहितीपोटी अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु. १००/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १००/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील परिच्छेदात आदेशित केलेल्या कालावधीमध्ये स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांच्यांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. अपिलार्थीच्या कोणत्याही

प्रतिनिधीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार भगवान शिंदे, द्वारा - अध्यक्ष, वकील संघ परंडा, मु.पो.ता. परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२६

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, : अपिलार्थी
रा. सायली निवास, भिमनगर, मु. पो. कळंब, ता. कळंब,
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,
लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, आयोगास असे अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे दिनांक ०२-०२-२००९ रोजी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-२००६ ते २००८-२००९ या कालावधीतील काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे कबूल केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत, असे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता ती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही आजतागायत संबंधितांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविण्याचा थोडासाही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. एवढेच नव्हे तर आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित

असलेले जन माहिती अधिकारी यांना देखील अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गीरी व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रयत्न केला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी नेमलेले त्यांचे सहायक व कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, संबंधित व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक हे एकत्रितपणे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असूनही, न देण्यासाठी जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती न पुरवून या सर्व अधिकाऱ्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. गिरी व श्री. जी.जी. राठोड व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. गिरी व श्री. जी. जी. राठोड आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, सायली निवास, भिमनगर, मु. पो. कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३१

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक व दुष्ट हेतूने नाकारले असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी आणि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००५ ते २०-०८-२००८ या

कालावधीतील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास या कालावधीमध्ये किरकोळ खर्चासाठी प्राप्त झालेला निधी, त्यांचे खर्चासहीत विवरणपत्र, व्हावचर व ऑडिट रिपोर्ट, या कालावधीमध्ये शासनाकडून जनतेसाठी प्राप्त झालेल्या किती वस्तुंचे वाटप केले, या वस्तुंचे वाटप करण्यात आलेल्या लाभार्थींची यादी, त्यांना या वस्तू मिळाल्याबाबत लाभार्थीच्या पावत्या व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ची १७ कामे कधी पूर्ण केली, याबाबत वरिष्ठांना पाठविलेला अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांना ही माहिती टपालाव्दारे हवी असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक १२-०९-२००८ रोजी उपस्थित राहून त्यांनी मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात पाहण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस प्रथमतः माहिती दाखविण्याचे व नंतर अपिलार्थीने मागणी केलेली नेमकी माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे १००० इतकी असून ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना २००० रुपये इतका खर्च लागणार आहे. तथापि इतकी रक्कम त्यांच्याकडे शिल्लक नसल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस सुरुवातीला देऊ शकले नाहीत. आता अपिलार्थीने मागितलेली माहिती ते अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये अपिलार्थीस ही माहिती दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयासंदर्भात असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर टाळलेले नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकत नव्हते ही बाब त्यांनी अपिलार्थीच्या निदर्शनास अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित कालावधीत आणली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर टाळलेले आहे असे म्हणता येणार नाही, उलट जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी, त्यांना आवश्यक असलेली माहिती पाहण्यासाठी देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत अशी

वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान उपलब्ध करुन घेणे ही जन माहिती अधिकारी यांच्या मर्यादेपलीकडील बाब आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाची कारवाई ही जन माहिती अधिकारी यांनी जर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुपुरस्सर अथवा दुष्ट हेतूने टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असेल तर करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही बाब आयोगाच्या निदर्शनास येत नसल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती, आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३२

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, : अपिलार्थी
मल्टीपर्पजच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, ऑ. नं. २७,
रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित ०१ एप्रिल २००७ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" जिल्हा रोहयो जालना अंतर्गत १ एप्रिल २००७ ते माहिती मिळेपर्यंत किती पत मर्यादा प्राप्त झाली व ती कशी वितरीत करण्यात आली. त्याची गावनिहाय कामनिहाय, मजुर निहाय, शाखा अभियंता निहाय मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक माहिती देण्यात यावी. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती काढण्यासाठी त्यांना वेळ लागेल असे अपिलार्थीस अवगत करुन माहिती प्राप्त होताच यासाठी लागणारा खर्च कळविण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२,५५८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रथम अपील केल्याने व सुनावणीस अपिलार्थीस अनुपस्थित राहिल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा हा निर्णय अपिलार्थीस न कळविला गेल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, कृषि विभागाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार उपविभागीय कृषि अधिका-याकडे पतमर्यादा प्राप्त होत असते. या पतमर्यादेचे वितरण उपविभागीय कृषि अधिकारी त्यांच्या स्तरावर कामनिहाय करत असतात. त्यामुळे ही माहिती उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध असते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, या अर्जाची प्रत उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी त्यांना भाग होते. परंतु या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना ही माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्वात असू शकत नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनाच अपिलार्थीस द्यावी लागेल. वरील युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, मल्टीपर्पजच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, ऑ. नं. २७, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३३

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८८ ते दिनांक १४-१०-२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयामध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी या प्रवर्गात स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य म्हणून कार्यरत असलेल्या मराठा कुणबी या जातीच्या कर्मचा-यांची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. स्वातंत्र्य सेनानी यांचे पाल्ये म्हणून जे तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी या प्रवर्गात जे कर्मचारी लागले असेल त्यांचे त्या स्वातंत्र्य सैनिकाशी काय नाते आहे याची माहिती मिळणेबाबत.

२. तृतीय आणि चतुर्थ श्रेणीमध्ये मराठा कुणबी म्हणून जे कर्मचारी लागलेले असेल त्यांचे नावे देण्यात यावे.

३. तलाठी, कारकून आणि शिपाई या सर्वांची माहिती मिळणेबाबत."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे " या उपविभागाअंतर्गत तलाठी, संवर्गात मराठा कुणबी म्हणून एकही कर्मचारी कार्यरत नसून स्वातंत्र्य सेनानी यांचे पाल्य म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची माहिती यापूर्वीच आपणास पुरविण्यात आली आहे. सबब आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे " अशी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून, आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीस, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली किंवा कसे याबाबत काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना दिनांक २३-१२-२००८ रोजीच्या पत्रावये असे कळविले आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे लिपीक श्री. राजपूत यांनी दिनांक १९-१२-२००८ रोजी हस्तांतरीत केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झ ाालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात येण्यास विलंब लागला. त्यामुळे ही बाब जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी येऊ शकली नाही. थोडक्यात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. राजपूत या कर्मचा-याव्दारे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१२-२००८ रोजी पुरविली असल्याचे दिसून येत आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. प्राप्त माहिती अपूर्ण कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही कोणती माहिती येणे बाकी आहे यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणताही खुलासा केलेला नाही अथवा यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. हे पाहता आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७९

निर्णय दिनांक ११-०३-२०१०

१ श्री. अमृतलाल शांतिलाल शाह, : अपिलार्थी
व्दारा- श्री. ए. एस. शाह,
ढेकू रोड, देशमुखनगर, अमळनेर, जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा रजिस्ट्रार, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
जन अपिलीय अधिकारी : कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदविलेले व दिनांक ०२-०९-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९०-९१, १९९१-९२, १९९२-९३ व १९९३-९४ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७५ इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०१-२००८ व २३-०१-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्यतिरिक्त उर्वरित सर्व माहिती प्राप्त झाली आहे. मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित मिळावी अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आतापर्यंत एकूण तीन वेळा पुरविल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, विद्यापीठाला

महाविद्यालयातील प्रत्येक वर्गाची विद्यार्थीक्षमता ठरविण्याचे अधिकार नाहीत. प्रत्येक वर्गाची विषयनिहाय विद्यार्थीक्षमता ठरविण्याचे अधिकार हे शासनास आहेत व शासनाकडून अशा प्रकारची मंजूरी वेळोवेळी प्राप्त होत असते. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शासनाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून, शासनाकडून विद्यापीठास आलेल्या विद्यार्थी क्षमतेच्या मंजुरीच्या पत्राची प्रत आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शिक्षण व सेवायोजन विभागाने दिनांक २७-०८-१९९१ रोजी पुणे विद्यापीठास उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत दिली असून या पत्राच्या अखेरीस " याबाबत पुणे विद्यापीठाच्या कायदा १९७४ च्या कलम ४३ (४) अन्वये आवश्यक असलेल्या (१) स्थानिक चौकशी समितीचा अहवाल, (२) विव्दत परिषद / कार्यकारी परिषद / सिनेट यांच्या ठरावाच्या प्रती व (३) शासकीय परिपत्रकानुसार विद्यार्थी संख्येबाबतची आवश्यक असलेली माहिती यासह सादर केल्यानंतर विद्यापीठ कायदा कलम ४३ (६) व (७) अनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अंतिम मंजूरीचा अधिकृत शासकीय निर्णय निर्गमित करण्यात येईल " असे नमूद केले आहे. या परिच्छेदाचे अवलोकन केले असता शासनाकडून अंतिम मंजूरीचा शासकीय निर्णय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास अद्यापपावेतो प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे जर या विषयावर शासनाने आदेश निर्गमित केला असेल तर तो जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस उपलब्ध करुन घ्यावा लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या विषयावर त्यांनी शासनाकडून निर्गमित केल्या गेलेल्या अंतिम मंजुरीच्या आदेशाच्या प्रती प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत वर नमूद केल्याप्रमाणे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अमृतलाल शांतिलाल शाह, व्दारा- श्री. ए. एस. शाह, ढेकू रोड, देशमुखनगर, अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८४
निर्णय दिनांक ११/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु., ता.जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे.

सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८५
निर्णय दिनांक ११/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही

बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३७
निर्णय दिनांकः १२-०३-२०१०

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
रा. बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव, शालेय शिक्षण समिती तथा
मुख्याध्यापक, लक्ष्मणराव जाहेर माध्यमिक
विद्यालय,घोसापुरी, ता.जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत सुनावणी न घेतल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात एकूण तीन मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीकडेच असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देताना त्यांना कळविले. परंतु

या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता,या टप्प्यावर अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.बीड यांनी प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर,रा.लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, शालेय शिक्षण समिती तथा मुख्याध्यापक, लक्ष्मणराव जाहेर माध्यमिक विद्यालय, नामलगाव फाटा, जाहेरनगर,घोसापुरी, ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३८
निर्णय दिनांकः १२-०३-२०१०

१. श्री. रमेश दौलतराव माने,रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने सूचित करावे व त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-०७ ते २००८-०९ या तीन वर्षाच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागामार्फत कॅनॉलमधील गाळ काढण्यासाठी झालेल्या खर्चासंदर्भात व नांदेड पाटबंधारे विभागातील नांदेड

जिल्हयातील कनिष्ठ अभियंता व उपअभियंता आणि शाखा अभियंत्यांच्या नावाची यादी व कार्यकारी अभियंता यांच्या सेवापुस्तिकेची प्रत, अशाप्रकारची विस्तृत व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १,०७६/- इतके भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता त्यांनी दि.१०.०६.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.०७.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती ५३८ पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपिलार्थीस दि. २३.०७.२००८ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पोचसहीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २३.०७.२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही सत्य स्वरुपातील माहिती आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०७.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. वास्तविक पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १,०७६/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०७.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली. परंतु ही माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी असल्याचे अपिलार्थीस वाटत आहे व या कारणावरुन त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेली माहिती ही कशाप्रकारे अपूर्ण आहे व आता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे, प्राप्त माहितीने अपिलार्थीची दिशाभूल कशी होत आहे या मुद्यावर कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. एवढेच नव्हेतर हे तोंडी स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थितही नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश दौलतराव माने,सोमेश कॉलनी, कलामंदिरामागे, नांदेड- ४३१ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३०
निर्णय दिनांक: १२-०३-२०१०

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
रा.तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
ग्रामपंचायत कार्यालय,
तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"दि. १५.०८.२००४ रोजी घेतलेल्या ग्रामसभेच्या प्रोसेडिंगची नक्कल (घेण्यात आलेले ठराव व निर्णय) तसेच या दिवशी स्वीकारण्यात आलेल्या देणगी फीस व त्याचा विनियोग", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित ग्रामसेवक,श्री. एस.जी.चव्हाण यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या प्रतिनिधीसह उपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ग्रामपंचायत तळणी यांच्याकडे रु.७६३०/- इतक्या रकमेची देणगी फी दिली होती. या देणगीचा विनियोग ग्रामपंचायतीने कसा केला, हे जाणून घेणे त्यांना आवश्यक असल्यामुळे त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. तथापि ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कायम टाळाटाळ केली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीच्या केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत देणे भाग होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कृती केली नसल्याचे या प्रकरणी आढळून आले आहे. तसेच आयोगास असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते ग्रामपंचायत,तळणी येथील कार्यालयात दि. १५.११.२००७ रोजी सदर माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले असताना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली

नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.३०.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिले असतानादेखील, त्यांना कोणतीही माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, मु. पो.तळणी,ता.हदगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६१
निर्णय दिनांकः १२.०३.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. प्रिन्सिपल, भाग्यलक्ष्मी सरला गुरुसाहनी मेमोरियल स्कूल, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री. किशोर भिकनसिंग राजपूत यांनी दि.१८.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, भाग्यलक्ष्मी सरला गुरुसाहनी मेमोरियल स्कूल, औरंगाबाद यांच्याकडे काही माहिती मागितली होती. संबंधित संस्थेतर्फे श्री.डी.यु.कुलकर्णी (वकील) यांनी त्यांच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ हा संबंधित संस्थेस लागू होत नसल्याचे श्री. राजपूत यांना कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने श्री. राजपूत यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि.२६.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री.राजपूत यांचे अपील

मान्य केले व त्यांनी मागणी केलेली १ ते १९ मुद्यांवरील माहिती १० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे मुख्याध्यापक, बी.एस.जी.एम.प्राथमिक शाळा, औरंगाबाद यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वकील, श्री.किशोर राजपूत व जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

प्रिन्सिपल, भाग्यलक्ष्मी सरला गुरुसाहनी मेमोरियल स्कूल, औरंगाबाद यांच्या वतीने श्री.डी.यु.कुलकर्णी (विधीतज्ञ) यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरण" या व्याख्येत बसत नसल्यामुळे सदर संस्थेस शासकीय प्राधिकरण असे म्हणता येणार नाही. या संस्थेस शासनाकडून अर्थसहाय्य होत नसल्यामुळे सदर संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तुरतुदीच्या कक्षेबाहेर येत आहे. सदर अशासकीय संस्थेने उक्त अधिनियमाच्या कलम ५ प्रमाणे शासकीय माहिती अधिकारी पदे निर्देशित केलेली नाहीत, तेव्हा अशा परिस्थितीमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना त्यांच्या संस्थेसंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी असे संबोधता येणार नाही. त्यामुळे मूळ माहिती मागविणारा अर्ज नियमास धरुन नसल्यामुळे व उक्त कायद्यातील तरतुदीच्या कक्षेबाहेर असल्यामुळे तो कायदेशिर नाही.

यासंदर्भात सर्व उपस्थितांना आयोगातर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, अशाप्रकारच्या प्रकरणांसंदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी, अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार

अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे दि.२६.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: १२.०३.२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. प्रिन्सीपल, भाग्यलक्ष्मी सरला गुरुसाहनी मेमोरिअल स्कूल, एन-४, सिडको, नवीन औरंगाबाद.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८६
निर्णय दिनांक १२/०३/२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नायगांव (खै.), जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०७.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८७
निर्णय दिनांक १२/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी. नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>लागवड अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण, बिलोली परिक्षेत्र, बिलोली,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय आखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८८
निर्णय दिनांक १२/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी. नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>लागवड अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण, देगलूर परिक्षेत्र, देगलूर,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय आखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८९
निर्णय दिनांक १२/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी. नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती<br>विकास महामंडळ (मर्यादित), नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती<br>विकास महामंडळ (मर्यादित), नांदेड | | |

**निर्णय**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०७.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय आखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९०
निर्णय दिनांक १२/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी. नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>लागवड अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण, कंधार परिक्षेत्र, कंधार,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय आखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३४

निर्णय दिनांक १२-०३-२०१०

१ श्री. राजु हरिदास वायाळ, : अपिलार्थी
मु. सावरखेडा (गों.), पो. सिपोरा (अं.), ता. जाफ्राबाद,
जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु.,
ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात शैक्षणिक वर्ष सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागविली होती.

" १) शैक्षणिक वर्षे २००५ ते ०८ या कालावधीत पर्यवेक्षक म्हणून कार्ये केलेल्या प्रथम सत्र, द्वितीय सत्र, सराव परीक्षा व बोर्ड परीक्षा पर्यवेक्षकांची नावासह व सहीसह यादीसह त्यांच्या

प्रति इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत. २) सन २००५ - ०८ या कालावधीत श्री. शिवाजी विद्यालय भारज बु., येथे कार्यरत असणाऱ्या दैनंदिन हजेरी (शिक्षक हजेरी) माध्यमिक व प्राथमिक विभागाच्या प्रति"

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनयमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याची अपिलार्थीची विनंती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने मान्य केली असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आणि जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी विहित मुदतीत निर्णय दिल्याचे आयोगास अवगत केले आहे.

या प्रकरणाशी संबंधित वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना गरजेचे होते.

तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत त्यांना कोणतीही माहिती दिली नसल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. त्यामुळे केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी असे गृहीत धरले की, व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने व त्यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित न राहिल्यामुळे कदाचित अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करेपर्यंत माहिती मिळाली नसावी. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दिनांक २५-०२-२००९ रोजी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी मुख्याध्यापकाने अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केले होते, हे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या निर्णयावरुन स्पष्ट होत आहे. याचाच अर्थ अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ८ दिवसात द्यावयाची आहे, हे संबंधित मुख्याध्यापकास माहीत होते. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस, दिनांक ३१-०३-२००९ पर्यंत देखील दिलेली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दुष्ट हेतूने टाळले असल्याचे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती न देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे कोणतेही कारण समर्थनिय असू शकत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मर्यादित स्वरुपाची आणि मर्यादित व्याप्ती असलेली अशी होती. ही माहिती देण्यासाठी सर्वसाधारण परिस्थितीत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना कोणतीही अडचण आली असेल, असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु. यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळले

असल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे अपेक्षित असलेली माहिती देण्यासंर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री. शिवाजी विद्यालय भारज बु., तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांच्या संदर्भात आयोगाकडे बरीच अपिले प्राप्त झाली आहेत. या सर्व अपिलांचा सूर हा शिक्षकांच्या हजेरीबद्दल, त्यांच्या नेमणुकीबद्दल असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची परिस्थिती स्पष्ट होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील कलम १८ (२) च्या तरतुदीचा वापर करुन, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या अर्जातील माहिती संदर्भात व विद्यालयाच्या शिक्षण संस्थेने वेळोवेळी केलेल्या शिक्षकांच्या नेमणूकी संदर्भात चौकशी करुन आपला अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत सादर करावा, असे सूचित करण्यात येत आहे. ही चौकशी शिक्षणाधिकाऱ्याने त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे न सोपवता ती स्वतः करावयाची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु. यांच्यावर, अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजु हरिदास वायाळ, मु. सावरखेडा (गों.), पो. सिपोरा (अं.), ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु., ता. जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३५

निर्णय दिनांक १२-०३-२०१०

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
मु.पो. पाथरवाला बु., ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००९ व १८-०२-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु दोन्ही तारखेस ते जाणुनबुजून गैरहजर राहिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे, दैनिक सकाळ औरंगाबाद यामध्ये दिनांक ०३-११-२००८ व २९-११-२००८ रोजी प्रसिध्द झालेल्या टंचाई निवारण पाणी पुरवठ्याच्या योजनेसंदर्भातील बातमी संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांनी त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपविभागीय अभियंत्यांकडे पाठवून, अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे उप अभियंत्यांना सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली व त्यांच्याकडे असलेली अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती दिनांक २२-१२-२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०१-२००९ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती प्रमाणित करुन देण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने

प्राप्त झाली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील प्राप्त माहितीबाबत ते समाधानी नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०३-२००९ रोजी सुनावणीच्या दिवशी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-११-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात दिलेला प्रतिसाद हा विलंबाने आणि चुकीचा दिला आहे. अपिलार्थीने दिनांक २६-११-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी ती अपिलार्थीस देण्याकरिता, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत त्यांच्या उप अभियंत्यांकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे क्रमप्राप्त होते. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित उप अभियंत्यांकडे पाठविण्यासाठी त्यांच्या स्तरावर प्रथमतः १४ दिवस विलंब केला. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये ते त्यांना त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या बाबतीत मिळालेल्या माहितीशी समाधानी नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे, टंचाईच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात राबविल्या गेलेल्या १८० योजनेची चौकशी करण्याबाबत महसूल व वन विभाग यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र व त्यासंदर्भात पाठविलेल्या अहवालाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जिल्हाधिकारी जालना यांना दिनांक २०-०८-२००८ रोजीचे पाठविलेले पत्र आयोगास दाखविले. या पत्रामध्ये अपिलार्थी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जात ते म्हणतात त्याप्रमाणे, चौकशी करण्याचे कोणतेही आदेश संबंधित

विभागाने जन माहिती अधिकारी यांना दिल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती वास्तविकत: 'निरंक' अशा स्वरुपाची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवावयास हवी होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना न देता अपिलार्थीने वर्तमानपत्रातील ज्या बातमीच्या आधारे माहिती मागविली आहे त्या बातमीतील वृत्ताचे निराकरण / अनुपालन करण्याचा खटाटोप जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, ही वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे करावयाची कार्यवाही ही फक्त अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात करावयाची आहे व अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या प्रकरणाची योग्यायोग्यता तपासून नंतर त्यातील मुद्यांवर कार्यवाही करणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती, वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु.पो. पाथरवाला बु., ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३६

निर्णय दिनांक १२-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हसन हनीफ शेख, | : | अपिलार्थी |
| | रा. आझाद नगर, ढोकी, ता. जि. उस्मानाबाद | | |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा | | |
| | मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | प्रतिवादी |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसांच्या आत निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, माहिती अधिकाऱ्यांवर रु. २५०/- प्रमाणे शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित दिनांक १ जुन २००३ ते ३१ आक्टोबर

२००८ या कालावधीमधील वार्षिक तपासणी अहवाल, संच मान्यता व कर्मचारी पद मान्यता प्रत अशी माहिती रजिस्टर्ड टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०१-२००९ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१०-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना न देण्याचे कारण म्हणजे, जर एकदा त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली तर प्रत्येक वेळी अपिलार्थी वेगवेगळ्या मुद्यांवर त्यांच्याकडे माहिती मागतील आणि त्यांना त्रास देतील या शंकेने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

जन माहिती अधिकारी यांना, वरील युक्तिवादाव्यतिरिक्त अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी कोणतेही समर्थनिय कारण आयोगास, त्यांना पुरेपूर संधी देऊनही, स्पष्ट करता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-

११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणास शासनाचे नियमीत स्वरुपात अनुदान प्राप्त होत असल्यामुळे हे प्राधिकरण सार्वजनिक प्राधिकरण असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे या प्रकरणी या प्राधिकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे त्यांना भाग होते. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीस एकदा माहिती दिल्यास ते वारंवार अशाच प्रकारची माहिती त्यांच्याकडे मागतील या शंकेमुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही हा युक्तिवाद, आयोग पूर्णतः अमान्य करीत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी पाहता यामध्ये, माहिती मागविणाऱ्या अर्जदाराचे चारित्र्य, त्याचे वर्तन किंवा या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या मनात उद्‌भवलेली शंका यामुळे अर्जदारास माहिती नाकारण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक स्वरुपाची माहिती जरी कितीही वेळा मागितली तरीही ती माहिती, अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्याबाबत विहित मुदतीत निर्णय घेणे त्यांना अनिवार्य आहे.

तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्कही कळविले नाही किंवा माहिती देण्याची कोणती तयारीही दर्शविली नाही किंवा माहिती नाकारली नाही आणि अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज विनाकार्यवाही त्यांच्याकडे तसाच ठेवून घेतला. यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी देखील अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना मुख्याध्यापकांना केल्या असता, त्यांच्या सूचनेवरही जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे, त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब

संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, लातूर यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त १० हप्त्यामध्ये खालील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात मे २०१० पासून करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

**" ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०- इतर सेवा, ८००-इतर जमा रक्कम (१८) - माहिती अधिकारी ००७ ०००१६१"**

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, लातूर यांना या प्रकरणी एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हसन हनीफ शेख, आझाद नगर, ढोकी, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५८

निर्णय दिनांक १२-०३-२०१०

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, : अपिलार्थी
रा. प्रभातनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १) श्री. श्रीनिवास सोनी २) मे. शिवलाल शंकरलाल सोनी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले असता यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली असल्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. श्रीनिवास सोनी व मे. शिवलाल शंकरलाल सोनी, अर्धघाऊक रॉकेल विक्री परवानाधाक यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षास दिलेल्या लायसन्सची सत्यप्रत व दिनांक, जून २००८ चे त्रयस्थ पक्षाचे शिल्लक असलेल्या केरोसीनचे प्रपत्र, त्रयस्थ पक्षाच्या जून २००८ च्या प्रपत्र 'अ,' ' ब ' व ' क ' च्या सत्यप्रती, त्रयस्थ पक्षाच्या फर्ममधील पार्टनरची नावे, त्रयस्थ पक्षाकडील किरकोळ परवानाधारकांचे जून २००८ चे शिल्लक व वाटपाचे प्रपत्र आणि त्रयस्थ पक्षाच्या जून २००८ चे सेल रजिस्टर व स्टॉक रजिस्टर सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाकडून हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांना वेळ लागणार असल्याची अपिलार्थीस प्रथमतः कल्पना देऊन आणि त्रयस्थ पक्षाकडून माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी सुनावणी घेऊनही यासंदर्भात कोणतेही आदेश पारीत केले नाहीत परिणामी अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. मध्यंतरीच्या काळात दिनांक ०१-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पोस्टाने पुरविली.

तथापि प्राप्त माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. श्रीनिवास सोनी गैरहजर आणि जन माहिती अधिकारी, दुसरे त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ रोजी त्यांना आवश्यक ती माहिती पूर्णपणे पुरविली आहे.

उपस्थित त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या संदर्भातील माहिती उघड करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्षाच्या जून २००८ चे प्रपत्र ' ब ' व ' क ' चा समावेश नाही. त्रयस्थ पक्षाच्या फर्ममधील पार्टनरची नावे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील परवानाधारकाच्या जून २००८ च्या शिल्लक व वाटप प्रपत्राच्या सत्यप्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत व सार्वजनिक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस ती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. त्याचबरोबर त्रयस्थ पक्षाकडील ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांचा कोणताही आक्षेप नाही असा आयोगासमोर केलेला युक्तिवाद पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयात नमूद केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, रा. प्रभातनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५९

निर्णय दिनांक १२-०३-२०१०

१ श्री. भगवान विठ्ठल कांबळे, : अपिलार्थी
मु. पो. आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर येथील सन १९८२ ते १९८५ या कालावधीमध्ये शासनामार्फत बांधून दिलेल्या दगडमातीच्या झोपड्या वाटप झालेल्या लाभार्थ्यांची यादी साक्षांकीत स्वरुपात मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहिती सन १९८६-८७ सालाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सन १९८२ ते १९८५ या कालावधी-तील झोपडपट्टी वाटपाच्या यादीची प्रत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती त्यांना देता येणे शक्य नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी सन १९८२ ते १९८५ या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सन १९८६-८७ सालाशी संबंधित माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी आणि त्यांना अपेक्षित असलेली सन १९८२ ते १९८५ या कालावधीशी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे त्या अभिलेख्याच्या मुखपृष्ठावर ' आरळी (खुर्द) साल सन १९८१ ते १९८७ वर्षात बांधून दिलेल्या घरकूल वाटपाचा तपशील '

असा उल्लेख केला आहे. तथापि या अभिलेख्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या सन १९८२ ते १९८५ या कालावधीशी संबंधित असलेल्या यादीचा समावेश नाही. परंतु सन १९८६-८७ मध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे वाटप करण्यात आलेली घरकूले ही १९८३ सालच्या जनगणनेवर आधारीत असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. मूळात ही माहिती अस्तित्वात आहे किंवा कसे हे देखील कळण्यास मार्ग नाही, कारण सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आयोगाने त्यांच्याकडे तहसील कार्यालयातर्फे सन १९८२ ते १९८५ या कालावधीमध्ये घरकूले वाटप केल्यासंदर्भात त्यांच्याकडे काही कागदपत्रे अथवा एखादा सबळ पुरावा आहे काय ? अशी विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यास नकारार्थी उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांची ' सन १९८१ ते १९८७ या वर्षात बांधून दिलेल्या घरकूल वाटपाचा तपशील ' हे मुखपृष्ठ असलेली संचिका आयोगाने तपासली असता, त्यामध्ये १९८२ ते १९८५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने वाटप केलेल्या घरकुलांसदर्भात कोणतीही नोंद नसल्याचे आयोगास आढळले आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये वेगवेगळ्या टप्प्यावर अपिलार्थीस दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अस्तित्वात आहे किंवा कसे हे कोणालाही माहिती नाही किंवा यासंदर्भात कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी अथवा अपिलार्थी यांच्याकडे उपलब्ध नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अमूर्त स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची वस्तुस्थिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळले अथवा दुष्ट हेतुने अपिलार्थीस खोटी माहिती दिली, असे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदी-प्रमाणे कार्यवाही आदेशित करण्याची विनंती, आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची वस्तुस्थिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान विठ्ठल कांबळे, मु. पो. आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.